CMYK

सोलापूर

प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

https://dainiktarunbharat.com / https://epaper.dainiktarunbharat.com

सातारा

शुक्रवार, ३ मे २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३८ वे अंक १८२ | पाने १२ | किंमत रु. ६/-

# राहुल गांधींना पंतप्रधान करण्यासाठी पाकिस्तान आतुर

## पंतप्रधान मोदी यांचा काँग्रेसवर थेट हल्ला

**वृत्तसंस्था,**
**आणंद, २ मे**

एका विशिष्ट वर्गाच्या तुष्टीकरणात सम ाधान मानणारा काँग्रेस पक्ष हा पाकिस्तानचा अनुयायी आहे आणि भारताच्या पंतप्रधानपदी राहुल गांधींना विराजमान करण्यासाठी पाकिस्तान आतुर आहे, असा थेट हल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी काँग्रेसवर चढविला.

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या मंत्रिमंडळातील माजी मंत्री चौधरी फवाद हुसैन यांनी आपल्या सोशल मीडिया खात्यावर राहुल गांधी यांचा फोटो टाकून त्यांचे अभिनंदन केले. हा व्हिडीओ समोर आल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी गुजरातच्या आणंद येथील जाहीर सभेत काँग्रेसवर जोरदार हल्ला चढविला. भारतात काँग्रेसचे अस्तित्व संपुष्टात येत असल्याने, तिकडे पाकिस्तान रडत आहे. तेथील नेते काँग्रेससाठी प्रार्थना करीत आहेत. राहुल गांधी यांना पंतप्रधान बनविण्यासाठी ते आतुर झाले आहेत. यात



आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही, कारण काँग्रेस हा पाकिस्तानचा अनुयायी आहे. काँग्रेस आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध यापूर्वीही समोर आले आहेत. यावरून हेच दिसून येते की, आपल्या शत्रूला भारतात अतिशय कमजोर सरकार यावे, अशी इच्छा आहे, असे पंतप्रधान म्हणाले.

### 'व्होट जिहाद' लोकशाहीला घातक

काँग्रेसचे वरिष्ठ नेते सलमान खुर्शीद यांची भाची मारिया आलमने अलिकडेच मुस्लिम मतदारांना 'व्होट जिहाद'ची हाक दिली आहे. आतापर्यंत आपण 'लव्ह जिहाद' आणि 'लॅण्ड जिहाद'विषयी ऐकले आहे. आता मुस्लिम घराण्यातील एका सुशिक्षित व्यक्तीने 'व्होट जिहाद'वर भर दिला आहे. जिहादचा अर्थ आपल्या सर्वांनाच माहिती आहे. खुर्शीद यांच्या घराण्याकडून लोकशाहीचा इतका मोठा अपमान झाला, पण एकाही काँग्रेसी नेत्याने या वक्तव्याचा निषेध केलेला नाही, असा आरोप पंतप्रधान मोदी यांनी केला.




## महत्त्वाचे...

### प्रज्वल रेवन्नाविरोधात लुकआऊट नोटीस

**कलबुर्गी :** कथित सेक्स स्कँडल प्रकरणी विशेष तपास पथकाने गुरुवारी माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांचा नातू आणि हसनचा खासदार प्रज्वल रेवन्नाच्या विरोधात लुकआऊट नोटीस जारी केली आहे. यापूर्वी तपास पथकाने प्रज्वल आणि त्याचे वडील एच. डी. रेवन्ना यांना चौकशीसाठी हजर राहण्यासाठी समन्स बजावला आहे. रेवन्नाच्या घरात काम करणाऱ्या एका महिलेच्या तक्रारीवरून या पिता-पुत्रांविरुद्ध लैंगिक छळ, पाठलाग करणे, धमकावणे आणि महिलेच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

### मे महिन्यात देशात उष्णतेची लाट येणार

**पुणे :** देशातील वातावरणात सातत्याने बदल होत आहे. कुठे उन्हाचा चटका तर कुठे अवकाळी पाऊस पडत आहे. या महिन्यात देशातील तापम ानात वाढ होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. मे महिन्यात देशाच्या बहुतांश भागांत तापमान सरासरीहून अधिक राहण्याचा अंदाज आहे. राज्यात देखील अनेक ठिकाणी उष्णतेच्या लाटाअधिक राहण्याची शक्यता आहे. कोकणातील तापमान मे महिन्यात सरासरीहून अधिक राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

### स्पेक्ट्रम प्रकरणी केंद्राची याचिका नाकारली

**नवी दिल्ली :** टू-जी स्पेक्ट्रम प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रीने केंद्राची याचिका स्वीकारण्यास नकार दिला. रजिस्ट्रीने केंद्राच्या याचिकेला गैरसमजावर आधारित आणि स्पष्टीकरणाच्या नावाखाली न्यायालयाच्या निर्णयाचे पुनरावलोकन करण्याचा प्रयत्न असल्याचे म्हटले आहे. टू-जी प्रकरणी न्यायालयाने २०१२ मध्ये दिलेल्या एका आदेशात म्हटले होते की, देशातील नैसर्गिक संसाधनांचे वाटप लिलावाद्वारेच केले जाऊ शकते. केंद्राने या निर्णयात दुरुस्तीची मागणी केली होती. न्यायालयाच्या नियम १५ मधील उपनियम पाचनुसार, रजिस्ट्रार योग्य कारण नसताना किंवा निंदनीय बाब असल्याच्या कारणावरून याचिका स्वीकारण्यास नकार देऊ शकतात.

### मुख्यमंत्री योगी यांचा डिपफेक व्हिडीओ बनवणारा अटकेत

**नोएडा :** मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा डिपफेक व्हिडीओ बनवून तो समाज म ाध्यमावर पोस्ट केल्याप्रकरणी उत्तरप्रदेश पोलिसांच्या विशेष कृती दलाने (एसटीएफ) गुरुवारी नोएडा येथून अटक केली. अतिरिक्त पोलिस महासंचालक अमिताभ यश यांनी सांगितले की, समाज माध्यमावर प्रसारित करण्यात आलेला व्हिडीओ दिशाभूल करणारे तथ्य पसरविण्यासह देशविरोधी घटकांना बळ देण्यासाठी करण्यात आला होता. मुख्यमंत्री योगी यांचा व्हिडीओ एआयचा वापर करून एका एक्स अकाऊंटवरून पोस्ट करण्यात आला होता. याबाबतची तक्रार आल्यानंतर चौकशी करून २४ तासांतच आरोपीचा शोध घेऊन अटक करण्यात आली.

# जीएसटी संकलन २ लाख कोटींच्या वर

## एप्रिलमध्ये केली विक्रमी कमाई

**नवी दिल्ली, २ मे**

वस्तू व सेवा कर अर्थात् जीएसटीचे एकूण संकलन एप्रिलम ध्ये १२.४ टक्क्यांनी वाढून विक्रमी २.१० लाख कोटी रुपयांवर पोहोचल्याचे अर्थमंत्रालयाने बुधवारी जारी केलेल्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले. ही वाढ मुख्यत्वे १३.४ टक्क्यांनी वर्ष-दर-वर्ष मोठ्या प्रमाणात झालेल्या व्यवहारांमुळे तसेच अधिकाऱ्यांनी केलेल्या करचोरीविरोधी उपाययोजना व लेखापरीक्षणांमुळे झाली आहे.



सात वर्षांपूर्वी म्हणजे जुलै २०१७ मध्ये अप्रत्यक्ष करामध्ये झालेल्या सुधारणेनंतर जीएसटी संकलनाने गाठलेली ही सर्वोच्च पातळी आहे तसेच प्रथमच एकूण संकलनाने दोन लाख कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. यापूर्वी एप्रिल २०२३ मध्ये १.८७ लाख कोटी रुपयांची सर्वोच्च पातळी गाठली होती. जीएसटी संकलनाने दोन लाख कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला असून, त्यासाठी अर्थव्यवस्थतील मजबूत गती आणि प्रभावीपणे करण्यात आलेल्या करसंकलनाचे आभार मानले पाहिजे, असे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी सांगितले. एकीकृत जीएसटीपोटी राज्यांची कोणतीही थकबाकी नाही, असेही त्यांनी सांगितले.

# शिंदेंच्या बंडानंतर ठाकरेंकडून मला मुख्यमंत्रिपदाची ऑफर

## देवेंद्र फडणवीसांचा सनसनाटी गौप्यस्फोट

**वृत्तसंस्था,**
**मुंबई, २ मे**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदेच्या बंडानंतर आपल्याला मुख्यमंत्रिपदाची ऑफर आल्याचा गौप्यस्फोट एका मराठी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत केला. तुम्ही मुख्यमंत्री बना, असे उद्धव ठाकरेंनी मला फोन करून सांगितले, असा दावा फडणवीस यांनी केला.



फडणवीस म्हणाले, एकनाथ शिंदेंच्या बंडानंतर मला उद्धव ठाकरेंनी फोन केला. तुम्ही मुख्यमंत्री बना, असे सांगितले. मात्र, वेळ निघून गेली होती. आम्ही एकनाथ शिंदेसोबत एकत्र येत आहोत, हे चित्र जेव्हा स्पष्ट झाले. त्यादिवशी सकाळी मला उद्धव ठाकरेंचा फोन आला. ते म्हणाले, देवेंद्रजी तुम्ही कशाला त्यांना सोबत घेता किंवा त्यांना एखादे पद देता, मी संपूर्ण पार्टी घेऊन येतो. तुम्ही मुख्यमंत्री बना, आपण हे सगळे नीट करू.

### एकनाथ शिंदेंनाही होता पदाचा प्रस्ताव

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतील बंडावेळी नेमके काय घडले होते, याचे गौप्यस्फोट होत आहे. दोन दिवसापूर्वी एकनाथ शिंदेंनी या संदर्भात खुलासा केला होता. शिंदे म्हणाले होते की, शिवसेना आम दार सुरतला गेल्यावर शिवसेनेत धांदल उडाली होती. त्यावेळी उद्धव ठाकरे यांनी थेट दिल्लीत फोन लावला आणि भाजपा नेत्यांशी संवाद साधला. यांना कशाला घेता, आम्हीच तुमच्यासोबत येतो, अशी ऑफर उद्धव ठाकरे यांनी भाजपा नेत्यांना दिली होती. वसईला चहा पिण्यासाठी टपरीवर थांबलो, त्यावेळी देखील उद्धव ठाकरेंनी शिंदेंना फोन केला होता. परत या, असे म्हणत मुख्यमंत्रीपदाची ऑफर दिली. पण, मी त्यांना म्हटले, आता खूप उशीर झाला आहे.

# ३५ पैकी ३४ मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार जाहीर

**वृत्तसंस्था,**
**मुंबई, २ मे**

राज्यातील पहिल्या दोन टप्प्यात १३ मतदारसंघाच्या निवडणुका पार पडल्या असून, अजून तीन टप्प्यांत ३५ मतदार संघातील निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्या पृष्ठभूमीवर आता ३५ पैकी ३४ मतदारसंघात महायुतीचे उमेदवार जाहीर झाले असून, पालघरचा उमेदवार अद्याप जाहीर झालेला नाही.

अकोला, सांगली, हातकणगंले आणि औरंगाबाद यासारखे अपवाद वगळता यंदाच्या लोकसभा निवडणुकीच्या रणसंग्रामात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी थेट लढत आहे. महाविकास आघाडीचे सर्व जागांवरील उमेदवार जाहीर झाले असून, म हायुतीने मतदान होऊ घातलेल्या ३५ पैकी ३४ जागांवार आपले उमेदवार जाहीर केले आहे. केवळ पालघर या एकमेव मतदार संघात उमेदवार जाहीर करण्यात आलेला नाही. पालघरची जागा भाजपाच्या वाट्याला गेली असल्याचे वृत्त आहे.तिसरा टप्पा, ११ मतदारसंघ तिसऱ्या टप्प्यात ११ मतदारसंघांत ७ मे रोजी मतदान होत आहे. यात रायगड, बारामती, धाराशिव, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी-सिंदुदुर्ग, कोल्हापूर आणि हातकणंगलेचा समावेश आहे.चवथा टप्पा, ११ म तदारसंघ चवथ्या टप्प्याचे मतदान १३ मे रोजी होऊ घातले असून, या टप्प्यातही ११ मतदारसंघात मतदान होणार आहे.

### भाजपा ३०, शिवसेना १३, राकाँ ४ जागांवार लढणार

पालघरची जागा भाजपा लढवत असेल तर, भाजपा स्वतःच्या आजवरच्या इतिहासातील सर्वाधिक ३० जागा लढवेल. आतापर्यंत भाजपाने २९ जागांवर आपले उमेदवार दिले आहेत. शिवसेना १३ जागांवर लढत असून, राष्ट्रवादी काँग्रेसने रायगड, बारामती, शिरुर आणि धाराशिव या ४ जागांवर आपले उमेदवार लढवत आहे.

# हिंदूंना आतंकवादी म्हणणाऱ्या काँग्रेसला पराभूत करा

## उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे आवाहन

## राम सातपुते यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेला प्रचंड प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, २ मे**

देशातील नक्षलवाद, आतंकवाद, गरिबी, भ्रष्टाचार, असुरक्षितता यांचे मूळ काँग्रेस आहे. प्रभू श्रीरामांचे अस्तित्व नाकारणाऱ्या आणि हिंदूंना आतंकवादी म्हणणाऱ्या काँग्रेसला सोलापूरकरांनी पराभूत करावे, असे आवाहन उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केले. भाजपा आणि महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांच्या प्रचारार्थ बुधवारी वल्ल्याळ मैदानावर मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची प्रचंड मोठी जाहीर सभा झाली. योगी आदित्यनाथ यांचे भाषण ऐकण्यासाठी भर दुपारी ही हजारो सोलापूरकरांनी गर्दी केली होती.

यावेळी व्यासपीठावर भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, खा. डॉ. जयसिध्देश्वर महास्वामी, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील, राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील, माजी सहकारमंत्री आ. सुभाष देशमुख, माजी पालकमंत्री आ. विजयकुमार देशमुख, भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. समाधान आवताडे, आ. संजय शिंदे, भाजपाचे लोकसभा निवडणूक प्रमुख विक्रम देशमुख, किशोर देशपांडे, भाजपा आणि महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते, शहराध्यक्ष नरेंद्र काळे, शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या डॉ. ज्योती वाघमारे, जिल्हाप्रमुख मनीष काळजे, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस शशिकांत चव्हाण, मनीष देशमुख, प्रणव परिचारक, शिवानंद पाटील, शहर सरचिटणीस रोहिणी तडवळकर, विशाल गायकवाड, रूद्रेश बोरामणी, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते किसन जाधव उपस्थित होते.

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या प्रयत्नाने आणि सम ाजाच्या सहयोगाने तीर्थक्षेत्र श्री अयोध्येत बनलेले भव्य श्रीराम मंदिर हे भारताच्या राष्ट्रमंदिराचे चित्रण प्रस्तुत करत आहे. सम ाज जर एकत्र झाला तर कोणतीही ताकद रोखू शकत नाही हे श्रीराम मंदिराने दाखवून दिले आहे. काँग्रेस हिंदूंच्या आस्थेचा सन्मान करू शकत नाही. माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्यावर नाव न घेता निशाणा साधताना मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले, हिंदू आतंकवाद हा शब्द रूढ करताना देशाचे गृहमंत्री कोण होते ? आणि आज त्यांच्याच परिवारातील सदस्य निवडणूक लढवीत आहेत. काँग्रेसच्या या रक्ताळलेल्या पंजापासून सावध रहा, असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले.

काँग्रेस काळात नेमण्यात आलेल्या रंगनाथ मिश्रा कमिटीने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी यांच्या आरक्षणातून सहा टक्के आरक्षण मुस्लिम ांना देण्याची शिफारस केली होती. तसेच काँग्रेस काळात नेमण्यात आलेल्या सच्चर कमिटीनेही हिंदूंवर आघात करणाऱ्या शिफारशी केल्या होत्या. सच्चर कमिटीलाही भाजपाने विरोध केला. आरक्षणाला धक्का लावण्यासाठी काँग्रेसने कट केला. मात्र भारतीय जनता पार्टी हिंदूंचे आरक्षण इतरांना देऊ देणार नाही. हिंदूंमध्ये फूट पाडण्याचे काँग्रेसचे मनसुबे पूर्ण होणार नाहीत.

भारतीय जनता पार्टी देशाबद्दल बोलते तर काँग्रेस परिवाराबद्दल बोलते. सोलापूरकरांचे एक मत चुकीच्या दिशेने गेले तर पुन्हा आतंकवादाचे नवे पर्व सुरू होईल. पुढील पिढी आपल्याला माफ करणार नाही. सोलापूरकरांनी भारतीय जनता पार्टीला मत दिले तर आत्मनिर्भर आणि विकसित भारताची परिकल्पना साकार होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी संविधानाची पूजा करतात. नव्या संसदेच्या उद्घाटनावेळी जाताना पंतप्रधान नरेंद्र मोदी डोक्यावर संविधान घेऊन गेले. या उलट काँग्रेसने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सर्वाधिक अपम ान केला. सोलापूरकरांनी भाजपा आणि महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांना प्रचंड मताधिक्याने निवडून द्यावे, असे आवाहनही उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी याप्रसंगी केले.

### भगवे वातावरण, प्रचंड गर्दी आणि जल्लोष

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे भाषण ऐकण्यासाठी तरुणाईने प्रचंड मोठी गर्दी केली होती. योगी आदित्यनाथ मैदानात येण्यापूर्वीपासूनच भगवे झेंडे, जय श्रीराम, जय भवानी - जय शिवराय जय अशा घोषणांनी मैदान दुमदुमून गेले होते. त्याम ुळे वातावरण भगवे झाले होते. योगी आदित्यनाथ व्यासपीठावरती येताच सोलापूरकरांनी योगी, योगी असा एकच जयघोष करून जल्लोष केला.



CMYK

www.tarunbharat.net
तरुण भारत
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# लोकशाहीचा महाकुंभ





## निवडणुकायन

### कोण होता 'भटकती आत्मा'?



**'भटकती आत्मा'** हा शब्द सध्या देशाच्या राजकारणात चर्चेत आहे. या शब्दाचे अनेक अर्थ आहेत तसेच काही ऐतिहासिक संदर्भदेखील आहेत. आपण या शब्दाचा मागोवा घेतला, तर ई.पूर्व १८४५ ते १८८५ या काळात आपल्याला हा शब्द नेतो. भटकती आत्माला इंग्रजीमध्ये 'वंडरिंग स्पिरीट' असे म्हणतात. याची कथा फार कमी जणांना माहिती असेल.

वंडरिंग स्पिरीट हा 'प्लेन्स क्री'चा तरुण युद्ध प्रमुख होता. तो नेहमी एका टोळीचे प्रमुख असलेल्या बिग बियर यांच्याविरोधात युद्ध, संघर्ष करायचा. जेव्हा काही काळासाठी बिग बियर आपली टोळी सोडून दुसऱ्या कामासाठी जायचे, तेव्हा त्यांचा मुलगा इमासीस हा नेतृत्व करीत असे. यावेळी तो स्पिरीट संधीचा फायदा घ्यायचा आणि बिग बियरच्या टोळीला पुन्हा आव्हान द्यायचा. वंडरिंग स्पिरीट हा युद्धनीतीचे अजिबात पालन करायचा नाही. तो कधीही विरोधी सैन्यावर हल्ला करायचा. असे असूनही तो सारखा अयशस्वी ठरायचा. यामुळे त्याची लोकप्रियता खूप कमी झाली.

१८८५ साली फ्रॉग हिंसाचार झाला होता. वंडरिंग स्पिरीट हा फ्रॉग हिंसाचारातील कुख्यात युद्धनीतीसाठी ओळखला जातो. आपल्या जीवनकाळात त्याने ब्लॅकफूट योद्ध्यांवर अनेक हल्ले केले आणि त्यांना मारण्यात तो यशस्वी ठरला. यानंतर वंडरिंग स्पिरीट याला कॅनडाच्या न्याय व्यवस्थेने दोषी ठरवून फाशीची शिक्षा दिली. अनेक महिन्यांच्या संघर्षानंतर वंडरिंग स्पिरीटला घेरण्यात आले. त्याने आत्मसमर्पण केले. स्वत:च्या छातीत सुरा खुपसून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. पण, त्याला ताब्यात घेण्यात आले. याच वंडरिंग स्पिरीट म्हणजेच 'भटकती आत्मा'च्या खूप कहाण्या सांगितल्या जातात. पण खरी कहाणी कोणती? हे कधी समोर आले नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभा निवडणुकीच्या प्रचार सभांमध्ये भटकती आत्मा म्हणून एका विरोधीपक्षाच्या नेत्यावर हल्लाबोल केला. त्यांचा हा रोख राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर असल्याचेही म्हटले जात आहे. त्या निमित्ताने गेल्या चार दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात 'भटकती आत्मा' हा शब्द चर्चेत आहे. परंतु, याचा भटकती आत्मा या व्यक्तीशी काहीच संबंध नाही. एक मात्र खरे की, वडरिंग स्पिरीटप्रमाणेच शरद पवारांनी राजकारणात वाट्टेल तसा वावर केला. आधी आपल्या महत्त्वाकांक्षा आणि नंतर मुलीचे भवितव्य यामागेच ते राहिले. देशाच्या सर्वोच्च पदावर बसण्याचे त्यांचे स्वप्न पूर्ण न झाल्याने कदाचित ते कायम अस्वस्थ असतातच. त्यात आता घरातच खिंडार पडल्याने त्यांची स्थिती सैरभैर झाली आहे. मग अशा स्थितीत पंतप्रधान मोदींनी त्यांच्यासाठी वापरलेला 'भटकती आत्मा' हा शब्दप्रयोग अगदी चपखल बसतो. इच्छा पूर्ण झाली तरच भटकती आत्मा शांत होते, असे आपली धर्मसंस्कृती सांगते. पण, पवारांच्या बाबतीत हे जरा अवघडच दिसत आहे. त्यामुळे त्यांचा आत्मा शांत करण्यासाठी कोणते 'पान' घालावे लागणार, याचे उत्तर कदाचित आपल्या कोणत्याच ग्रंथातही सापडणार नाही, हे नक्की.

# ४० वर्षे तुमच्या घरी राहिली, मग सुनेत्रा बाहेरची कशी?

## प्रचारसभेतून पुतण्याचा काकावर पलटवार

◆ **पुणे, २ मे**

अख्ख कुटुंब माझ्याविरोधात आहे. मी घेतलेली भूमिका विकासाला समर्थन देणारी आहे. बारामतीची जनता माझ्यासोबत असल्याने मला फरक पडत नाही. ४० वर्षांपूर्वी सुनेत्रा पवार कुटुंबात आली. तेव्हापासून ती तुमच्या घरी एकत्र राहिली, मग आता तिला बाहेरची समजाल का, असा सवाल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपले काका शरद पवार यांना गुरुवारी प्रचारसभेतून केला.



बारामतीत महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या प्रचार सभेत बोलताना अजित पवार म्हणाले की, शरद पवार यांना तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी राजकारणात येण्याची संधी दिली. मला शरद पवारांनी राजकारणात येण्याची संधी दिली. १९८७ पासून आतापर्यंत ते म्हणतील तीच भूमिका आम्ही घेतली आहे.

जिल्हा परिषद, साखर कारखाने आणि इतर संस्था कशा ताब्यात राहतील, यासाठी आम्ही प्रयत्न केले. पक्ष वाढीसाठी जिवाचे रान केले. मात्र, आता आम्हाला बाहेरचे समजले जात आहे. घरातील सर्व माझ्याविरोधात प्रचार करीत आहे; मात्र मतदार आमच्यासोबत असल्याने सुनेत्रा यांचा विजय पक्का आहे.

**पुण्यातून महायुतीचे चारही खासदार निवडून येणार**

परवा मी पंतप्रधान मोदी यांच्याशी चर्चा करीत होतो. तेव्हा ते म्हणाले की, पुणे जिल्ह्यातील चारही खासदार निवडून आणा, तुम्हाला पाहिजे तेवढा निधी देतो. मी त्यांना सर्व उमेदवार निवडून देण्याची हमी दिली आहे. ही निवडणूक देशाचे भवितव्य ठरवणारी आहे. पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी हवे की राहुल गांधी, हा निर्णय जनतेने घ्यायचा आहे, असे अजित पवार यांनी सांगितले. *(वृत्तसंस्था)*



केंद्रीय मंत्री हरदीपसिंग पुरी, दिल्ली भाजपाचे अध्यक्ष वीरेंद्र सचदेवा यांनी गुरुवारी भाजपा उमेदवारांच्या समर्थनार्थ दिल्लीत भव्य रॅलीचे आयोजन केले होते

# हवे तर भाजपला मतदान करा, तृणमूलला नको

## अधीररंजन चौधरी यांच्या वक्तव्याने खळबळ

◆ **नवी दिल्ली, २ मे**

लोकसभा निवडणुकीतील तिसऱ्या टप्प्याच्या मतदानासाठी आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहे. अशातच काँग्रेसचे पश्चिम बंगालच्या बहरामपूर मतदार संघातील उमेदवार अधीर रंजनचौधरी यांनी, हवे तर भाजपला मतदान करा, पण तृणमूल काँग्रेसला नको, असे वक्तव्य केले आहे.

त्यांचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर



अधीररंजन हे भाजपची बी-टीम असल्याची टीका तृणमूलचे खासदार साकेत गोखले यांनी केली. बंगाली जनतेला विरोध करणाराच भाजपाचा प्रचार करू शकतो. आता त्यांना बहरामपूरमधील जनता १३ मे रोजी उत्तर देईल, असा इशारा त्यांनी दिला. यावर प्रत्युत्तर देताना काँग्रेस नेते जयराम रमेश म्हणाले, बंगालमध्ये भाजपाच्या जागा कमी करणे हेच पक्षाचे उद्दिष्ट आहे. तृणमूल पक्ष हा इंडिया आघाडीचा भाग आहे. अधीररंजन यांची भूमिका वैयक्तिक असून, त्यांशी पक्ष सहमत नाही.

**व्हिडीओ व्हायरल, काँग्रेसकडून सारवासारव**

अधीररंजन चौधरी यांचा एका सभेतील व्हिडीओ व्हायरल झाला आहे. तो तृणमूल काँग्रेसने आपल्या एक्स अकाऊंटवरून ट्विट केला. यात ते तृणमूलला मतदान करण्याऐवजी भाजपाला मतदान करण्याचे वक्तव्य करताना दिसत आहे. पश्चिम बंगालमध्ये काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेस यांच्यात जागा वाटप न होण्यामागे अधीररंजन चौधरीच जबाबदार आहेत, ते बंगाल विरोधक आहेत तसेच भाजपाचा प्रचार करीत असल्याची टीका तृणमूलचे खासदार गोखले यांनी केली. यानंतर काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी याप्रकरणी सारवासारव केली. *(वृत्तसंस्था)*

# धर्माच्या नावावर आरक्षण मान्य नाही

## शरद पवारांनी स्पष्ट केली भूमिका

◆ **कोल्हापूर, २ मे**

देशात धर्माच्या नावांवर आरक्षण ही संकल्पना आम्हाला मान्य नाही. काँग्रेस असो की भाजपा, कुणीही आरक्षण देण्याचा प्रयत्न केला तर आम्ही त्यास विरोध करू, असे ज्येष्ठ नेते शरद पवार म्हणाले.

पत्रपरिषदेत आरक्षणावर भूमिका स्पष्ट करताना पवार म्हणाले, सामजिक तणाव वाढविण्यासाठी सध्या आरक्षणाचा मुद्दा उखरून काढण्यात आला आहे. आम्ही सत्तेत आल्यास जातनिहाय जनगणना करणार आहे. त्यामुळे आरक्षणाच्या लाभापासून कुणीही वंचित राहणार नाही. तामिळनाडूसारख्या राज्यात एका टप्प्यात निवडणुका घेतल्या जातात; मात्र महाराष्ट्रात पाच टप्प्यांत निवडणुका घेण्याचे कारण काय, राज्यकर्त्यांना जनमत मिळण्याची चिंता आहे. पंतप्रधान मोदी यांना प्रत्येक मतदारसंघात जाता यावे यासाठी मतदानाचे जाणीवपूर्वक पाच टप्पे केल्याचा आरोप त्यांनी केला.

**सोडून गेलेल्यांना होणार पश्चाताप**

महाराष्ट्रात गेल्या निवडणुकीत ४२-६ असे चित्र होते. ते यावेळेला बदलेल, असा विश्वास व्यक्त करताना पवार म्हणाले, यावेळी शेतकरी सरकारच्या धोरणांवर नाराज आहेत. मोदी यांचा गवगवा करणाऱ्या तरुणांचा उत्साह यावेळच्या निवडणुकीत कमी झाला आहे. केंद्राने कांदा निर्यातीवर घेतलेला निर्णय चुकीचा आहे. काही जण सोडून गेले तरी त्यांची उणीव भरून काढणारे अनेकजण आमच्याकडे आहे. निवडणुकीनंतर त्यांना घेतलेल्या निर्णयाचा पश्चाताप झाल्याशिवाय राहणार नाही. *(वृत्तसंस्था)*



हिमाचल प्रदेशच्या मंडी लोकसभा मतदारसंघातील भाजपाच्या उमेदवार कंगना राणावत यांनी गुरुवारी निवडणूक प्रचारांचा धडाका लावला

# परभणीतील बालाजी मंदिराचे महंत बिहारमध्ये निवडणूक रिंगणात

◆ **पाटणा, २ मे**

महाराष्ट्राच्या परभणी येथील बालाजी मंदिराचे महंत अखिलेश्वर श्रीवैष्णव यांनी बिहारमधील शिवहर लोकसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज दाखल केला आहे. श्रीवैष्णव यांना भाजपाकडून तिकीट हवे होते, पण ते न मिळाल्याने त्यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला.



महंत अखिलेश्वर श्रीवैष्णव यांनी आठवीपर्यंत शिक्षण घेतले असून, ते मूळचे पूर्व चंपारण जिल्ह्यातील चिरैया ब्लॉकमधील पारेवा गावचे आहेत. अविवाहित असून, ते निरुपणकार म्हणून ओळखले जातात. त्यांचे वार्षिक उत्पन्न ४ लाख ९१ हजार ८६० रुपये आहे. परभणीच्या मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात महंत अखिलेश्वर श्रीवैष्णव यांच्याविरुद्ध विश्वासघात, फसवणूक, शिवीगाळ आणि धमकीचे तीन गुन्हे प्रलंबित आहेत. त्यांच्याकडे अडीच लाख रुपये रोख आहेत. त्यांची चार बँक खाती आहेत. महाराष्ट्रातील परभणी सहकारी बँक शाखेत २१ हजार रुपये असल्याचे समोर आले आहे. *(वृत्तसंस्था)*

### महंतांकडे फॉर्च्युनर कार


महंतांकडे फॉर्च्युनर आहे, जिची किंमत ३५ लाख रुपये आहे. त्यांची जंगम मालमत्ता ६८ लाख ५१ हजार रुपये आहे. महंतांची परभणीत १५ एकर जमीन असून, तिची किंमत ३ कोटी ८० लाख रुपये आहे. रूपहरा येथे १६,८३० चौरस फूट अकृषिक जमीन असून, तिची किंमत १५ लाख ४३ हजार आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये १,८०० चौरस फूट जमीन आहे. जिची किंमत ६१ लाख २० हजार रुपये आहे. त्यांची स्थावर मालमत्ता ४ कोटी ४९ लाख रुपये आहे. त्यांच्यावर ९.८९ लाख रुपयांचे सुवर्णकर्ज आहे. याशिवाय २० लाख ८९ हजार रुपयांचे इतर कर्ज आहे.

# मैनपुरीत पराभवाची मालिका मोडण्याचे भाजपासमोर आव्हान

श्यामकांत जहागीरदार

◆ **नवी दिल्ली, २ मे**

मुलायमसिंह यादव यांच्या मैनपुरी मतदारसंघात यावेळी त्यांची सून डिंपल यादव यांचा सामना भाजपाचे जयवीरसिंह यांच्याशी आहे. आजपर्यंत हा मतदारसंघ भाजपाला कधीच जिंकता आला नाही. त्यामुळे पराभवाची ही परंपरा भाजपा यावेळी मोडणार का, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.



मैनपुरी हा समाजवादी पक्षाचा विशेषत: मुलायमसिंह यादव घराण्याचा गड म्हणायला हरकत नाही. या मतदारसंघात १९५२ पासून आतापर्यंत एकदाही जनसंघ वा भाजपाला विजय मिळाला नाही. २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत देशभरात मोदी लाट असतानाही मैनपुरीत भाजपाला विजय मिळवता आला नाही.



मैनपुरी मतदारसंघ समाजवादी पक्षाचा गड म्हणून ओळखला जात असला तरी, २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत मुलायमसिंह यादव यांचा ९४ हजार मतांनी विजय झाला होता. त्यावेळी मुलायमसिंह यांना ५ लाख २४ हजार, तर भाजपाचे प्रेमसिंह शाक्य यांना ४ लाख ३० हजार मते मिळाली होती. विशेष म्हणजे, २०१४ च्या निवडणुकीत मुलायमसिंह यांनी या मतदारसंघातील निवडणूक ३ लाख ६४ हजाराने जिंकली होती. त्यांनी राजीनामा दिल्यानंतर झालेली पोटनिवडणूक त्यांचा नातू तेजप्रताप यादव यांनी ३ लाख २१ हजार मतांनी जिंकली होती.

मुलायमसिंह यांच्या निधनानंतर या मतदारसंघात २०२२ मध्ये झालेल्या पोटनिवडणुकीत त्यांची सून आणि अखिलेश यादव यांची पत्नी डिंपल यादव विजयी झाल्या होत्या. त्यांच्याविरोधात भाजपाने यावेळी योगी आदित्यनाथ मंत्रिमंडळातील मंत्री जयवीरसिंह यांना उमेदवारी दिली.

मैनपुरीतील पाच विधानसभा मतदारसंघातील तीन मतदारसंघ सपाकडे तर दोन भाजपाकडे आहे. या लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या करहल विधानसभा मतदारसंघातून डिंपल यादव यांचे पती अखिलेश यादव तर जसवंतनगरमधून चुलत सासरे शिवपाल यादव आमदार आहेत. २०२२ च्या पोटनिवडणुकीत डिंपल यादव यांच्यासाठी अखिलेश यादव यांनी प्रचार केला होता. यावेळी स्वत: अखिलेश यादव उमेदवार आहे आणि राज्यातील सपाच्या सर्व उमेदवारांच्या प्रचाराची जबाबदारीही त्यांच्यावर आहे. त्यामुळे आपल्या प्रचाराची धुरा डिंपल यादव यांनाच वाहावी लागत आहे.

# मुलायमसिंह यांनी एकदाच पूर्ण केला कार्यकाळ

◆ **नवी दिल्ली, २ मे**

समाजवादी पक्षाचे सर्वेसर्वा, माजी मुख्यमंत्री मुलायमसिंह यादव मैनपुरी लोकसभा मतदारसंघातून पाचवेळा विजयी झाले, पण एकदाच त्यांना पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करता आला.

मैनपुरीतून पाच निवडणुका लढवलेल्या यादव यांना एका निवडणुकीचा अपवाद वगळता आपला पाच वर्षांचा कार्यकाळ कधीच पूर्ण करता आला नाही. एकदा लोकसभा बरखास्त झाली, तर तीन वेळा वेगवेगळ्या कारणाने यादव यांनी राजीनामा दिला. २००९ ते २०१४ या काळात एकदाच त्यांना आपला खासदार म्हणून पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करता आला.



१९९६ मध्ये मुलायमसिंह यादव पहिल्यांदा या मतदारसंघातून विजयी झाले. १९९८ आणि १९९९ च्या निवडणुकीत सपाचेच बलरामसिंह यादव या मतदारसंघातून विजयी झाले. २००४ पासून हा मतदारसंघ मुलायमसिंह यादव यांच्या घराण्याच्या ताब्यात आहे. २००४ ची लोकसभा निवडणूक यादव यांनी दुसऱ्यांदा जिंकली, पण काही महिन्यांतच त्यांनी खासदारकीचा राजीनामा दिला. यावेळी झालेल्या पोटनिवडणुकीत सपाचे धर्मेंद्र यादव विजयी झाले. २००९ मध्ये मुलायमसिंह तिसऱ्यांदा या मतदारसंघातून विजयी झाले. यावेळी त्यांनी पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत ते चौथ्यांदा मैनपुरीतून विजयी झाले. मात्र, काही महिन्यांतच त्यांनी खासदारकीचा राजीनामा दिला. २०१९च्या लोकसभा निवडणुकीत पाचव्यांदा विजयी झाल्यानंतर यादव यांचे २०२२ मध्ये निधन झाले. त्यामुळे यावेळी पुन्हा एकदा या मतदारसंघात पोटनिवडणूक घ्यावी लागली. त्यात त्यांची सून डिंपल यादव विजयी झाल्या.

मैनपुरी मतदारसंघात यादव मतदारांची संख्या सर्वाधिक म्हणजे ४ लाखांवर आहे. त्यानंतर शाक्य मतदार अडीच लाख आहे. दोन लाख क्षत्रीय, सव्वा लाख लोधी, तर ब्राम्हण, पाल, बघेल, कश्यप आणि अनुसूचित जातीचे मतदार प्रत्येकी एक लाखाच्या घरात आहे. मुस्लिम मतदारही ७० हजाराच्या घरात आहे. भाजपा उमेदवार जयवीरसिंह यांनी २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत मैनपुरी सदर मतदारसंघातून सपा उमेदवार राजू यादव यांचा पराभव केला. यादव २०१२ आणि २०१७ च्या विधानसभा निवडणुकीत या मतदारसंघातून विजयी झाले होते. *(तभा वृत्तसेवा)*

# राज ठाकरे केवळ जुन्या सहकाऱ्यांसाठीच सभा घेणार

◆ **मुंबई, २ मे**

राज ठाकरे यांनी महायुतीला पाठिंबा जाहीर केल्याने राज्यातील राजकारणात नव्या समीकरणाची नांदी जाणवू लागली. मात्र, राज ठाकरे लोकसभेतील मर्यादित जागांसाठीच प्रचार करणार असून, नारायण राणे व एकनाथ शिंदे या शिवसेनेतील जुन्या सहकाऱ्यांसाठी मैदानात उतरण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

महायुतीच्या जागावाटपात बहुचर्चीत ठाणे लोकसभा मतदारसंघ शिवसेनेच्या पदरात पडताच, ठाणे आणि कल्याण या दोन्ही मतदारसंघातील शिवसेनेच्या उमेदवारांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांची मुंबईतील शिवतीर्थ या निवास्थानी भेट घेऊन मतदारसंघात सभा घ्याव्यात, असे साकडे घातले. या विनंतीनुसार राज ठाकरे सभा घेणार असल्याची माहिती श्रीकांत शिंदे यांनी दिली.

मुख्यमंत्री शिंदे यांच्यासाठी प्रतिष्ठेची ठरलेली ठाणे लोकसभेची जागा अखेर शिवसेनेला मिळाल्याचे बुधवारी स्पष्ट झाले. श्रीकांत शिंदे आणि नरेश म्हस्के या शिवसेनेच्या दोन्ही उमेदवांनी राज ठाकरे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. मुंबईसह ठाणे आणि कल्याण पट्ट्यात राज ठाकरे यांना मानणारा एक वर्ग आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघात राजू पाटील यांच्या रूपाने मनसेचा एकमेव आमदार असून, ते यापूर्वीच श्रीकांत शिंदे यांच्या प्रचारात सहभागी झाले आहेत.

राज्यभर सुरू असोल्या महायुतीच्या सभांमध्ये अजूनही राज ठाकरे यांनी सहभाग घेतला नव्हता. ठाणे, कल्याणात मात्र राज सभा घेतील, असा दावा श्रीकांत शिंदे यांनी केला. *(वृत्तसंस्था)*

# 'अनुपमा'चा भाजपात प्रवेश

◆ **नवी दिल्ली, २ मे**

छोट्या पडद्यावरील लोकप्रिय मालिका 'अनुपमा'मधील प्रसिद्ध अभिनेत्री रूपाली गांगुलीने भाजपात प्रवेश केला आहे.

दिल्लीत झालेल्या एका पत्रपरिषदेत रूपाली गांगुलीने आपण भाजपात प्रवेश करीत असल्याची माहिती दिली. रूपाली गांगुली आधीपासूनच भाजपा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची समर्थक आहे. देशाच्या विकासासाठी भाजपा चांगले काम करीत आहे, यामुळेच आपण भाजपात प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.




भाजपात प्रवेश केल्यानंतर पत्रपरिषदेत माहिती देताना रूपाली गांगुलीने देशाचे नागरिक म्हणून भाजपाला समर्थन करायला हवे, असे आवाहन केले. महाकाल आणि माता राणीच्या आशीर्वादामुळे कलेच्या माध्यमातून मी अनेकांना भेटत असते आणि जेव्हा मी विकासाचा महायज्ञ पाहाते, तेव्हा असे वाटते, मी देखील यात सहभागी व्हावे, अशी प्रतिक्रिया तिने दिली.

रूपाली गांगुलीची अनुपमा ही मालिका छोट्या पडद्यावर प्रचंड लोकप्रिय झाली आहे. या मालिकेत ती प्रमुख भूमिकेत आहे.

इन्स्टाग्रामवर रूपालीचे २० लाखांहून अधिक फॉलोअर्स आहेत. *(वृत्तसंस्था)*

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# अमोल कीर्तीकर, भूषण पाटील यांचे उमेदवारी अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई,दि.२ मे -**

उत्तर मुंबई व उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार भूषण पाटील व अमोल कीर्तिकर यांनी आज उमेदवारी नामांकन अर्ज दाखल केला. मिरवणूक काढून शक्ती प्रदर्शन करीत मुंबईतील वांद्रे पूर्व येथील जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये आपला नामांकन अर्ज दाखल केला. यावेळेस महागाडीचे काँग्रेस उद्धव ठाकरे गट शरद पवार गड व अन्य मित्र पक्षांचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यांच्या सोबत मुंबई काँग्रेस माजी अध्यक्ष आमदार भाई जगताप, आमदार अस्लम शेख, आमदार आणि मुंबई काँग्रेस अध्यक्षा वर्षा गायकवाड, माजी मंत्री सुरेश शेट्टी, मुंबई काँग्रेस कार्याध्यक्ष श्री.चरणसिंग सप्रा, प्रवक्ते सचिन सावंत, शिवसेना माजी नगरसेविका तेजस्वी अभिषेक घोसाळकर, तसेच शिवसेना नेत्या संजना घाडी, संजय घाडी, शिवसेना महिला आघाडी विभाग प्रमुख सुजाता शिंगाडे, काँग्रेस जिल्हाध्यक्ष कालू बुधेलिया व क्लाइव्ह डायस, जिल्हा कार्याध्यक्ष राजपती यादव, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते कैलाश देशमुख, मुंबई काँग्रेस उपाध्यक्ष ॲड संदेश कोंडविलकर व अतुल बर्वे, मुंबई महिला काँग्रेस अध्यक्ष अनिषा बागुल व मुंबई काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

नामांकन अर्ज दाखल करण्यापूर्वी अमोल कीर्तिकर व भूषण पाटील यांनी मातोश्रीवर जाऊन शिवसेना नेते आमदार आदित्य ठाकरे यांची सदिच्छा भेट घेतली. तदनंतर वांद्रे पूर्व येथील म्हाडा कार्यालय ते जिल्हाधिकारी कार्यालय प्रचार रॅली व प्रचार रथ काढून मोठ्या प्रमाणात शक्तिप्रदर्शन करण्यात आले. हजारोंच्या संख्येने मुंबई काँग्रेसचे, शिवसेनेचे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), समाजवादी पार्टीचे व आम आदमी पार्टीचे कार्यकर्ते या प्रचार रॅली मध्ये सहभागी झाले होते.

# उद्धव ठाकरे तुम्ही तर कफन चोर आहात

## देवेंद्र फडणवीस यांचा घणाघात

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २ मे -**

कोरोना काळात विकसित राष्ट्रांची लस घेण्यासाठी असलेला दबाव मोदींनी झुगारून दिला.जगात तीन ते चार देश लस तयार करू शकले त्यात भारत आहे. उद्धवजी त्या काळात तुम्ही खिचडी, कफन चोरी करत होता. प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाणारे तुम्ही..लोक मरत असताना उपाशी असताना घोटाळे करत होता. बॉडी बॅगचा घोटाळे करणारे तुम्ही कफन चोर आहात, अशा शब्दांत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर शरसंधान साधले.

मुंबई भाजपच्या वतीने महाराष्ट्र दिनानिमित्त आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात आज ते बोलत होते. दादर येथील कामगार मैदानावर मेळावा पार पडला.

यावेळी महायुतीचे उत्तर मुंबईचे लोकसभा उमेदवार, केंद्रीय मंत्री पियूष गोयल, मुंबई भाजपा अध्यक्ष आ. ॲड. आशिष शेलार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, उत्तर-मध्य मुंबईचे उमेदवार ॲड. उज्वल निकम, ईशान्य मुंबईचे उमेदवार मिहिर कोटेचा, विधानपरिषद गटनेते प्रवीण दरेकर, कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्यासह भाजपा खासदार, आमदार, उपस्थित होते. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र राज्याने मोठा इतिहास घडवला आहे. संपूर्ण देश पारतंत्र्यात असताना महाराष्ट्राच्या



मराठी मातीतून एक हुंकार निर्माण झाला आणि आई जिजाऊंच्या प्रेरणेने छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती केली. हिंदू पादशाही निर्माण करण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराजांनी केले. महाराष्ट्र तयार होत असताना काँग्रेसकडून अनेक लोकांना हुतात्मा करण्यात आले. हिंदुहृदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी जाहीरपणे सांगितले होते. ज्या दिवशी काँग्रेस सोबत जाण्याची वेळ माझ्यावर येईल त्यावेळी माझं शिवसेना नावाचे दुकान मी बंद करून टाकीन आणि परवा त्यांच्या सुपुत्राची प्रेस कॉन्फरन्स मी पाहत होतो. ते हसत सांगत होते. उत्तर मध्य मुंबईच्या उमेदवार काँग्रेसच्या वर्षाताई आता मी तुझा मतदार आहे. तुझ्या पंजाचे बटन दाबून मी काँग्रेसला मतदान करेल. काय वाटले असेल वंदनीय बाळासाहेब यांच्या आत्म्याला... खुर्ची करता हा ऱ्हास आपल्याला पाहायला मिळत आहे. एकीकडे बाळासाहेबांचे नाव घ्यायचे आणि त्यांच्या विचारांशी पूर्णपणे प्रतारणा करायची. बाळासाहेबांच्या संपत्तीचे मालक उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे असतील पण विचारांचे मालक एकनाथराव शिंदे आहेत. विचारांना जिवंत ठेवण्याचे, हिंदुत्व जिवंत ठेवण्याचे काम एकनाथ शिंदे आणि त्यांच्या नेतृत्वातील शिवसेनेने केले आहे. सर्वात जास्त परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात येत आहे. असे सांगून ते म्हणाले,या देशाला चालवण्याचे काम आर्थिक राजधानी म्हणून महाराष्ट्र आणि मुंबई करत आहे. महाराष्ट्रातून उद्योग गुजरातला चालले या चुकीच्या गोष्टी सांगतात. महाराष्ट्रची ताकद उद्धव ठाकरे यांच्या चेला चपाट्यांना माहित नाही. महाराष्ट्राची क्षमता त्यांना माहित नाही म्हणून ते महाराष्ट्राचा अपमान करतात. ज्यावेळी या महाराष्ट्रामध्ये जनतेच्या आशीर्वादाने भारतीय जनता पार्टी महायुतीचे सरकार आले. त्याला मोदीजींचा आशीर्वाद होता. २०१५ ते २०१९ पर्यंत सातत्याने परकीय थेट गुंतवणुकीमध्ये महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आणण्याचे काम आम्ही केले. त्याच्या आधी देशात, राज्यातही काँग्रेसचे सरकार होते. गुंतवणूकीत महाराष्ट्र चौथ्या आणि पाचव्या, सातव्या क्रमांकावर होता. तो पहिल्या क्रमांकावर आणला. दोन वर्षात देशात आलेल्या गुंतवणुकी पैकी ४२ टक्के आणि ४९ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रामध्ये आली. आमचं सरकार गेल्यानंतर आमच्या पाठीत खंजीर खुपसून काँग्रेस आणि पवार साहेबांसोबत तुम्ही सरकार केले आणि महाराष्ट्र सर्वच क्षेत्रात पिछाडीवर आला.

शिंदे यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रात सरकार स्थापन केल्यावर महाराष्ट्राला पुढे आणून पहिल्याच वर्षी महाराष्ट्र नंबर वनवर आणला. यावर्षी पुन्हा महाराष्ट्र नंबरवन आला आहे. गुजरात, कर्नाटक, दिल्ली एकत्रित बेरीज केली तरी त्यापेक्षा जास्त गुंतवणूक आम्ही महाराष्ट्रामध्ये आणली कारण आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांना मानणारे आहोत. रडायचं नाही तर लढायच , लढणार आहोत लढत लढत पुढे जाऊ.... तुम्ही अडीच तीन वर्षे त्या ठिकाणी होतात तर आमची गुंतवणूक चालली म्हणून रडत राहिलात. ज्या राज्यांमध्ये सत्तारूढ पक्ष षडयंत्र करतो आणि जो सगळ्यात मोठा गुंतवणूकदार आहे त्यांच्या घरासमोर तुमचे पोलीस षड्यंत्र करून बॉम्ब ठेवतात. कोण तुमच्या राज्यात येईल. ज्या राज्यामध्ये शंभर कोटी रुपयांचे वसुलीचे रॅकेट चालते त्या राज्यांमध्ये कोण येणार आहे. ज्या राज्याचे मुख्यमंत्री अडीच वर्षात केवळ दोन वेळा मंत्रालयात जातात आणि फेसबुक लाईव्ह करतात आणि कोमट पाणी प्या म्हणतात त्या राज्यामध्ये कोण जाईल. तुमचे नेते माझं कुटुंब माझी जबाबदारी इतर सगळ्यांचे कुटुंब मोदींची जबाबदारी अशी तुमची निती होती.

### प्राण गेला तरी महाराष्ट्र हुकूमशाहीच्या हाती जाऊ देणार नाही : आ. ॲड. शेलार

मुंबई भाजपा अध्यक्ष आ. ॲड. आशिष शेलार म्हणाले, महाराष्ट्राच्या राज्य गीताच्या गायनाचे कार्यक्रम शक्ती केंद्रावर केले. १ हजार ७७ ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन केले. जय महाराष्ट्र म्हणून राजकारण करणारे मुंबईच्या कुठल्या चौकात किंवा गल्लीबोळात दिसले नाहीत. निवडणुकीचा प्रचार सुरू आहे. आरोप प्रत्यारोप होत आहेत. भाजपा किंवा महायुतीकडून खालच्या स्तरावर प्रचार केला जात नाही. या निवडणुकीमध्ये काही गोष्टी आम्हाला नव्याने कळत आहेत. काही नेते बहुरूपी म्हणून सापडत आहेत. काही लोकांचे अर्ध्या तासात रंग बदलू लागले आहेत. पंतप्रधान मोदी भारतीय जनता पक्ष उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सत्यता न तपासता आरोप प्रत्यारोप केले जात आहेत. त्यातील नंबर एकचे बहुरूपी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आहेत. त्यांची विधाने पाहिले असता मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्यासाठी महाविकास आघाडी सरकार एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी घालवले. प्राण गेला तरी महाराष्ट्र हुकूमशाहीच्या हाती जाऊ देणार नाही असेही त्यांनी म्हटले.

---

सलमान खान गोळीबार प्रकरणातील

# आरोपीच्या आत्महत्येमुळे पोलीस वादाच्या भोवऱ्यात

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई,दि.२ मे -**

अभिनेता सलमान खान यांच्या घरावर गोळीबार प्रकरणात अटक केलेल्या अनुज थापन याच्या आत्महत्येमुळे मुंबई मुंबई पोलीस वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. सिलेब्रेटीच्या केसमधील आरोपीबाबत त्यांनी दाखविलेल्या निष्काळजीपणाबद्दल सर्वस्तरातून संताप व्यक्त होत आहे. गुन्हे अन्वेषण शाखेच्या (क्राईम ब्रंच) पोलीस कोठडीत अनुज थापन गळफास लावून घेईपर्यंत पोलीस झोपले होते का? असा सवाल उपस्थित होत आहे.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कोठडीतील मृत्यूचा तपास राज्य गुन्हा अन्वेषण शाखेकडून (सीआयडी) करण्यात येणार आहे. सलमान खानच्या वांद्रे येथील गॅलेक्सी अपार्टमेंटवर गेल्या १४ एप्रिलला दोघांनी गोळीबार केला. त्यामुळे बॉलीवूडमध्ये मोठी खळबळ उडाली होती. याप्रकरणी पोलिसांनी शिताफीने तपास करून दोघा आरोपींना सुरत मधून अटक केले होते. त्यांना हत्यार पुरविल्याप्रकरणी अनुज थापन याला अटक केली होती.त्याला ८ मे पर्यंत पोलीस कोठडीत मिळाली होती. त्याच्याकडे तपास सुरू असताना बुधवारी त्याने शोचालयात चादरीने गळफास लावून घेतला.

# पराभव दिसू लागल्याने भाजपने मोठ्या नेत्यांच्या सभा वाढवल्या : पटोले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

भाजपला महाराष्ट्रातील लोकसभा निवडणुकीत पराभव दिसू लागला आहे. त्यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी महाराष्ट्रातील सभा वाढवल्या आहेत, अशी टिका महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली. पटोले आज सोलापूर दौऱ्यावर आहेत. यावेळी ते बोलत होते. सोलापुरातून प्रणिती शिंदे निवडून येतील, असा विश्वासही यावेळी पटोले यांनी बोलून दाखवला.

पटोले पुढे म्हणाले, भाजपाने महागाई वाढवली, बेरोजगारी वाढवली. शेतकऱ्यांना उद्ध्वस्त केले. बेरोजगारांचा देश अशी आपली ओळख बनली आहे. या मुद्द्यांकडे लोकांचं लक्ष जाऊ नये म्हणून आता काँग्रेसने ६० वर्षांत काय केले वगैरे म्हणत आहेत. सातत्याने हा प्रयत्न नरेंद्र मोदी, अमित शाह



यांच्याकडून केला जात आहे. नरेंद्र मोदी २०१९ मध्ये सोलापुरात आले होते. तेव्हा त्यांनी लष्कराचे गणवेश शिवण्यासाठी केंद्र उभे करणार म्हणाले होते. सोलापूरमध्ये आता आले तेव्हा त्या वचनावर काहीच का बोलले नाहीत? दोन उड्डाण पुलांचा उल्लेख त्यांनी केला होता. सोलापूरचा आवाजच दिल्लीत आला नाही. २०१४ आणि २०१९ चे दोन्ही खासदार मौन राहिले. प्रणिती शिंदे या जागरुक उमेदवार आहेत, त्यांना निवडून द्या, असे आवाहन पटोले यांनी केले.

# मोदी-शाह यांच्या औरंगजेब सारख्या स्वाऱ्या : संजय राऊत

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई,दि.२ मे:**

दिल्लीवरून मोदी आणि शहा यांच्या स्वाऱ्या औरंगजेबाप्रमाणे महाराष्ट्रात होत आहेत. परंतु महाराष्ट्र हा दिल्ली पुढे कधीच झुकला नाही हा इतिहास आहे, अशी घणाघाती टीका उद्धव ठाकरे गटाचे नेते खा संजय राऊत यांनी केली.

महाराष्ट्र दिनाच्या दिवशी हुतात्म्यांना अभिवादन केल्यानंतर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांनी महाराष्ट्र कमजोर करण्याचा, तोडण्याचा किती प्रयत्न केला



तरी त्याआधी त्यांनी संभाजीनगरमधील औरंगजेबाची कबर पाहून यावी १०७ हुतात्म्यांचं स्मारक जे फोर्टला आहे हे सुद्धा पाहुण यावें. महाराष्ट्रावर चाल करून येणाऱ्यांची काय अवस्था होते याची दोन्ही प्रतीक आहेत, असा टोला टोला लगावत राऊत म्हणाले की, काही भटके-वखवखलेले आत्मे महाराष्ट्राचे लचके तोडण्यासाठी , महाराष्ट्राला कमजोर करण्यासाठी महाराष्ट्राच्या आभाळात फडफडत आहेत. महाराष्ट्राच्या हक्काचे ,अधिकाराचे लचके तोडत आहेत. महाराष्ट्राच्या जनतेला कमजोर केला जात आहे .पण लढवय्या महाराष्ट्राला आणि शिवसेना जोपर्यंत इकडे ठामपणे उभे आहे तोपर्यंत यांना ते शक्य नाही, या लोकांनी शिवसेना तोडली शरद पवार यांचा पक्ष तोडून त्यांना कमजोर करण्याचा प्रयत्न केला. पण या वेळेला काँग्रेस असेल शिवसेना असेल राष्ट्रवादी असेल हे महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी ठामपणे उभे आणि लढत राहतील. सध्याच्या राज्यकर्त्यांनी महाराष्ट्राच्या चाव्या दिल्लीच्या चरणी ठेवल्या आहेत. त्याला थैलीचा राजकारण म्हणतात. मुंबईचा लुटीचा माल दिल्लीच्या चरणी व्हायचा आणि महाराष्ट्रात सत्ता विभागायची हे सध्याच्या राजकर्त्यांचे धोरण आहे, भारतीय जनता पक्षाला महाराष्ट्राचा कधीच घेणे देणे नव्हते. महाराष्ट्राच्या कोणत्याही स्वाभिमानाच्या लढत भारतीय जनता पक्षाने पुढाकार घेतला असेल तर ते त्यांनी दाखवावा.

# राजेंची यावेळीतरी होणार का 'कॉलर टाईट'?

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**सातारा, दि.२ मे-**

मोठया अट्टाहासाने सातारा लोकसभेसाठी उमेदवारी मिळविण्यात खासदार उदयनराजे भोसले यांना यश आले आहे. मात्र आता त्यांच्यासमोर युद्ध जिंकण्याचे आव्हान तिकीट मिळविण्यापेक्षा कितीतरी पटीने मोठे आहे. कागदावर त्यांची लढाई शशिकांत शिंदे यांच्याबरोबर दिसत असलीतरी प्रत्यक्षात मात्र त्यांना शरद पवार यांच्याशी सामना करावा लागणार आहे.

राज्यात व केंद्रात सत्ता असो किंवा नसो गेल्या अडीच दशकापासून सातारा जिल्ह्याने शरद पवारांची साथ सोडलेली नाही. त्यांच्या प्रत्येक आवाहनाला जनतेने साथ दिली आहे. यावेळी राष्ट्रवादी फुटली, पक्षाची मान्यता व चिन्ह पुतण्याकडे गेले असलीतरीही त्यांचा जोष आणि उत्साह कायम आहे. त्यामुळे यावेळी तरी निवडणूक रिंगणात राजेंची 'कॉलर ताठ 'होईल का? की मागच्या पोटनिवडणुकीप्रमाणे जनता पवारांच्या पाठीशी राहील ,हे पहाणे औत्सुक्याचे ठरणार आहे. त्यामुळे या लढतीकडे सर्व राज्याचे लक्ष लागून राहिलेले आहे.

या मतदारसंघासाठी अजित पवार गट आग्रही होता. मात्र उदयनराजे निवडणूक लढवण्यासाठी अडून बसले होते.त्यासाठी दिल्लीत जाऊन केंद्रीय गृहमंत्र्यांच्या भेटीसाठी तीन-चार दिवस प्रतीक्षा करत राहिले. त्यावरूनही विरोधकांकडून छत्रपतीच्या गादीचा अपमान असल्याची टीका करीत विरोधात वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

जर उदयनराजेंना उमेदवारी न दिल्यास ते बंड करून अपक्ष लढविण्याची दाट शक्यता होती. त्यामुळे पेचात अडकलेल्या भाजपाने अजित पवारांना भविष्यात राज्यसभेची जागा देण्याची आश्वासन देत ही जागा आपल्या पदरात पाडून घेतली. तर श्रीनिवास पाटील यांनी







**रणसंग्राम लोकसभेचा ; लक्षवेधी लढत**

**सातारा मतदारसंघ**

यावेळी प्रकृतीच्या कारणास्तव निवडणूक लढविण्यास समर्थता दर्शविल्याने पवारांनी तुल्य असलेल्या शशिकांत शिंदे यांच्यावर ही जबाबदारी सोपवली.

या मतदारसंघांतर्गत पक्षीय बलाबलाचा विचार करता महायुतीकडे चार तर आघाडीकडे दोन आमदार आहेत. साताऱ्यात भाजपाचे शिवेंद्रसिंहराजे भोसले , पाटणचे शंभूराज देसाई व कोरेगावचे महेश शिंदे हे दोघे शिंदे गटाचे तर वाईचे आमदार मकरंद पाटील हे अजित पवार गटाकडे आहेत. तर कराड उत्तरचे बाळासाहेब पाटील हे मोठ्या पवार गटाचे आणि कराड दक्षिणचे पृथ्वीराज चव्हाण हे आमदार आघाडीकडे आहेत. या बलाबलात महायुती प्रबळ दिसत असले तरी प्रत्यक्ष मतदान घडण्यासाठी अनेक 'फॅक्टर' काम करणार असून त्यामध्ये शरद पवार हा सर्वात महत्त्वाचा फॅक्टर आहे. कऱ्हाड दक्षिण आणि कऱ्हाड उत्तर या दोन मतदारसंघांनी याआधीच्या लोकसभा निवडणुकांत अनेकदा भाजप-शिवसेना युतीच्या उमेदवारांच्या विरोधात मताधिक्य दिले आहे. यावेळी हे दोन मतदारसंघ काय भूमिका घेतात, यावरही निकाल अवलंबून असेल. महायुतीचा घटक म्हणून ते उदयनराजेंना मदत करतील. पण पाटील यांचे बंधू या लोकसभा निवडणुकीसाठी अजित पवार गटाकडून इच्छुक होते. मात्र, उमेदवारी न मिळाल्याने कार्यकर्त्यांत नाराजीचे वातावरण आहे. ही नाराजी कोणत्या दिशेला वळणार हे पाहावे लागेल.

१९९९ पासूनच्या सर्व लोकसभा निवडणुका शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने जिंकल्या आहेत. भाजपने या मतदारसंघात पाय रोवण्याची शिकस्त केली, पण त्यांना यश आले नव्हते. पवार यांनी प्रत्येक वेळी पुरोगामी विचारांचा जिल्हा हा मुद्दा ठळकपणे मांडला आणि आत्तापर्यंत लोकांनी त्यांना साथ दिली आहे. गेल्या २५ वर्षापासूनचा पवारांचा हा बालेकिल्ला पक्षफुटीनंतरही त्यांनाच साथ देणार, की भाजप तो हिसकावून घेणार याचे उत्तर या निकालात दडलेले आहे.

सातारा हा दिर्घकाळ काँग्रेसच्या विचारधारेकडे झुकलेला मतदारसंघ राहिला आहे. महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांची कर्मभूमी असलेल्या जिल्ह्यात त्यांचे विचारधारा खोलवर रुजलेली असल्याने आणिबाणीनंतर रायबरेलीतून इंदिरा गांधी पराभूत झाल्या असताना साताऱ्यामधून यशवंतराव चव्हाण आणि कराडमधून प्रेमलाकाकी चव्हाण या मताधिक्याने जिंकून आल्या होत्या.

शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसची १९९९ साली स्थापना केली. तेव्हापासून सातारा लोकसभा मतदारसंघावर राष्ट्रवादी वर्चस्व कायम राहिले आहे. २००९ साली उदयनराजे भोसले पहिल्यांदा राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकीटावर खासदार म्हणून निवडून आले. शिवसेनेच्या पुरूषोत्तम जाधव यांचा पराभव केला.२०१४ मध्येही राष्ट्रवादी काँग्रेसने उदयनराजे उमेदवारी दिली. एरव्ही भाजप-शिवसेना युतीमध्ये पहिल्यापासून सातारा मतदारसंघ हा शिवसेनेकडेच राहिला होता. मात्र, २०१४ ला युतीमध्ये ही जागा आरपीआय आठवले गटाला देण्यात आली. त्यामुळे पुरूषोत्तम जाधव यांनी अपक्ष लढवली होती.त्यावेळी देशात मोदी लाट असतानाही उदयनराजे चार लाखावर मताधिक्याने विजयी झाले होते.

पण उदयनराजे भोसले यांना २०१९ ला उदयनराजे तिसऱ्यादा निवडून आले. त्यांनीं राष्ट्रवादीतूनच शिवसेनेत प्रवेश केलेल्या अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांचा सव्वा लाख मतांनी पराभव केला.पण त्यानंतर अवघ्या पाच महिन्यात उदयनराजेंनी भाजपात प्रवेश केला.आणि त्यानंतर झालेल्या पोटनिवडणुकीत त्यांना पवारांचे सहकारी व ज्येष्ठ नेते श्रीनिवास पाटील यांच्याकडून तितक्याच मत फरकाने मानहानीकारक पराभव स्वीकारावा लागला. त्यानंतर भाजपाने त्यांना राज्यसभेवर घेतले आणि आता ते पुन्हा लोकसभेसाठी रिंगणात उतरले आहेत . २०१९ च्या तुलनेत राज्यात अनेक राजकीय उलथपालथी घडल्या. दोन सरकार झाली .शिवसेना व राष्ट्रवादीत फूट पडल्याने विरोधकांची ताकद क्षीण झाली आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांच्या विरोधात नवी मुंबईतील एपीएमसी मार्केटमधील१५ वर्षापूर्वीच्या कथित गैरव्यवहाराबाबत गुन्हे दाखल करून दबाव टाकण्याचे प्रयत्न सत्ताधाऱ्यांकडून करत असल्याचे टीका केली जात आहे.तरीही राजेसाठी ही निवडणूक आव्हानात्मकच आहे.आता जर त्यांना यश मिळाले नसल्यास त्यांची राजकीय अस्तित्व धोक्यात आणणारे असेल

### उदयनराजे यांच्यासाठी सकारात्मक बाबी

- ✻ भाजपा बरोबरच शिवसेना व अजित पवार गटाचे पाठबळ
- ✻ खासदार श्रीनिवास पाटील यांच्या तुलनेत कुमकुवत प्रतिस्पर्धी उमेदवार

**✻ नकारात्मक बाजू**

- ✻ शरद पवार यांच्या प्रचारसभांना मिळत असलेल्या प्रतिसाद
- ✻ महायुतीतील अंतर्गत गटबाजी व इच्छुकांची नाराजी

### शशिकांत शिंदे यांच्या सकारात्मक बाजू

- ✻ उद्धव ठाकरेंबरोबरच काँग्रेसच्या नेत्यांचा हिरेरीने प्रचार
- ✻ शरद पवारांशी जिल्ह्याशी असलेली भावनिक नाळ

**✻ नकारात्मक बाजू**

- ✻ भ्रष्टाचाराबाबत दाखल गुन्हे व विरोधकांचा असलेला अपप्रचार
- ✻ राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीमुळे मत विभागणीचा फटका



जनहितार्थ जारी

करा मतदान, जपा अभिमान...



## अग्रलेख...

# उत्साहावर उन्हाळ्याचे विरजण!

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या दोन टप्प्यांतील मतदानाच्या टक्केवारीवरून निवडणूक निकालाचे भविष्य वर्तविण्याचे आडाखे आता बदलावयास हवेत. मतदानाच्या टक्केवारीवरून मतदाराच्या मानसिकतेचे विश्लेषण करणे आणि त्यानुसार निकालाचा कौल कोणाच्या दिशेने झुकणार याचे अंदाज बांधणे या पठडीबाज रीतीला आता रामराम करावा लागणार असून, मतदानाच्या टक्केवारीशी अन्य काही कारणेही जोडली गेलेली असतात का, याचा नव्याने शोध घेण्याची वेळही आली आहे. गेल्या काही दिवसांपासून देशात सुरू असलेला उन्हाचा कहर, हे याचे खरे कारण आहे. नैसर्गिक आपत्तींची चाहूल लागली की हवामान खाते किंवा सरकारी यंत्रणा नागरिकांना सावधगिरीच्या सूचना देतात. गरज असेल तरच घराबाहेर पडा, असा एक इशाराही यामध्ये असतो. आता मतदानासाठी घराबाहेर पडणे हे केवळ कोणा व्यक्तीची किंवा कुटुंबाची नव्हे, तर संपूर्ण देशाची आणि देशाच्या भविष्याचीही गरज आहे याचे भान रुजण्याची गरज पहिल्या दोन टप्प्यांतील मतदानाची टक्केवारी पाहता अधिक ठळकपणे अधोरेखित झाली आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मतदानासाठी मतदार घराबाहेर न पडल्याने मतदानाचे प्रमाण घटते आणि मतदानाची टक्केवारी घसरते हे कमी मतदानाचे ढोबळ कारण असल्याचे म्हटले जाते, आणि तेच खरेदेखील आहे. पण मतदानाकरिता मतदार घराबाहेर का पडला नसावा याची राजकीय किंवा बिगर राजकीय कारणे शोधताना मात्र त्याला आपल्या आपल्या राजकीय पूर्वग्रहाच्या तर्कांची आणि पठडीबाज अंदाजांची फोडणी देऊन देशाच्या राजकीय भविष्याचे पदर उलगडण्याचे प्रकार मात्र हास्यास्पद म्हणावे लागतील. या वेळी पहिल्या दोन टप्प्यांत मतदानाची टक्केवारी कमी झाल्याचा गवगवा सुरू होताच सत्ताधाऱ्यांच्या विरोधातील अनेकांना असेच काहीसे आनंदाचे भरते येताना दिसू लागले. सत्तारूढ आघाडीचा मतदार हा कटिबद्धतेने मतदानासाठी बाहेर पडतो आणि मतदानाची टक्केवारी कमी झाली म्हणजे हा मतदार घराबाहेरच पडला नाही, असा शोधही काहींना लागला. प्रत्यक्षात, उन्हाळ्याच्या तीव्र झळा हे मतदान कमी होण्याचे मुख्य कारण असून कमी टक्केवारीमागे असे कोणतेही राजकीय कारण असावे किंवा सत्ताधारी आघाडीशी कटिबद्ध असलेला मतदार घराबाहेर न पडल्याने मतदान कमी झाले असावे, असे तर्क चुकीचे ठरतात. उलट, मानसिकदृष्ट्या एखाद्या विचाराशी बांधिलकी मानणारा आणि देशाच्या भविष्याविषयी गांभीर्याने विचार करणारा कोणताही मतदार अशा तात्कालिक प्रकारांची तमा न बाळगता मतदानाकरिता बाहेर पडतो, असे मानले तर जी काही टक्केवारी पहिल्या दोन टप्प्यांतील मतदानानंतर समोर आली आहे, त्यापैकी मोठा हिस्सा अशा गंभीर आणि प्रामाणिक मतदारांच्या मतदानाचा असावा, असे मानता येईल. अर्थात, मतदानाच्या टक्केवारीचा आणि निवडणुकांच्या निकालाचा प्रत्यक्ष संबंध असल्याचे किंवा कोणत्या टक्केवारीवरून कोणाचा विजय किंवा पराजय होणार, याचे आडाखे बांधण्याचे आजवरचे पठडीबाज प्रकार तंतोतंत खरे ठरल्याचे याआधी पूर्णपणे सिद्ध झालेले नाही. ज्याप्रमाणे निवडणूकपूर्व अंदाज किंवा एक्झिट पोलसारखे प्रकार अथवा वेगवेगळी सर्वेक्षणे करून वर्तविले गेलेले भविष्य यांचा प्रत्यक्ष निकालाशी फारसा जवळचा संबंध असतोच असे नाही, तसेच, टक्केवारीच्या आकड्यांवरून निकालाचे भविष्य वर्तविण्याच्या प्रकाराचादेखील निकालाशी संबंध जोडणे फारसे तंतोतंत नसते. अर्थात, याची शहानिशादेखील निकालानंतरच करावयाची असल्याने व याआधीच्या प्रत्येक निवडणुकीतील कोणत्याही निकालाशी त्याआधीच्या अंदाजांची शहानिशा केल्यावर जे निष्कर्ष निघाले आहेत, ते पाहता, नव्या अंदाजांचेही तेच होणार असून निकालानंतर मात्र, कमी टक्केवारीचे सारे खापर तीव्र उन्हाळा या एकमेव कारणावर फोडावे लागणार, असे दिसू लागले आहे.

खरे म्हणजे, हवामान बदलाच्या अनेक कारणांमुळे गेल्या काही दशकांपासून पृथ्वीचे तापमान आणि ऋतुमानदेखील पुरते बिघडले असून परंपरागत पद्धतीने हवामानाचे अंदाज वर्तविणेदेखील आजकाल अवघड होऊ लागले आहे. कोणे एके काळी, भेगाळलेल्या शेताच्या कोपऱ्यावर बसून तापलेल्या जमिनीचे चटके सोसत आणि घामाने थबथबलेल्या कपाळावर हाताची सावली धरत आभाळाचा कानोसा घेताना पावसाळी ढगांचा किंवा हवामानातील बदलाचा वेध घेण्याची पारंपरिक पद्धत होती. ती आता मोडीत निघाली असून, अत्याधुनिक तंत्रज्ञाने सुसज्ज असलेल्या वेधशाळांनीदेखील हवामानातील नवे बदल अनेकदा हुलकावण्या देऊ लागल्यापासून हे अंदाज छातीठोकपणे वर्तविण्याचे धाडस फारसे घडेनासे झाले आहे. भविष्यातील हवामान बदलाच्या शक्यतांचा आणि त्यामुळे घडणाऱ्या बदलांच्या गृहितांवर आधारित सावधगिरीचे सल्लेदेखील सावधपणे देऊनच हवामानाचे अंदाज सुरक्षितपणे वर्तविले जाऊ लागल्याने, वर्तविलेल्या अंदाजाप्रमाणे तसे घडेलच याची खात्री नसल्यामुळे वारंवार सुधारित अंदाज वर्तविणे भाग पडत असते. केवळ, उन्हाळा तीव्र आहे म्हणून शक्यतो घराबाहेर न पडता वातानुकूलन यंत्रे, पंखे किंवा शीतकरण यंत्रांच्या सान्निध्यात बसून दिवस वाया घालविणे हा सुरक्षित जगण्याचा उपाय मानला, तर मात्र ती घोडचूक ठरेल, असे काही इशारे आता पुढे येऊ लागले आहेत. कारण, उन्हाळ्याचे आणि उष्णतेच्या तीव्र चटक्यांचे परिणाम केवळ आरोग्यावरच नाही, तर कार्यक्षमतेवर आणि मानसिकतेवरही होत असतात, हे पाहता, सर्वाधिक गरजेच्या आणि अत्यावश्यक कामांच्या यादीत मतदानासारख्या राष्ट्रीय कर्तव्य किंवा जबाबदारीस प्राधान्यक्रमात कोणते स्थान द्यावे, याचा विवेकाने विचार करण्याच्या क्षमतेवरदेखील उन्हाळ्यामुळे कसोटी लागणार आहे.

याआधीही उन्हाळ्याच्या हंगामात देशात उष्णतेच्या लाटा येत होत्या. यंदाच्या लाटांचे तडाखे त्याहून अधिक तीव्र असतील, असा अंदाज हवामान खात्याने गेल्या मार्चमध्येच दिला होता. देशाच्या विविध भागांत कमाल तापमानाची विक्रमी नोंद होण्याची शक्यताही वर्तविली गेली होती. अन्य कोणत्याही नैसर्गिक आपत्तीमुळे ओढवली नसेल एवढी जीवितहानी या तापमानवाढीमुळे जगाला पाहावी लागण्याची भीतीदेखील वर्तविली जात आहे. अशा लाटेचा भीषण तडाखा याआधी भारताच्या एका भागास सुमारे नऊ वर्षांपूर्वी बसला होता, आणि त्या लाटेने जवळपास अडीच हजार बळी घेतले होते. हे पाहता, आता मे महिन्यातील ऐन उन्हाळ्याच्या तीव्र लाटेस सामोरे जाण्याकरिता काही उपाययोजना करण्याची गरज ओळखावयास हवी. केवळ मतदानाची टक्केवारी टिकविणे किंवा अशा स्थितीतही जनतेने मतदानासाठी घराबाहेर पडावे याकरिता मानसिकता रुजविणे महत्त्वाचे आहेच, पण प्रत्यक्ष जिवाची सुरक्षितता त्याहूनही महत्त्वाची आहे. याकरिता संपूर्ण साधनसंपत्ती पणाला लावावी लागेल. बाकी उन्हाळ्याच्या काळात निर्माण होणाऱ्या वीजटंचाई, पाणीटंचाईसारख्या समस्या यंदा अधिक उग्र आहेतच, दुष्काळ आणि पाणीटंचाईचे सावट तर तीन महिन्यांपूर्वीच स्पष्टपणे उमटलेलेदेखील होते. निवडणुकीच्या गदारोळात या संकटांची चर्चा फारशी होत नसली, तरी ती संकटे सरलेली नाहीत, उलट दबा धरून डोके वर काढण्याची संधी शोधत आहेत, याचे भानही असणे गरजेचे आहे. उष्णतेच्या तीव्र लाटांमुळे ज्याप्रमाणे तीव्र दुष्काळ पडतात, तसेच पावसाळ्यात अतिवृष्टीसारखी भीषण संकटेही उद्भवतात, असा जिनेव्हामधील पर्यावरणविषयक जागतिक हवामान संशोधन केंद्राचा अहवाल आहे. २०२३ मधील जागतिक हवामान संघटनेच्या अहवालानुसार, २०११ ते २०२० हे दशक जमीन आणि महासागर या दोहोंकरिता सर्वाधिक उष्ण दशक ठरले होते. या काळात जगभरातील हिमनद्या वर्षागणिक सरासरी १ मीटरने वितळल्या, समुद्राची पातळी वर्षाकाठी साडेचार मिलिमीटरने वाढली, समुद्राच्या पृष्ठभागावरील उष्णतेचे प्रमाण साठ टक्क्यांनी वाढले, आर्क्टिक समुद्रातील बर्फाचा विस्तार सरासरी ३० टक्क्यांनी घटला होता. हे सारे भयानक तर आहेच, पण ही तर केवळ सुरुवात आहे. जाळणाऱ्या उष्णतेपासून बचाव करायचा असेल, तर ज्वलंत कृतिशीलता दाखवायला हवी, कारण पुढील पाच वर्षांचे जगभरातील सरासरी तापमान गेल्या पाच वर्षांपेक्षा कितीतरी अधिक असण्याची शक्यता आहे. संकटाने दिलेला हा इशारा राजकारणापलीकडच्या तकपिक्षा बरेच काही सांगणारा आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. ▮▮

## विश्लेषण

**प्रा. अशोक ढगे**

# वारसा कराचा तापला मुद्दा

निवडणुकीच्या काळात कोणतेही विधान जास्त जपून करावे लागते. आपले म्हणणे कितीही खरे असले आणि विचार कितीही क्रांतिकारी असला, तरी तो समाजाच्या पचनी पडतोच असे नाही. त्यातही करांबाबत तर अधिक जागरूक राहावे लागते. निवडणुकीच्या काळात 'ध'चा 'मा' करण्याचे प्रकार जाणीवपूर्वक केले जातात. त्यातून स्पर्धक राजकीय पक्षाची कोंडी करण्याचा प्रयत्न होत असतो. हल्ली एखादा मोठा नेता विधान करून जातो आणि प्रतिस्पर्धी पक्ष त्याचा यथोचित फायदा उठवतो. नेत्याच्या विधानाशी पक्षाने कितीही फारकत घेतली, तरी 'डॅमेज कंट्रोल' काही होत नसते. एका अर्थी नेताच पक्षाला अडचणीत आणत असतो. आधी सोनिया गांधी, मणिशंकर अय्यर यांनी मोदी यांच्यावर केलेल्या टीकेचे बुमरँग काँग्रेसवरच झाले होते. त्याचा नव्याने आठव झाला. मात्र, या निमित्ताने या मुद्याचा माग काढण्याची गरज निर्माण झाली.

देशात आर्थिक विषमता टोकाची असली, तरी संपत्तीचे समान वितरण झाले पाहिजे, असे म्हणणे स्वप्नवत आहे. एखाद्याने कष्टाने कमावलेली संपत्ती त्याच्याकडून सहजासहजी काढून घेणे अन्यायकारक आहे. परंतु, याचा अर्थ असा नव्हे की, आर्थिक विषमता दूर करूच नये. जादा संपत्ती राष्ट्राकडे घेतल्यानंतर तिचा उपयोग गरिबांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी होईलच असे नाही. त्यासाठी साम्यवादी देशाचा अनुभव पुरेसा बोलका आहे. श्रीमंतांवर अधिक कर लादून गरिबांच्या कल्याणाच्या योजना राबविणे हा मध्यममार्ग असतो. पण काही वेळा तोदेखील नीट वापरला जात नाही. अमेरिकेसारख्या राष्ट्रात एखादी कररचना चांगली आहे, म्हणजे ती भारतात चांगली ठरेलच, असे नाही. हे लक्षात घेऊनच सॅम पित्रोदा यांच्या वारसा कराबद्दलच्या विधानामुळे काँग्रेसला बॅकफूटवर यावे लागले. मोदी, योगी आदित्यनाथ, मायावती आदी मंडळी पित्रोदा यांच्यावर तुटून पडली. अर्थशास्त्रज्ञ, तंत्रज्ञ राजकारणी नसतात. त्यामुळेच एखादी गोष्ट सुचली तरी ती कधी आणि कशी मांडावी किंवा मांडू नये, याचे भान सुटले की काय होते, हे सॅम पित्रोदा आणि काँग्रेसलाही कळले असेल. एखादे वक्तव्य केले आणि अंगलट आले की, आपल्या विधानाची मोडतोड करून दाखवली, अशी नेहमीची पळवाट शोधली जाते. प्रत्येक वेळी ती उपयोगी पडतेच असे नाही.

सॅम पित्रोदा हे नाव राजकारणात नवीन नाही. इंदिरा गांधी, राजीव गांधी आणि मनमोहन सिंग यांचे सल्लागार राहिलेले पित्रोदा सध्या इंडिया ओव्हरसीज काँग्रेसचे अध्यक्ष आहेत. असे असले तरी पित्रोदा कामापेक्षा वक्तव्यामुळेच अधिक चर्चेत असतात. त्यांची विधाने काँग्रेससाठी डोकेदुखी ठरते. पक्षाला बचावाशिवाय पर्याय राहत नाही. अशी पृष्ठभूमी असताना पित्रोदा यांच्या वक्तव्याने पुन्हा एकदा काँग्रेसच्या अडचणी वाढवल्या. पित्रोदा यांनी निवडणुकीच्या काळात वारसा कराची वकिली केली. वाद वाढत असल्याचे पाहून त्यांनी स्पष्टीकरण दिले; मात्र तोपर्यंत बराच उशीर झाला होता. ते म्हणाले, 'अमेरिकेत वारसा कर आहे. कोणाकडे शंभर दशलक्ष डॉलर्सची संपत्ती असेल तर मृत्यूनंतर त्याची ४५ टक्के मालमत्ता मुलांना दिली जाते आणि ५५ टक्के सरकारकडे जाते. याचा सरळ अर्थ हयातीत निर्माण केलेल्या संपत्तीपैकी अर्धी संपत्ती मृत्यूनंतर जनतेसाठी सोडावी लागेल. भारतात असा कोणताही कायदा नाही.' या वक्तव्यावर बराच वाद झाल्यानंतर पित्रोदा यांनी स्पष्टीकरण दिले. टीव्हीवरील संभाषणात 'मी अमेरिकेच्या वारसा कराचा केवळ उदाहरण म्हणून उल्लेख केला होता. लोकांनी अशा मुद्यांवर चर्चा आणि वादविवाद करावा, असे मी म्हटले होते; याचा काँग्रेससह कोणत्याही पक्षाच्या धोरणाशी संबंध नाही,' असे त्यांनी नंतर म्हटले.

भाजपाच्या वतीने केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी जनतेला पित्रोदा यांच्या वक्तव्याचा गांभीर्याने विचार करण्याचे आवाहन केले. त्यांच्या वक्तव्याच्या निमित्ताने काँग्रेसचे छुपे मनसुबे उघड झाले असल्याचे त्यांनी सांगितले. लोकांनी अशा धोरणाबाबत काळजी घ्यावी आणि काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यातून सर्वेक्षणाचा उल्लेख मागे घ्यावा, असे आव्हान त्यांनी दिले. अन्य काही नेत्यांनीही पित्रोदा यांच्या विधानावर टीका केली. त्यामुळे काँग्रेसची अडचण वाढली. पित्रोदा यांच्या विधानापासून काँग्रेसने दूर राहणे पसंत केले. अर्थात वादग्रस्त विधान करण्याची पित्रोदा यांची ही पहिलीच वेळ नाही. २०१९ मध्ये त्यांनी शीख दंगलीवर असेच वादग्रस्त विधान केले होते. भारतीय जनता पक्षाच्या आरोपांवर ते म्हणाले होते की, '१९८४ चे काय, तुम्ही तुमच्या पहिल्या पाच वर्षांत काय केले याबद्दल बोला. १९८४ मध्ये झाले ते झाले...' या विधानावर बराच गदारोळ झाला होता.

२०१९ मध्येच त्यांनी आणखी एक विधान केले होते. 'मध्यमवर्गीयांनी स्वार्थी नसावे, त्यांनी जास्तीत जास्त कर भरण्याची तयारी ठेवावी. तरच मध्यमवर्गीय कुटुंबांना रोजगार आणि अधिक संधी मिळतील...' या त्यांच्या विधानामुळेही काँग्रेसच्या अडचणी वाढल्या होत्या आणि तेव्हाही त्यांच्या पक्षाला 'डॅमेज कंट्रोल' करावे लागले. पित्रोदा इथेच थांबले नाहीत. ते २०१९ च्या पुलवामा हल्ल्याबाबत बोलताना म्हणाले होते की, 'असे हल्ले होत राहतात. मुंबईतही हल्ला झाला होता.' त्यांनी बालाकोट हवाई हल्ल्याबाबतही पुरावे मागितले होते. २०२३ मध्ये पित्रोदा यांचे आणखी एक विधान काँग्रेसच्या गळ्यातला काटा ठरले. राम मंदिराबाबत ते म्हणाले होते की, 'बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य या समस्या मंदिरांच्या उभारणीने सुटणार नाहीत. आपल्या देशात बेरोजगारी, महागाई, शिक्षण यासारख्या समस्या आहेत; पण त्यावर कोणी बोलत नाही.' अमेरिकेत राहुल गांधी यांच्या उपस्थितीत पित्रोदा यांनी हे वक्तव्य केले होते. त्यांचे विधान कितीही योग्य असले तरी मंदिर आणि प्रार्थनास्थळ हा भारतीयांच्या भावनेचा विषय असतो आणि त्यांच्या भावनांना ठेच लागली की परिणाम वाईटच होतात.

वारसा करावरून मोदी यांनी काँग्रेसला धारेवर धरले. 'राजपुत्र' आणि 'राजघराण्या'चे सल्लागार (सॅम पित्रोदा) काही काळापूर्वी म्हणाले होते की, मध्यमवर्गीयांवर अधिक कर लावला पाहिजे. काँग्रेस म्हणते की, ते वारसा कर लादतील. पालकांकडून मिळालेल्या वारसा हक्कावरही कर लादला जाईल. कष्टाने जमवलेली संपत्ती मुलांना देणार नाही तर काँग्रेसचे सरकार आले तर ती तुमच्याकडून हिसकावून घेतली जाईल. त्यांनी काँग्रेसला संपत्तीचे पुनर्वितरण करण्याच्या मुद्याचा समावेश आपल्या जाहीरनाम्यात समाविष्ट करण्याचे आव्हान दिले. 'जीवनात काँग्रेसकडून लूट आणि आयुष्यानंतरही काँग्रेसकडून लूट,' अशी टीका त्यांनी केली.

भाजपाने आरोप केला की, गांधी घराण्याने त्यांच्या मुलांसाठी आणि सुनांसाठी मोठा खजिना निर्माण केला; पण त्यांना सामान्यजनांची कष्टाची संपत्ती हिसकावून घ्यायची आहे. गरीब आणि श्रीमंत यांच्यातील संपत्तीच्या वाटपावरून वादाची सुरुवात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केली तेव्हा सांगितले की, त्यांच्या पक्षाने देशातील विविध स्तरातील लोकसंख्येमध्ये संपत्ती वितरणाचे मूल्यांकन करण्यासाठी एक व्यापक आर्थिक आणि संस्थात्मक सर्वेक्षण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. दरम्यान, काँग्रेसच्या जाहीरनाम्यात म्हटले आहे की, एकीकडे श्रीमंत आणि दुसरीकडे गरीब व मध्यमवर्ग यांच्यातील असमानता वेगाने वाढली आहे. त्यामुळे समानता, सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या उद्दिष्टांना धक्का बसला आहे. भारताच्या सर्वोच्च एक टक्क्याने कमावलेल्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा आज जागतिक स्तरावर सर्वोच्च आहे. २०१४ आणि २०२३ दरम्यान असमानतेत वाढ दिसून आली. हे खरे असले तरी आर्थिक विषमता कमी कशी करायची, यावर खरे तर सत्ताधारी आणि विरोधकांनी एकत्र येऊन धोरण ठरवायला हवे. मात्र, त्याऐवजी असे वाद झडताना दिसतात. ▮▮

## वेध

**संजय रामगिरवार**

# 'एग सेल स्कल!'

शीर्षकावरून 'एग सेल स्कल' ही कुठल्यातरी व्यंजनाची रेसिपी असेल असे वाटणे स्वाभाविक आहे, पण तसे अजिबात नाही. कारण, हा कायद्याचा एक नियम आहे. हा नियम काय आहे, सध्या तो चर्चेत असण्याचे कारण काय, सर्वोच्च न्यायालयाने त्याबाबत काय म्हटले आहे आदी प्रश्नांच्या चर्चेसाठीच हा प्रपंच.

२३ एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालयाने एका याचिकेवर निकाल देताना समोर आलेला मुद्दा हा 'एग सेल स्कल' नियमांतर्गत येत नाही, असे म्हटले आहे. हा नियम वाढीव नुकसान भरपाई मागण्यासाठी पुढे केला जातो. जी याचिका सर्वोच्च न्यायालयासमोर आली त्यातून घडलेला प्रकार हा गंभीर वैद्यकीय दुर्लक्षिततेचा विषय होता, ज्यासाठी जिल्हा ग्राहक मंचाने ५ लाखाची नुकसान भरपाई देण्याचा आदेशही दिला होता. २००५ मध्ये हिमाचल प्रदेशच्या मंडी जिल्ह्यातील रहिवासी ज्योती देवी यांना 'अपेंडिक्स सर्जरी'साठी एका दवाखान्यात भरती करण्यात आले होते. त्यांच्यावर उपचार झालेत. मात्र दुखणे काही थांबत नव्हते. चार वर्षे त्यांनी त्या यातना सहन केल्या. विविध दवाखान्यांमध्ये उपचार घेतले. शेवटी चंडीगड येथील 'पोस्ट ग्रॅज्युएट इंस्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स' येथे तपासणीअंती ज्योती देवी यांच्या पोटात अडीच सेंटीमीटरची एक सुई राहून गेल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे त्यांना दुसरी सर्जरी करणे भाग होते. संबंधित दवाखान्यातील डॉक्टरांच्या दुर्लक्षितपणाचा हा परिपाक असल्याने ज्योती देवी यांनी जिल्हा ग्राहक मंचाकडे धाव घेतली आणि दुसऱ्या सर्जरीसाठी नुकसान भरपाई मागितली. मंचाने ५ लाखाचा मोबदला मान्यही केला.

परंतु, संबंधित दवाखान्याने मंचाच्या आदेशाविरुद्ध अपील केली. राज्य ग्राहक मंचाने नुकसान भरपाईची रक्कम कमी करून १ लाख रुपये देय ठरवली.



शेवटी विषय राष्ट्रीय ग्राहक विवाद निवारण आयोगाकडे गेला. आयोगाने नुकसान भरपाईची रक्कम वाढवून २ लाख रुपये केली. परंतु, हा निर्णय ज्योती देवी यांना मान्य नसल्याने त्यांनी सर्वोच्च न्यायालयाकडे धाव घेतली आणि 'एग सेल स्कल' नियमानुसार २० लाख रुपयांच्या नुकसान भरपाईची मागणी केली.

'एग सेल स्कल' नियम असे सांगतो की, एखादी व्यक्ती विशिष्ट परिस्थितीत असेल. त्यांना शरीराच्या ज्या भागात आधीच काहीतरी कमजोरी असेल त्या भागात कुणीतरी इजा करण्याचा प्रयत्न केल्यास आणि त्यामुळे पीडिताचे दुःख किंवा त्रास वाढला असल्यास ती व्यक्ती जास्तीची नुकसान भरपाई मागू शकते. ज्यांच्यामुळे पीडितास जास्तीचा त्रास झाला त्या व्यक्तीला रुग्णाची विशिष्ट स्थिती माहीत असो की नसो, तरीही त्या व्यक्तीला पीडितास किंवा रुग्णास वाढीव नुकसान भरपाई ही द्यावीच लागेल, असा हा नियम आहे. अधिक स्पष्ट करताना असे सांगितले जाते की, पीडित व्यक्तीच्या डोक्याच्या टणक भागावर कुणीतरी वार केला. मात्र, त्या व्यक्तीच्या डोक्याचा भाग टणक नसून तो अंड्याच्या सालीप्रमाणे नाजुक असेल, तर जरी वार कमी घातक असला तरी संबंधित रुग्णासाठी तो जास्त घातक ठरतो आणि अशावेळी नुकसान भरपाईची रक्कम अधिकची मागण्याचा अधिकार त्या पीडित रुग्णास असतो. नियमाचे स्पष्टीकरण करताना अंड्याची उपमा दिली गेल्यानेच या नियमास 'एग सेल स्कल' असे नाव पडले आहे.

ज्योती देवी यांच्या केसमध्ये मात्र सर्वोच्च न्यायालयाने हे अमान्य केले की, त्यांची स्थिती आधीच वाईट होती. मात्र, त्याचवेळी हे मान्य केले की संबंधित डॉक्टरांच्या दुर्लक्षितपणामुळे त्यांना त्रास झाला आणि त्यांचे नुकसान झाले आणि त्यामुळे जिल्हा ग्राहक मंचाने त्यांना देऊ केलेली पाच लाखाची रक्कम ही संबंधित दवाखान्याने दिलीच पाहिजे, असा निर्वाळा न्यायालयाने दिला.

खरे तर, या नियमाची उत्पत्ती ही १८९१ मध्ये अमेरिकेतील विस्कॉन्सिन या ठिकाणी वोसबर्ग विरुद्ध पुटनी प्रकरणी झाली. पुटनी नामक १२ वर्षाच्या मुलाच्या पायावर १४ वर्षीय वोसबर्ग याने लात मारली होती. हा सामान्य विषय असला तरी पुटनीच्या पायाला आधीच ईजा असल्याने वोसबर्ग याच्या प्रहारामुळे पाय मोडला. वोसबर्ग यास आधीच्या ईजेबाबत माहिती नव्हती तरीही या नियमानुसार न्यायमूर्ती विलियम पी. लियोन यांनी एकूण घडलेल्या गंभीर घटनेसाठी वोसबर्ग यास दोषी ठरवले आणि मोठ्या नुकसान भरपाईचे आदेश दिले.

हिंसाचाराला आळा घालण्यासाठी आणि कुठल्याही लहानशा घटनेतूनही गंभीर विषय उद्भवू शकतो आणि त्यासाठी आरोपीस मोठी किंमत चुकवावी लागू शकते, हे स्पष्ट करणारा हा नियम समाजासाठी योग्य मानला पाहिजे. ▮▮

९८८१७१७८३२

## प्रासंगिक

**मोरेश्वर बडगे**

# मोदी पक्के, काँग्रेस साधणार पराभवाची हॅट्ट्रिक

लोकसभा निवडणूक रंगात आली आहे. जोरदार चर्चा आहे, पंतप्रधान नरेंद्र मोदी या वेळेला हॅट्ट्रिक करणार का? सध्या हा रेकॉर्ड पंडित नेहरूंच्या नावावर आहे. नेहरू सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले होते. या विक्रमाची बरोबरी मोदी करणार का? मोदींनी स्वतःच जाहीर केल्याप्रमाणे भाजपा आणि त्यांची रालोआ ४०० पेक्षा अधिक जागा जिंकणार का? महाराष्ट्रात भाजपा आणि मित्रपक्षांनी ४५ पेक्षा अधिक जागा जिंकण्याचे लक्ष्य ठेवले आहे. आरपारच्या या लढाईकडे मोदी विरुद्ध राहुल गांधी असे पाहिले जात आहे. विरोधकांकडे बोलायला मुद्देच नाहीत. विरोधी पक्षनेते निराश आहेत, हताश आहेत. मुद्देच नसल्याने कंबरेखालची भाषा बोलत आहेत. महागाई, बेकारी असले बोथट झालेले मुद्दे विरोधी पक्ष चालवत आहेत. मोदींना घटना बदलायची आहे म्हणून त्यांना चारशे जागा हव्या आहेत, असे विरोधी नेते सांगतात. मात्र, त्यात दम नाही. डॉ. बाबासाहेब आले तरी घटना बदलणे शक्य नाही, असे खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदींनी स्पष्ट शब्दात सांगितले आहे. भाजपाने यावेळी आपल्या रणनीतीत थोडा बदल केला आहे. गेल्या दोन निवडणुकींत नरेंद्र मोदी हाच भाजपाचा चेहरा होता. यावेळीही मोदींच्याच नावावर मतं मागितली जात आहेत. उमेदवाराकडे पाहू नका. तुमचं प्रत्येक मत मोदींनाच मिळणार आहे, असे ठासून सांगितले जात आहे. त्यामुळे तुम्ही पाहाल. भाजपाच्या जागा वाढतील. चारसो पार तर होणारच. लोक मोदींना गेली दहा वर्षे पाहत आहेत. मोदीच देश सांभाळू शकतात, अशी लोकांची खात्री पटली आहे. आणखी पाच वर्षे देऊ नये, अशी कुठलीही गोष्ट त्यांच्या हातून घडलेली नाही. राहुल गांधी हे एक्स्पायरी डेट गेलेले नेते आहेत. घराण्याची परंपरागत अमेठीची जागा सोडून जो नेता केरळमध्ये सुरक्षित जागा शोधतो त्या राहुलबाबाला डोक्यावर घ्यायला देशाची जनता बुद्धू नाही. जे स्वतः सुरक्षित नाहीत ते जनतेला काय सुरक्षितता देणार? मोदींना हरवण्यासाठी गेली दहा वर्षे राहुल गांधींनी जंग जंग पछाडले. चौकीदार चोर है सांगून पाहिले. जमले नाही. यावेळी मोदींच्या विजयाच्या हॅट्ट्रिकसोबत राहुलबाबाच्या नेतृत्वात काँग्रेस पराभवाची हॅट्ट्रिक सेलिब्रेट करेल. मोदींच्या नेतृत्वात आपण सुरक्षित आहोत, अशी लोकांमध्ये सुप्त भावना आहे. साधी भाजी घेताना माणूस चारदा विचार करतो. येथे तर पाच वर्षांचा मामला आहे. मोदींच्या रूपात मिळणारी गॅरंटीच रालोआकडे तिसऱ्यांदा



देशाची सत्ता देणार आहे. मोदीही कुठली कसर बाकी ठेवायला तयार नाहीत. या आठवड्यात मोदी महाराष्ट्रात होते. दोन दिवसांत मोदींनी तब्बल सहा सभा केल्या. विरोधक यात वेगळी हवा शोधत आहेत. त्यांना वाटते मोदी घाबरले. पण मोदींचा तो स्वभाव नाही. कोणतेही काम हातात घेतले तर जास्तीत जास्त रिझल्ट देण्यावर त्यांचा भर असतो. उत्तर प्रदेशनंतर सर्वाधिक ४८ जागा महाराष्ट्रात आहेत. एकेक जागा मोदींनी प्रतिष्ठेची केली आहे. त्यामुळे मोदींचा मुक्काम वाढलेला दिसतो. त्या पलीकडे कोणी वेगळा अर्थ काढू नये. पण मोदींनी ज्या सभा केल्या त्यांनीही विरोधकांची पंढरी घाबरली आहे. तुल्यबळ विरोधी पक्ष आहे कुठे? शिल्लक राष्ट्रवादीचे शरद पवार आणि शिल्लक शिवसेनेचे उद्धव ठाकरे उसना आवेश आणतात खरे. दिवा विझण्याआधी फडफडतो, असे म्हटले जाते. तशी या दोघांची फडफड सुरू आहे. महाराष्ट्राने खूप निवडणुका पाहिल्या. मात्र, या निवडणुकीत बोलली जातेय् तेवढी शिवराळ भाषा महाराष्ट्राने कधी ऐकली नव्हती. कन्यामोहापोटी शरद पवार बारामतीत अडकले आहेत. उद्धव ठाकरे मोकळे आहेत. मोदींच्या रेसकोर्सवर झालेल्या सभेवर त्यांनी ज्या शिवराळ भाषेत टीका केली ती महाराष्ट्राची नक्कीच संस्कृती नाही. रेसकोर्सच्या सभेत घोडे नव्हते, गाढवं होती, असे उद्धव म्हणाले. देवेंद्र फडणवीसांना पुन्हा टरबूज म्हटले. मी नागपुरी आहे, त्यांच्यापेक्षाही खाली जाऊ शकतो, अशा शब्दात फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांना फटकारले, हे चांगले झाले. नागपूरच्या शिव्या मुंबईच्या लोकांना ठाऊक नसतील. पण त्या सुरू झाल्या तर एके ४७ ही लाजते. पण उद्धव अशीच शिवराळ भाषा बोलणार. आधी ते खोके खोके बोलत होते. त्यातून त्यांचे वैफल्य लक्षात येते. आता बोलायला मुद्दाच नाही. खोके मुळात नव्हतेच. त्यामुळे आता काय बोलायचे? तर शिवराळ भाषा सुरू आहे. कधी टरबूज म्हणतात तर कधी कलंक म्हणतात. खरे तर ही मेंटल हॉस्पिटलची केस आहे. बाळासाहेब ठाकरे नावाचा मोठा ब्रँड हातून गेला. पक्ष गेला, चिन्ह गेलं, मुख्यमंत्रिपद गेलं. सहकारी सोडून जात आहेत. परवा ठाकरेंच्या खास विश्वासातले रवींद्र वायकर गेले. आज शिंदे गटाचे उमेदवार आहेत. तुम्ही लिहून ठेवा. निवडणुकीनंतर फक्त मी व माझे कुटुंब अशी ठाकरेंची अवस्था असेल. उद्या मोदी येतील तेव्हा भाजपामध्ये घुसण्यासाठी याच शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्यात धक्काबुक्की होईल. शरद पवार म्हणा की उद्धव ठाकरे, दोघेही एकाच माळेचे मणी आहेत. मोदींनी शरद पवारांचे नाव न घेता त्यांचा उल्लेख भटकती आत्मा असा केला. गेली ४५ वर्षे घुटमळणाऱ्या या असंतुष्ट आत्म्याने महाराष्ट्राचे राजकारण अस्थिर करून ठेवले, असे मोदी म्हणाले. शेतमालाला भाव मिळत नाही म्हणून माझा आत्मा असंतुष्ट आहे, असे पवार म्हणाले. पवार तब्बल दहा वर्षे केंद्रात कृषी मंत्री होते. काही केले नाही. भाजपा-शिवसेना युतीला बहुमत मिळाले असताना उद्धव ठाकरे यांना अडकवून युतीत फुट पाडली. पवारांना कोणाचं काही चांगलं चालू असेल तर ते बघवत नाही. २०१४ साली याच पवारांनी मागितला नसताना फडणवीसांना सरकार बनवण्यासाठी बिनशर्त पाठिंबा जाहीर केला होता. पवार वाट्टेल ते बोलतात आणि मीडियावाले त्याला पवारांची गुगली म्हणतात. मोदींनी ही गुगली फोडून काढली. चांगले झाले. सोनाराच्या हातून कान टोचले. हा असंतुष्ट आत्मा सध्या आपल्या मुलीला निवडून आणण्यासाठी भटकतो आहे. त्यासाठी त्याने घरच्या सुनेला परकी ठरवले. बारामतीमध्ये सुप्रिया सुळे यांच्याविरोधात अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार उभ्या आहेत. पवार कुटुंबातच सत्तेचे महाभारत सुरू आहे. याच सुप्रिया सुळे यांनी दोन वर्षांपूर्वी 'अकेला देवेंद्र क्या करेगा?' असे म्हटले होते. हा अकेला काय काय करू शकतो ते फडणवीसांनी दाखवून दिले. लोक तर दूर, आज घरच्या सावल्याही त्यांच्यासोबत नाहीत. नियती उधारी ठेवत नाही. याच जन्मात हिशोब चुकवते. दस्तुरखुद्द राज ठाकरे यांनी महायुतीला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. राज ठाकरे यांच्याशी सामना आहे. उद्धव ठाकरे उठसुठ मुंबईवर हक्क सांगत होते. आता मुंबई कोणाची? याचाही निकाल ४ जूनलाच लागलेला असेल. ▮▮

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## कमी वीजदाबाचे शुक्लकाष्ठ!

'उकाड्यातही महानिर्मितीचा विक्रम' ही बातमी आकडेवारीसह प्रकाशित करून महानिर्मितीने आपली पाठ थोपटून घेतलीय् खरी! पण महावितरणद्वारे ही वीज ग्राहकांना किती दाबाने पुरवली जाते याचा पाठपुरावा, मागोवा घेतल्यास शाब्बासकीचा हात आखडता घेणे क्रमप्राप्त ठरावे; विशेषतः ग्रामीण भागात कमी दाबाने वीजपुरवठा ही दररोजची डोकेदुखी ठरण्याबरोबर काही भागांत तर अघोषित भारनियमनाला सामोरे जावे लागत असल्याच्या बातम्या थडकत आहेत. परिणामतः विद्युत शेतीपंप न चालण्याच्या समस्येला दररोज सामोरे जावे लागत आहे. उदाहरणार्थ वज्रेश्वरी, अकलोली (जिल्हा-ठाणे) विभागात सुमारे १६० ते १८० व्होल्ट्स दाबाच्या वीजपुरवठ्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी विहिरीतून पाणी काढण्याचा पंपही पाणी खेचण्याची क्षमता पूर्ण करू शकत नाही.

वास्तविक, वीजग्राहकांना २३० व्होल्ट्स दाबाने वीजपुरवठा करणे हे प्रामाणिकपणे वीज देयक भरणाऱ्या ग्राहकांप्रति महावितरणचे दायित्व होय. पण महानिर्मिती वीजनिर्मितीचे भले विक्रम करो, पण त्याचे (महा)वितरण जर वीजग्राहकांना नियमित दाब हक्काने मिळत नसेल तर ग्राहक हक्काचे तीनतेराच होय!

**किरण प्र. चौधरी**/९१५८८३९४१७

●● ●●

## स्वरगंधर्व सुधीर फडके

'स्वरगंधर्व सुधीर फडके' हा चित्रपट पाहिला आणि खरोखरच एक अप्रतिम कलाकृती पहाण्याचं समाधान व आनंद मिळाला. सुधीर फडके अर्थात आपले बाबूजी यांची सगळीच गाणी, त्यांनी दिलेलं संगीत अजरामर आहे, हे सर्वश्रुतच आहे. लहानपणापासून बाबूजींची गाणी ऐकत आलो आहोत. चित्रपट पहाताना त्या सगळ्या आठवणी जागृत झाल्यात व सगळी गाणी ऐकताना डोळे पाणावले. स्वर आले जुळुनी, जुळल्या सगळ्या त्या आठवणी...

गीत रामायणाच्या इतिहासाचे पण दर्शन घडले. तसेच या चित्रपटातून बाबूजींच्या संघर्षमय आयुष्याचा उलगडा झाला. त्यांची संघनिष्ठा तसेच वीर सावरकरांवरचे अतूट प्रेम याची नव्यानेच ओळख झाली. मला तरी पुष्कळ गोष्टींची माहिती नव्हती. बाबूजींच्या पत्नी ललिताबाईंचा त्यांच्या आयुष्यात किती मोठा सहभाग होता, हे पण खूप छान दाखवलं आहे. मृण्मयी देशपांडेंनी ललिताबाईंची भूमिका बखूबी निभावली आहे. चित्रपटाचे दिग्दर्शक, सर्वच दिग्गज कलाकार आणि त्यांनी सादर केलेली कलाकृती अतिशय कौतुकास्पद आहे, त्याबद्दल या सर्वांचेच खूप अभिनंदन. तरुणपणातील सुधीरजींची भूमिका आदिश वैद्यने खूपच छान साकारली तसेच सुनील बर्वेने बाबूजींचा साक्षात्कारच घडविला. सगळ्या कलाकारांची निवड उत्कृष्ट व कलाकृती अतिशय उत्तम! अशा आपल्या महाराष्ट्रातील या स्वरगंधर्व महागायकाचा हा जीवनपट बघण्याचा अनुभव व आनंद सगळ्यांनीच घ्यावा.

**अलका देशमुख**/नागपूर

## वाचक पत्रे

## १५-जी व १५-एच बाबत...


बँकेमधील बचतीवर करकपात होऊ नये याकरिता दरवर्षी एप्रिल महिन्यात सर्वसामान्य १५-जी ग्राहक व १५-एच ज्येष्ठ नागरिकांना बँकेत भरून द्यावा लागतो. बँकेची ग्राहक संख्या भरपूर आहे. एप्रिल महिन्यात बँकांना जवळपास १५ दिवस सुट्या असतात; त्यामुळे अनेकांना फॉर्म भरण्यापासून वंचित राहावे लागते. तेव्हा एप्रिल व मे हे दोन महिने १५-जी व १५-एच फॉर्म सादर करण्याकरिता असावे. याकरिता संबंधित विभागाने लक्ष द्यावे, ही विनंती.

**मुकुंद नागोराव काकीरवार**/८८०६९९२७७८

●● ●●

## दान पेटी नव्हे, समर्पण पेटी!

कलर्स मराठी वाहिनीवर दाखविली जाणारी मालिका - इंद्रायणीमधे एक नवीन विचार ऐकावयास मिळाला, जो मननीय आहे. आपल्या मंदिरांमधे पैसे टाकण्यासाठी एक पेटी ठेवलेली असते व त्यावर 'दान पेटी' असे लिहिलेले असते. वास्तविक, मंदिरात जाणारा हा भक्त या नात्याने तिथे जात असतो. एक दाता म्हणून नव्हे. आपल्याजवळ जे काही आहे, ते परमेश्वरी कृपेमुळे आहे अशी आपली श्रद्धा असते व त्यामुळे आपण मंदिरात जाताना समर्पणाचा भाव मनात बाळगतो, वा तसा तो असायला हवा. दान देण्याच्या भूमिकेत असणारा मनुष्य नकळत स्वतःला जरा वरच्या पातळीवर नेऊन ठेवतो, जे योग्य नाही. म्हणून पेटीवर 'समर्पण पेटी' असे लिहिलेले असावे, असा हा विचार आहे. त्यायोगे मनात विनम्रतेचा भाव जागृत होण्यास मदत होईल. सर्व मंदिरांच्या व्यवस्थापन समितींनी हा विचार अमलात आणावा, असे सुचवावेसे वाटते. ▮▮



**रवींद्र पंडित**/८४२४९८४३५०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

# ‘ड्राय डे’च्या दिवशी नोंदविले २९ गुन्हे

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ मे**

महाराष्ट्र दिनी असलेल्या ड्राय डे (कोरड्या दिवस) च्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क विभागाने एक मे रोजी जिल्हाभरात राबविलेल्या मोहिमेत २९ गुन्ह्यात सतराशे लिटर दारूसह सव्वातीन लाखांचा मुद्देमाल जप्त केला.



लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून अवैध दारूविरुद्ध सातत्याने कारवाई करण्यात येत असून महाराष्ट्र दिनानिमित्त ड्राय डे चे औचित्य साधून जिल्हाभरात राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत सोलापूर शहरातील जोडभावी पेठ येथे मौलाली अब्दुल करीम बनकरी याच्या ताब्यातून २१५ लिटर हातभट्टी दारू व घोंगडे वस्ती येथून प्रवीण पांडुरंग खैरमकोंडा याच्या ताब्यातून १४० लिटर हातभट्टी दारू जप्त केली. बुधवार पेठ परिसरात शेषपाल किरण सदाफुले याच्या ताब्यातून ४८ लिटर देशी दारू, ५६ लिटर विदेशी दारू व ६६ लिटर बियर असा एकूण नव्वद हजार पाचशे दहा रुपये किमतीचा दारू साठा जप्त केला.

दत्तनगर येथून इमरान विजापुरे याच्या ताब्यातून १५० लिटर व शनिवार पेठ येथून हैदर साहब जरतार याच्या ताब्यातून ४७ लिटर हातभट्टी दारू जप्त केली. तसेच सोलापूर विजापूर रोडवरील हॉटेल चिंतामणीच्या बाजूस मोकळ्या जागेत नागनाथ अंजप्पा म्हेत्रे याच्या ताब्यातून विदेशी दारूच्या चौदा बाटल्या जप्त केल्या. कुंभारी परिसरात छापा टाकून इस्माईल सय्यद याच्या ताब्यातून ५० लिटर हातभट्टी दारू व सुरेश बगले याच्या ताब्यातून साडेबारा लिटर देशी दारू व साडेतीन लिटर विदेशी दारूचा साठा जप्त केला. कासेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथे नरेश पांडुरंग घाडगे याच्या धाब्यावर छापा टाकून त्याच्या ताब्यातून सव्वा दोन लिटर विदेशी दारू साठा जप्त केला. कुंभारी परिसरातून प्रकाश अमत उमशेट्टी याच्या ताब्यातून ४० लिटर व राजू कोळी याच्या ताब्यातून ३५ लिटर हातभट्टी दारू जप्त करण्यात आली. करून त्यांचे विरुद्ध गुन्हा दाखल केला. उळे गावाचे हद्दीत भारत बाबू भोसले याच्या धाब्यावरून साडेतीन लिटर देशी दारू जप्त केली.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने सोलापूर शहर परिसरातील विविध ठिकाणी टाकलेल्या छाप्यात परवेज अब्दुल दफेदार, सिद्धेश्वर कलप्पा दुरुगकर, तमन्ना विश्वनाथ रामपुरे, यल्लाप्पा सुहास बनसोडे, अंजनाबाई हनुमंत गायकवाड व निर्मला परमानंद जाधव तसेच सोरेगाव परिसरातून शिवानंद राजू हेबळे यांना हातभट्टी दारूची विक्री करताना पकडले. या कारवाईत भरारी पथकाने २९० लिटर हातभट्टी दारूसह एकूण ३२ हजार ६९० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला. नांदणी येथील सीमा तपासणी नाका पथकाने बरुर या ठिकाणी हॉटेल संगम या ठिकाणी छापा टाकून देशी-विदेशी दारू जप्त केली. सीमा तपासणी नाक्याच्या पथकाने अक्कलकोट तालुक्यातील सुलेरजवळगी या ठिकाणी छापा टाकून मीना वसंत गायकवाड या महिलेच्या ताब्यातून १४ लिटर हातभट्टी दारू जप्त केली. याच पथकाने कुंभारी परिसरात दोन ठिकाणी छापे टाकून पद्मा विजयकुमार दासी हीच्या ताब्यातून ४२ लिटर हातभट्टी दारू व विठ्ठल रामय्या मडास याच्या ताब्यातून ११० लिटर ताडी जप्त करून गुन्हा नोंदवला. पंढरपूर विभागाच्या पथकाने सुगाव (भोसे) ता. पंढरपूर येथे धर्मराज अंकुश माने याला मोटरसायकलीवरून १८० लिटर हातभट्टी दारू वाहतूक करताना पकडले. कविटगाव (ता. करमाळा) येथून चिंटू भास्कर डुकले याच्या ताब्यातून सहा लिटर विदेशी दारू व ५५ लिटर ताडी जप्त केली. माळशिरस तालुक्यातील सदाशिवनगर या ठिकाणी समाधान नामदेव सुरवसे याच्या ताब्यातून पावणेसात लिटर देशी दारू व चंद्रकांत भीमराव तोरणे याच्या ताब्यातून ७५ लिटर ताडी जप्त केली. सदाशिवनगर परिसरात दत्तात्रय सुदाम देवकुळे याच्या ताब्यातून ३० लिटर हातभट्टी दारू साठा जप्त केला. सांगोला तालुक्यातील वाटंबरे येथून मालन सदाशिव गेजगे या महिलेच्या ताब्यातून साडेसात लिटर देशी दारू जप्त केली. महाराष्ट्र दिनी राबवलेल्या विशेष मोहिमेत २९ गुन्ह्यात विभागाने एका मोटरसायकलीसह तीन लाख तेविस हजार एकशे तेहतीस रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

ही कारवाई अधिक्षक नितीन धार्मिक यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक जगन्नाथ पाटील, नंदकुमार जाधव, दुय्यम निरीक्षक अंजली सरवदे, धनाजी पोवार, समाधान शेळके, सुखदेव सिद, श्रध्दा गडदे, दत्तात्रय पाटील, सचिन भवड, बाळू नेवसे, सौरभ भोसले यांच्या पथकांनी केली.



### आचारसंहिता कालावधीत ३५९ गुन्ह्यात १ कोटी पंधरा लाखांचा मुद्देमाल जप्त...

लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहिता कालावधीत राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून ३५९ गुन्हे नोंदविण्यात आले असून २९२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या कालावधीत विभागाने अकरा हजार तिनशे पंचवीस लिटर हातभट्टी दारु, एक लाख शेहेचाळीस हजार सातशे वीस लिटर रसायन, साडे सहाशे लिटर देशी दारु, पाऊणे तिनशे लिटर विदेशी दारु, एकशे पासष्ट लिटर बीअर, सोळाशे लिटर ताडी, अडीचशे लिटर गोवा राज्याची दारु व ४१ वाहने असा एकूण एक कोटी पंधरा लाख बारा हजारांचा मुद्देमाल जप्त केला असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिक्षक नितीन धार्मिक यांनी सांगितले.

---

स्पे.मु.नं. १६७/२०१७
नि.१२

### जाहीर समन्स

### सोलापूर येथील मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन (श्रीमती कौठुळे सो।) यांचे कोर्टात

**कॅनरा बँक, सरस्वती चौक, सोलापूर - वादी**
विरुध्द
**श्री. पंडीत सिद्राम सलगरे - प्रतिवादी**

**प्रतिवादी** - श्री. पंडीत सिद्राम सलगरे
वय ३२ वर्षे, धंदा ऑटो रिक्शा सर्व्हिस,
रा. ७३, आवसेकर वस्ती, स्वामी वस्ती, शेळगी, सोलापूर

ज्याअर्थी, यातील वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द रक्कम वसूलीचा दावा दाखल केला आहे. सदर कामी तुम्ही प्रतिवादी यांना समन्स/नोटीसा बजावणीसाठी पाठविले असता सदर ठिकाणी राहत नसल्यामुळे न बजावलेबद्दल बेलिफ रिपोर्ट आलेला आहे. तसेच अर्जदाराच्या माहितीप्रमाणे त्यांना माहिती असलेला तुमचा राहण्याचा वर नमूद केलेला शेवटचा पत्ता आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीसीने तुम्हांस कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत तुमची कांही हरकत असल्यास अथवा उक्त अर्जाच्या पृष्ठयर्थ अथवा विरुध्द तुमचे कांही म्हणणे असल्यास तुम्ही ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून मे. कोर्टानी नेमलेली तारीख १०/०६/२०२४ रोजी स्वत अथवा आपल्या वकीलामार्फत या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजून उक्त अर्जाचे कामी पुढील आदेश में कोर्टातर्फे देण्यात येईल.

आज दिनांक माहे इसवी सन ३०/०४/२०२४ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले.

**सही/-**
**लिपीक**

(कोर्टाचा शिक्का)

**सही/-**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधीश व. स्तर सोलापूर**

---

रे.मु.नं. ४५७/२०२१

### जाहीर समन्स

### सोलापूर येथील मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन (श्री. वराडे सो।) यांचे कोर्टात

**कॅनरा बँक, एस.एम.ई. - वादी**
अशोक चौक, सोलापूर
विरूध्द
**विनायक श्रीकांत जाधव - प्रतिवादी**

**प्रतिवादी** :- विनायक श्रीकांत जाधव
वय : ३४ वर्षे, धंदा नोकरी,
रा.घर नं.२, साक्षी रेसिडेन्सी,
वेदांत नगर, सोलापूर.

ज्याअर्थी, यातील वादी यांनी प्रतिवादी यांचेविरूध्द रक्कम वसूलीचा दावा दाखल केला आहे. सदरकामी तुम्ही प्रतिवादी यांना समन्स / नोटीसा बजावणीसाठी पाठविले असता, सदर ठिकाणी राहत नसल्यामुळे न बजावलेबद्दल बेलिफ रिपोर्ट आलेला आहे. तसेच अर्जदाराच्या माहितीप्रमाणे त्यांना माहिती असलेला तुमचा राहण्याचा वर नमूद केलेला शेवटचा पत्ता आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीसीने तुम्हांस कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत तुमची कांही हरकत असल्यास अथवा उक्त अर्जाच्या पृष्ठयर्थ अथवा विरूध्द तुमचे कांही म्हणणे असल्यास तुम्ही ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून मे. कोर्टानी नेमलेली तारीख १०/०६/२०२४ रोजी स्वतः अथवा आपल्या वकिलांमार्फत या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी अन्यथा कोणाची कांहीही हरकत नाही, असे समजून उक्त अर्जाचे कामी पुढील आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल.

आज दिनांक माहे इसवी सन २३/०४/२०२४ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले.

**सही/-**
**लिपीक**

(कोर्टाचा शिक्का)

**सही/-**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधीश व. स्तर सोलापूर**

---

## महाराष्ट्र विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२ मे**

महाराष्ट्र विद्यालय बार्शीमधील विद्यार्थ्यांनी इयत्ता ५ वी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये ७२ विद्यार्थी पात्र झाले तर ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये ६२ विद्यार्थी पात्र झाले.

इयत्ता ५ वीसाठी जी.एम. देशपांडे, एस. डब्ल्यू. करंजकर, स्वप्निल पाटील, पी. एस. जाधव व ए.आर.जाधव तर ८ वीसाठी जी. एम. देशपांडे, एस.एम.डिसले व ए.व्ही. पवार या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.बी.वाय. यादव, उपाध्यक्ष एन.एन. जगदाळे, संस्थेचे सचिव पी.टी.पाटील, सहसचिव ए.पी.देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व्ही.एस.पाटील, बी.के.भालके, प्राचार्या के.डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर.बी. सपताळे, पर्यवेक्षक एस.सी. महामुनी, पर्यवेक्षिका एन.बी.साठे यांनी अभिनंदन केले.

## शिष्यवृत्ती परीक्षेत निलेगाव शाळेचे यश

**अणदूर, दि.२ मे-**

इयत्ता पाचवी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निलेगावचे ११ विद्यार्थी पात्र झाले. सुवर्णा कुरणे, आल्फीया सगरी, आयेशा पटेल, कीर्ती शिंदे, स्नेहा मुळे, रागिणी कोळी, समृद्धी स्वामी, नोमान शेख, आरव मुळे, ऋतिका दूधभाते, सुहाना चौधरी यांचा समावेश आहे. त्यांचे शालेय समिती अध्यक्ष समद पटेल, मुख्याध्यापक शिवाजी जाधव, सरपंच शंकर जमादार यांनी अभिनंदन केले.

---

### जाहीर प्रसिध्दीकरण

**अर्ज वारस दाखला मिळणेबाबत**
दि.कि.अर्ज नं.३४/२०२४
नि.नं.५

### बार्शी येथील मे. सिव्हील जज्जे ज्युनिअर डिव्हीजन सो. यांचे कोर्टात

**रोहिणी उर्फ मिना राजू कांबळे,**
**वय- ४८ वर्षे, धंदा - घरकाम,**
**रा. शामराव नगर, सिध्दीविनायक चौक,**
**सांगली, ता. जि. सांगली --- अर्जदार**
**विरूध्द**
**कोणी नाही --- सा.वाला**

**ज्या अर्थी,**

यातील अर्जदार यांनी शाम प्रभाकर घोलप हे दि. २७/०३/२००९ रोजी मयत झालेने मे. कोर्टात यातील अर्जदार यांना मयत शाम प्रभाकर घोलप यांचे पश्चात मौजे अलिपूर, ता. बार्शी या ठिकाणी गट नंबर ११ पैकी ०.०१.५० आर या मिळकतीवर अर्जदार यांचे नांव लावणेकरीता अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी,

सदर अर्जदार यांचे व्यतिरीक्त मयत शाम प्रभाकर घोलप यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. ०६।१५/२०२४ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

**कळावे हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सही शिक्कयानिशी दिले असे. ता.०६/०४/२४**

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

(कोर्टाचा शिक्का)

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी**

---

**नगरपंचायत, वैराग**
**दि. २३/०४/२०२४**
**जा.नं. १२८१**
**फा.नं. नामांतरण १८०९/२०२४**

### जाहीर प्रगटन

सर्व नागरिकांना कळविले जाते की, श्री. समाधान कालिदास बचुटे, सि.स.नं. - गट नं. १९४ प्लॉट नं. १७ न.प. मिळकत नं. १२१७/२५ चे वर नामांतर करिता अर्ज दाखल केला आहे. त्याची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

**पूर्व** - अरुण गारे, **पश्चिम** - बजरंग कदम
**दक्षिण** - मारुती राणे, **उत्तर** - मोहन पोळ

वरीलप्रमाणे नामांतरणाबाबत ज्या कोणास जो काही आक्षेप असेल तो (१५) दिवसाचे आत इकडील कार्यालयास दाखल करावा नसता मुदतीनंतर कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**वैराग, नगरपंचायत वैराग**

---

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

### ‘ई’ निविदा सूचना

मान्यताप्राप्त अनुभवी कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता निविदा मागवण्यात येत आहेत. इतर सर्व निविदा माहिती **https://tender.mahadiscom.in/eatApp** या वेबसाईटवर उपलब्ध आहे. निम्नस्वाक्षरीधारकांकडे कोणतेही कारण न देता निविदा रद्द करणेबाबत अधिकार राखून ठेवले आहेत.

| अ. क्र. | निविदा क्रमांक | कामाचे स्वरूप | निविदा रक्कम | अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| ०१ | EE/PPR/T-01/2024-25 | RSJ/PSC पोल, वितरण रोहित्र, मिटर्स, ऑईल बॅरल वाहतूक व इतर साहित्याची चढ / उतार | १० लाख | 10.05.2024 |

ई निविदा, बयाणा रक्कम ऑनलाईन भरून सर्व तपशीलासह व विहित नमुन्यात सादर करावी.
**ऑफिसचा पत्ता :–** कार्यकारी अभियंता, पोल फॅक्टरी जवळ, लिंक रोड, पंढरपूर, ता. पंढरपूर जि. सोलापूर

**PRO / BMTZ / 16 / 2024-25** **कार्यकारी अभियंता, महावितरण (संवसु) विभाग पंढरपूर**

---

### प्रपत्र क-१

(उमेदवाराने वृत्तपत्रे, दूरदर्शने यामध्ये प्रसिध्द करण्यासाठी)

**फौजदारी प्रकरणांबाबतचे घोषणापत्र**

माननीय सर्वोच्च न्यायालयाने २०११ ची रिट विनंती याचिका (दिवाणी) क्रमांक ५३६ (पब्लिक इंटरेस्ट फाउंडेशन आणि इतर विरुध्द युनियन ऑफ इंडिया व इतर) या प्रकरणी दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार

उमेदवाराचे नाव : **श्री. राम विठ्ठल सातपुते**
पत्ता : **श्रीराम निवास, ५० फाटा मांडवे, ता. माळशिरस, जि. सोलापूर**
राजकीय पक्षाचे नाव : **भारतीय जनता पार्टी**
निवडणुकीचे नाव : **लोकसभा निवडणूक २०२४**
मतदारसंघाचे नाव : **४२- सोलापूर (अनुसूचित जाती) लोकसभा मतदारसंघ**

मी, **श्री. राम विठ्ठल सातपुते,** वर नमूद केलेल्या निवडणुकीचा उमेदवार असून, माझ्या फौजदारी पूर्व चरित्रबद्दलचा पुढील तपशील जनतेच्या माहितीसाठी घोषित करीत आहे.

| अ.क्र. | (अ) प्रलंबित फौजदारी प्रकरणे | | |
|---|---|---|---|
| | न्यायालयाचे नाव | प्रकरण क्रमांक व दिनांक | प्रकरणाची सद्यस्थिती संबंधित अधिनियमांचे कलम (अधिनियमांची कलमे) आणि अपराधाचे (अपराधांचे) थोडक्यात वर्णन |
| १ | ३- जॉईंट सिव्हिल जज् ज्यु.डी. ॲंड जे.एम.एफ.सी. | खटला क्र. एस.सी.सी. २४०४६/२०१७ | इंडियन पिनल कोड १४७, १४३, ३२३, ३५३, ५०४, ३४ बॉम्बे पोलीस ॲक्ट ३७ (३) आर. डब्ल्यू.१३५ विद्यार्थी आंदोलन |
| २ | १८ ज्युडी. वर्ग-१, पुणे | खटला क्र. आर.सी.सी. ३४९६/२०१८ | इंडियन पिनल कोड १४३, १४७, १४९, ३२३, ३३६, ३४१ बॉम्बे पोलीस ॲक्ट-१३५ विद्यार्थी आंदोलन |
| ३ | १८ ज्युडी.मॅजे. वर्ग-१, पुणे | खटला क्र. एस.सी.सी. ४२०११८/२०१३ | इंडियन पिनल कोड १४३, १४७, ३२३, ५०४, १४९ विद्यार्थी आंदोलन |
| ४ | जे.एम.एफ.सी. सोलापूर | खटला क्र. एस.सी.सी. ६२७७/२०२३ | इंडियन पिनल कोड ३३६, १८८, २६९, २७० सह आपत्ती व्यवस्थापन ५१ (ब) रोग अधिनियम कलम ३ आणि म.पो. अधिनियम १३५ आंदोलन |

---

## Phoenix ARC Private Limited

**Regd. Office:**3rd Floor, Wallace Tower 139-140/B/1, Crossing of Sahar Road and Western Express Highway Vile Parle (East) Mumbai-400 057 **Tel:** 022- 6849 2450, **CIN: U67190MH2007PTC168303**
**Fax :** 022- 6741 2313 **Email**: info@phoenixarc.co.in, **Website:** www.phoenixarc.co.in.
Assigned by

## Motilal Oswal Home Finance Limited

**Corporate Office :**Motilal Oswal Tower, Rahimtullah Sayani Road, Opposite ST Depot, Prabhadevi, Mumbai-400025.

MOTILAL OSWAL HOME LOANS

### ई-लिलाव व विक्रीसाठी सार्वजनिक सूचना

**सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ आणि ९ च्या तरतुदीसह वाचलेल्या आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ३० दिवसांची ई-लिलाव विक्री सूचना.**

याद्वारे सामान्यतः जनतेला आणि विशेषतः कर्जदार/जामीनदार/गहाणदारांना नोटीस देण्यात आली आहे की, मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड (आधी अस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन म्हणून ओळखले जात असे मर्यादित -असाइनर) थकबाकी आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इत्यादींच्या वसुलीसाठी ऑनलाइन ई-लिलाव द्वारे जेथे आहे तसे, जसे आहे तसे, आणि जे काही आहे वर विकले जाईल. SRFESI कायद्याच्या तरतुदींच्या संदर्भात खालील तपशीलानुसार https://www.auctionbazaar.com/ वेबसाइटद्वारे सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ आणि ९ सह वाचले आहे.

| कर्जदार/जामीनदार/ कर्ज खाते | मागणी सूचना तारीख आणि रक्कम | अचल मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत, EMD आणि शेवटची तारीख EMD सादर करणे | ई-लिलावची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|
| **LAN: LXKT00316 -170025545**<br>शाखा : कात्रज<br>कर्जदार :<br>**निवृत्ती मारुती माळी**<br>सह-कर्जदार:<br>**किशोर मारुती माळी** | **24-03-2018** च्या साठी रुपये: **1389055**/- (रुपये तेरा लाख एकोणनव्वद हजार पंचावन्न फक्त) | फ्लॅट क्रमांक G-65, 7 वा Fr, मुद्रा सन सिटी, S.No 154/2/1 154/1/2 S.No 152/1/2 D-1 pt, अक्कलकोट रोड गाव सोलापूर, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर नडगिरी पेट्रोल जवळ पंप 413001 उत्तर सोलापूर महाराष्ट्र | राखीव किंमत: रु.3500000/- (फक्त पस्तीस लाख)<br>EMD: रु. 350000/- (तीन लाख पन्नास हजार फक्त)<br>EMD ची शेवटची तारीख ठेव: 06-06-2024 | तारीख: 07-06-2024 सकाळचे 11:00 05:00 Pm पर्यंत (अमर्यादित विस्तार 5 मिनिटांचा प्रत्येक) |
| **LAN: LXDU00115-160011653**<br>शाखा: बारामती<br>कर्जदार: **अशोक शहाजी मांडले**<br>सह-कर्जदार:<br>**राजश्री अशोक मांदळे** | **04-05-2019** च्या साठी रु: **1522220**/- (रुपये पंधरा लाख बावीस हजार दोनशे वीस फक्त) | गॅट क्रमांक 624 मु. नातेपुते जवळ शिक्षक कॉलनी वालचंदनगर रोड टीचर कॉलनी जवळ 413109 सोलापूर महाराष्ट्र | राखीव किंमत: रु.3200000/- (फक्त बत्तीस लाख)<br>EMD: रु. 320000/- (तीन लाख वीस हजार फक्त)<br>EMD ची शेवटची तारीख ठेव: 06-06-2024 | तारीख: 07-06-2024 सकाळचे 11:00 05:00 Pm पर्यंत (अमर्यादित विस्तार 5 मिनिटांचा प्रत्येक) |
| **LN: LXDU00417-180064697**<br>शाखा: बारामती<br>कर्जदार:<br>**विजय महावीर गायकवाड**<br>सह-कर्जदार:<br>**सुरेखा विजय गायकवाड** | **14-08-2018** च्या साठी रु: **784594/-** (रुपये सात लाख चौऱ्याऐंशी हजार पाचशे चौऱ्याण्णव फक्त) | दूध 189, मु. दूधकलवाडी, जवळ मिस्कीनवस्ती, ता. माढा, जिल्हा- सोलापूर/ मिस्कीनवस्ती जवळ / 413211 सोलापूर महाराष्ट्र | राखीव किंमत: रु.2000000/- (फक्त वीस लाख)<br>EMD: रु. 200000/- (दोन लाख फक्त)<br>EMD ची शेवटची तारीख ठेव: 06-06-2024 | तारीख: 07-06-2024 सकाळचे 11:00 05:00 Pm पर्यंत (अमर्यादित विस्तार 5 मिनिटांचा प्रत्येक) |
| **LN: LXDU00416-170031487**<br>शाखा: बारामती<br>कर्जदार:<br>**तानाजी भागवत सलगर**<br>सह-कर्जदार:<br>**भागवत नामदेव सलगर** | **14-08-2018** च्या साठी रुपये: **669873/-** (रुपये सहा लाख एकोणसत्तर हजार आठशे त्र्याहत्तर फक्त) | गट क्रमांक 33/1बी, मु आलेगोन KH जवळ प्राथमिक शाळा, आलेगाव KH बावडा रोड, सोलापूर जवळ प्राथमिक शाळा 413008 सोलापूर महाराष्ट्र | राखीव किंमत: रु.1700000/- (फक्त सतरा लाख)<br>EMD: रु. 1700000/- (सतरा लाख फक्त)<br>EMD ची शेवटची तारीख ठेव: 06-06-2024 | तारीख: 07-06-2024 सकाळचे 11:00 05:00 Pm पर्यंत (अमर्यादित विस्तार 5 मिनिटांचा प्रत्येक) |
| **LN: LXDU00417 -180063809**<br>शाखा: बारामती<br>कर्जदार:<br>**विकास अण्णा गायकवाड**<br>सह-कर्जदार :<br>**कौशल्या अण्णा गायकवाड** | **21-12-2018** च्या साठी रु: **691223/-** (रुपये सहा लाख एक्याणव हजार दोनशे तेवीस फक्त) | मिळकत नंबर 191 मिटकलवाडी येथे मिस्कीनवस्ती ता.माढा जिल्हा सोलापूर 413211 सोलापूर महाराष्ट्र | राखीव किंमत: रु.1700000/- (फक्त सतरा लाख)<br>EMD: रु. 170000/- (फक्त एक लाख सत्तर हजार)<br>EMD ची शेवटची तारीख ठेव: 06-06-2024 | तारीख: 07-06-2024 सकाळचे 11:00 05:00 Pm पर्यंत (अमर्यादित विस्तार 5 मिनिटांचा प्रत्येक) |
| **LN: LXDU00416-170049654**<br>शाखा: बारामती<br>कर्जदार:<br>**नवनाथ उत्रेश्वर देवकर**<br>सह-कर्जदार:<br>**मंगल नवनाथ देवकर** | **15-11-2019** च्या साठी रु: **998519/-** (रुपये नऊ लाख अठ्ठ्याण्णव हजार पाचशे एकोणीस फक्त ) | मिळकत नंबर/ 1071, मु. मिटकलवाडी, लोखरे वस्ती, प्राथमिक शाळेजवळ, माढा, सोलापूर, महाराष्ट्र - 413101 | राखीव किंमत: रु.1600000/- (फक्त सोळा लाख)<br>EMD: रु. 160000/- (एक लाख साठ हजार फक्त)<br>EMD ची शेवटची तारीख ठेव: 06-06-2024 | तारीख: 07-06-2024 सकाळचे 11:00 05:00 Pm पर्यंत (अमर्यादित विस्तार 5 मिनिटांचा प्रत्येक) |
| **LN: LXDU00417 -180069198**<br>शाखा: बारामती<br>कर्जदार:<br>**विक्रम अर्जुन सलगर**<br>सह-कर्जदार:<br>**मनिषा विक्रम सलगर** | **26-03-2019** च्या साठी रु: **680234/-** (रुपये सहा लाख ऐंशी हजार दोनशे चौतीस फक्त) | पोस्टावर मिळकत क्र.9 चव्हाणवाडी मळा सोलापूर 413211 महाराष्ट्र | राखीव किंमत: रु.1500000/- (फक्त पंधरा लाख)<br>EMD: रु. 150000/- (एक लाख पन्नास हजार फक्त)<br>EMD ची शेवटची तारीख ठेव: 06-06-2024 | तारीख: 07-06-2024 सकाळचे 11:00 05:00 Pm पर्यंत (अमर्यादित विस्तार 5 मिनिटांचा प्रत्येक) |
| **LN: LXSOL00216-170048757**<br>शाखा : सोलापूर<br>कर्जदार:<br>**शरद सुभाष सपाटे**<br>सह-कर्जदार:<br>**सुभास रामराव सपाटे** | **02-04-2018** च्या साठी रु: **531857/-** (रुपये पाच लाख एकतीस हजार आठशे सत्तावन्न फक्त) | जीपीएच क्रमांक 582, उपळवते, सोलापूर महाराष्ट्र भारत 413209 | राखीव किंमत: रु.1400000/- (चौदा लाख फक्त)<br>EMD: रु.140000/- (एक लाख चाळीस हजार फक्त)<br>EMD ची शेवटची तारीख ठेव: 06-06-2024 | तारीख: 07-06-2024 सकाळचे 11:00 05:00 Pm पर्यंत (अमर्यादित विस्तार 5 मिनिटांचा प्रत्येक) |
| **LN: LXDU00417 -180069018**<br>शाखा: बारामती<br>कर्जदार:<br>**लक्ष्मण सुभाष माने**<br>सह-कर्जदार:<br>**माधुरी लक्ष्मण माने** | **26-03-2019** च्या साठी रु: **567421/-** (रुपये पाच लाख सदुसष्ट हजार चारशे एकवीस फक्त) | मिळकत नंबर/1469 मु. पोस्ट बेंबळे मळा सोलापूर 413211 महाराष्ट्र | राखीव किंमत: रु.1300000/- (तेरा लाख फक्त)<br>EMD: रु. 130000/- (एक लाख तीस हजार फक्त)<br>EMD ची शेवटची तारीख ठेव: 06-06-2024 | तारीख: 07-06-2024 सकाळचे 11:00 05:00 Pm पर्यंत (अमर्यादित विस्तार 5 मिनिटांचा प्रत्येक) |
| **LN: LXSOL00316-170037673**<br>शाखा : सोलापूर<br>कर्जदार:<br>**महेश बाबुराव मैंदर्गीकर**<br>सह-कर्जदार:<br>**शुभांगी महेश मैंदर्गीकर** | **25-05-2021** च्या साठी रु: **771017/-** (रुपये सात लाख एकाहत्तर हजार सतरा फक्त) | प्लॉट नं.-20, मौजे बोरामणी, दक्षिण सोलापूर, महाराष्ट्र - 413002 | राखीव किंमत: रु. 1100000/- (फक्त अकरा लाख)<br>EMD: रु. 110000/- (एक लाख दहा हजार फक्त)<br>EMD ची शेवटची तारीख ठेव: 06-06-2024 | तारीख: 07-06-2024 सकाळचे 11:00 05:00 Pm पर्यंत (अमर्यादित विस्तार 5 मिनिटांचा प्रत्येक) |
| **LN: LXDU00417-180069247**<br>शाखा: बारामती<br>कर्जदार:<br>**महादेव दशरत देवकर**<br>सह-कर्जदार:<br>**छाया महादेव देवकर** | **26-08-2019** च्या साठी रुपये: **395047/-** (रुपये तीन लाख पंचाण्णव हजार सत्तेचाळीस फक्त) | मिल्कट क्र. 13/1, A/P सोगाव, खंडोबा मंदिराजवळ, करमाळा, सोलापूर, महाराष्ट्र - 413206 | राखीव किंमत: रु.800000/- (फक्त आठ लाख)<br>EMD: रु.80000/- (फक्त ऐंशी हजार)<br>EMD ची शेवटची तारीख ठेव: 06-06-2024 | तारीख: 07-06-2024 सकाळचे 11:00 05:00 Pm पर्यंत (अमर्यादित विस्तार 5 मिनिटांचा प्रत्येक) |

**ई-लिलावाच्या अटी आणि नियमः**

१. लिलाव बोली दस्तऐवजाच्या पुढील अटी व शर्तींनुसार आणि निर्धारित प्रक्रियेनुसार आयोजित केला जातो.

त्यात बोलीदार वेब पोर्टलला भेट देऊ शकतात: **https://www.auctionbazaar.com/** आमच्या ई-लिलाव सेवा प्रदाता, बोली माहिती आणि समर्थनासाठी **M/s. ARCA EMRT PRIVTE LIMITED,** ई-लिलावासाठी ठेवलेल्या सुरक्षित मालमत्तेचे तपशील आणि बोली फॉर्म जो ऑनलाइन सबमिट केला जाईल. इच्छुक खरेदीदार लिलावाच्या अटी आणि शर्तींमधून जाऊ शकतात आणि त्याच पोर्टलवर प्रक्रिया करा आणि **मनीष वासुदेव दंतकाळे-8976839792/नवनाथ दत्तात्रय कुंभार-8104312782/तुषार सुतार-7208008947** यांच्याशी संपर्क साधू शकता, वर नमूद केलेल्या वेब पोर्टलमध्ये तपशील उपलब्ध आहेत आणि त्यांच्याशी संपर्क साधू शकतात: + सेंट्रलाइज्ड हेल्प, +966961, मेल आयडी: contactauctionbazaar.com

**ठिकाण : महाराष्ट्र**
**दिनांक : 03/05/2024**
**भाषांतरामध्ये त्रुटी आढळ्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.**

**सही/-**
**अधिकृत अधिकारी**
**फिनिक्स एआरसी प्रायव्हेट लिमिटेड**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### जागतिक क्रमवारीत गुकेशची मोठी झेप



**चेन्नई** : किशोरवयीन ग्रॅण्डमास्टर डी. गुकेशने २,७६३ च्या एलो रेटिंगसह जागतिक क्रमवारीत अव्वल दहा बुद्धिबळपटूंच्या क्लबमध्ये प्रवेश केला आहे. खुल्या गटात आता सहाव्या क्रमांकावर असलेला गुकेश २,७६२ रेटिंगसह सातव्या क्रमांकावरील जागतिक बुद्धिबळ विजेता चीनच्या ग्रॅण्डमास्टर डिंग लिरेनच्या पुढे आहे. आणखी एक मनोरंजक गोष्ट म्हणजे आणखी एक भारतीय बुद्धिबळ सनसनाटी ग्रॅण्डमास्टर अर्जुन एरिगाईसी २,७६१ रेटिंगसह जगात आठव्या क्रमांकावर आहे. आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघा (फिडे) नुसार, नुकत्याच कॅनडामध्ये पार पडलेल्या फिडे कॅण्डिडेट स्पर्धा जिंकल्यानंतर गुकेशने वीस गुण मिळवले. हे विजेतेपद पटकावल्यामुळे गुकेश आता लिरेनकडे असलेल्या जागतिक विजेतेपदासाठी आव्हानकर्ता झाला आहे. गुकेशला आता सहावे स्थान मिळणे ही मोठी झेप होती, कारण तो कॅण्डिडेट स्पर्धेपूर्वी १६ व्या क्रमांकावर होता. दोन भारतीय महिला ग्रॅण्डमास्टर्स प्रियांका नुटक्की (रेटिंग २,३५७) आणि पी.व्ही. नंदीधा (२,३५९) ने गेल्या महिन्यात वेगवेगळ्या रेटिंग स्पर्धेत ८३ आणि ८१ गुण मिळवले, तर ग्रॅण्डमास्टर आर. वैशालीने महिलांच्या कॅण्डिडेट स्पर्धेत १४ गुण मिळवले.

### चार भारतीय मुष्टियोद्धे उपांत्य फेरीत

**अस्ताना** : येथे सुरु असलेल्या आशियाई २२ वर्षांखालील तसेच युवा गटाच्या मुष्टियुद्ध स्पर्धेत गुरुवारी चार भारतीय मुष्टियोद्धे- मंडेंगबम जदुमणी सिंग, निखिल, अजय कुमार आणि अंकुश यांनी उपांत्य फेरीत धडक मारली आहे. या चौघांनी उपांत्यपूर्व फेरीत आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर प्रभावी विजय नोंदवले. जादुमणीने (५१ किलो) भूतानच्या फुंटशो किन्लेवर ५-० असा विजय मिळविला. निखिलने (५७ किलो) उझबेकिस्तानच्या बख्तियोरोव अयुबखॉनवर ४-० असा विजय मिळवून भारताची विजयी गती कायम ठेवली.

अजय (६३.५ किलो) आणि अंकुश (७१ किलो) यांनी रेफ्री स्टॉप द कॉन्टेस्टच्या (आरएससी) निर्णयाने आपापल्या लढती जिंकल्या. अजयने पहिल्या फेरीतच मंगोलियाच्या दमदिंदोर्ज पी. विरुद्धची लढत जिंकली, तर अंकुशने तिसऱ्या फेरीत कोरियाच्या ली जु संग विरुद्धची लढत जिंकली. दरम्यान, आशिषला पुरुषांच्या (५४ किलो) उपांत्यपूर्व फेरीत मंगोलियाच्या ओयुन एर्डेन ई विरुद्ध २-३ ने पराभव पत्करावा लागला.

### टी-२० विश्वचषकात नेपाळचे नेतृत्व रोहित पौडेलकडे

**काठमांडू** : नेपाळने बुधवारी वेस्ट इंडिज आणि अमेरिकेत जूनमध्ये सुरू होणाऱ्या आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी १५ सदस्यीय संघाची घोषणा केली. २१ वर्षीय रोहित पौडेल या स्पर्धेत नेपाळ संघाचे नेतृत्व करेल. सोमपाल कामी व करण केसी यांचा नेपाळच्या युवा संघात समावेश करण्यात आला आहे. नेपाळचा क्रिकेट संघ असा - रोहित पौडेल (कर्णधार), आसिफ शेख, अनिल कुमार साह, कुशल भुर्तेल, कुशल मल्ला, दीपेंद्र सिंग आयरी, ललित राजबंशी, करण केसी, गुलशन झा, सोमपाल कामी, प्रतिस जीसी, संदीप जोरा, अविनाश बोहरा, सागर ढकल, कमल सिंग आयरी

### माईक टायसन-जेक पॉल हेवीवेट लढत २० जुलै रोजी



**नवी दिल्ली** : माजी हेवीवेट बॉक्सिंग विजेता माईक टायसन आणि युट्यूब सनसनाटी जेक पॉल यांच्यादरम्यान डॅलस येथे २० जुलै रोजी हेवीवेट व्यावसायिक लढत होणार आहे, असे वॉशिंग्टनमधील फायटर आणि प्रवर्तकांनी जाहीर केले. ही लढत आठ फेऱ्यांमध्ये होणार असून प्रत्येक फेरी दोन मिनिटे चालणार आहे. महत्त्वाचे म्हणजे जेक पॉल आणि माईक टायसन या दोघांच्या अधिकृत रेकॉर्डवर निकालाची नोंद केली जाईल. हे टायसनच्या अलिकडील प्रदर्शनी सामन्यांमधून महत्त्वपूर्ण प्रस्थान दर्शवते आणि दिग्गज बॉक्सरसाठी मंजूर व्यावसायिक स्पर्धेकडे परत येण्याचे सूचित करते. ५० विजय, ६ पराभव आणि ४४ नॉकआउट्सच्या विक्रमासह टायसनने आपली शानदार कारकीर्द असूनही, २००३ मध्ये क्लिफर्ड एटीनवर विजय मिळविल्यानंतर त्याला विजय मिळवता आलेला नाही. ३० जून रोजी जेक पॉल २७ वर्षांचा आणि टायसन ५८ वर्षांचा होणार असल्याने दोन लढाऊ खेळाडूंदरम्यानच्या वयातील फरकाबाबत चिंता व्यक्त करण्यात आली. तरीही, व्यावसायिक हेवीवेट लढत म्हणून या लढतीला मंजुरी देण्याचा निर्णय आयोजकांचा दोन्ही स्पर्धकांवर असलेला विश्वास दर्शवतो.

# मुंबईविरुद्ध केकेआर त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न करणार

◆ **मुंबई, २ मे**

सतराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात शुक्रवारी वानखेडे स्टेडियमवर पाच वेळचा विजेता मुंबई इंडियन्स व कोलकाता नाईट रायडर्स यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. आयपीएलमधील दहा संघांच्या गुणतालिकेत हे दोन्ही संघ दोन विरुद्ध टोकावर असून केकेआर १२ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे, तर मुंबई ६ गुणांसह नवव्या स्थानावर आहे.

सद्यपरिस्थितीत दोनवेळच्या विजेत्या केकेआरचे प्लेऑफमधील एक स्थान जवळपास निश्चित आहे, तरीही अशा परिस्थितीत श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील केकेआर संघाला आपल्या त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न करावा लागणार आहे. तसेच अंतिम चारमधील स्थान बळकट करण्यासाठी सर्व विभागांमध्ये सातत्य ठेवावे लागेल व कोणतीही घसरण टाळावी लागेल.

गत सहा सामन्यांमध्ये धावांचा पाठलाग करताना केकेआरला तीन सामन्यांपैकी तीन पराभव पत्करावे लागले, परंतु दिल्ली कॅपिटल्सचा सात गड्यांनी पराभव करून त्यांनी जोरदार मुसंडी मारली. केकेआरने फलंदाजीत जबरदस्त कामगिरी केली, परंतु त्यांना गोलंदाजीत सुधारणा करणे आवश्यक आहे.

मिचेल स्टार्कने आठ सामन्यांमध्ये केवळ सात बळी टिपले आहेत. हर्षित राणा या मोसमात केकेआरसाठी सर्वाधिक बळी (११) घेणाऱ्यांपैकी एक आहे, परंतु उजव्या हाताचा



हार्दिक पांड्या



श्रेयस अय्यर

वेगवान गोलंदाज राणाने दिल्लीच्या अभिषेक पोरेलला बाद केल्यानंतर त्याच्यावर एका सामन्याची बंदी घालण्यात आली आहे. वैभव अरोराने पाच सामन्यांमध्ये नऊ बळी टिपले आहे व तो केकेआरचा सर्वोत्तम गोलंदाज ठरतो. २६ वर्षीय रिंकू सिंगसुद्धा लक्षवेधक खेळाडू असेल. रिंकूला टी-२० विश्वचषकासाठी भारताच्या मुख्य संघातून वगळण्यात आल्यामुळे त्याच्याप्रती सहानुभूती निर्माण झाली आहे. त्याला राखीव खेळाडू म्हमून ठेवण्यात आले आहे.

पाच वेळा विजेत्या मुंबई इंडियन्सला अजून अजून पाच सामने खेळायचे असले तरीही ते आयपीएल प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर झालेली दिसते. जरी मुंबई इंडियन्सने यापैकी प्रत्येक जिंकला तरीही त्यांना केवळ १६ गुण मिळू शकतात आणि ते गुणतालिकेच्या मध्यभागी कुठेतरी असतील.

जसप्रीत बुमराह (१४ बळी) व गेराल्ड कोएत्झी (१३ बळी) हे मुंबई इंडियन्सचे सर्वोत्कृष्ट गोलंदाज आहेत, परंतु त्यांचे प्रभावी प्रदर्शन असूनही, फलंदाजांच्या सामूहिक अपयशामुळे संघाचा हंगाम वाईट झाला आहे.

**आजचा आयपीएल सामना**

**मुंबई इंडियन्स वि. कोलकाता नाईट रायडर्स**
**स्थळ** : वानखेडे स्टेडियम, मुंबई
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

रोहित शर्माने निःस्वार्थ खेळी केली असली तरी तो मोठी खेळी करण्यात अपयशी ठरला, पण टी-२० विश्वचषक स्पर्धेला आता केवळ एक महिना शिल्लक असल्यामुळे तो आपल्या फॉर्मवर लक्ष केंद्रित करेल. या हंगामात सात आयपीएल सामन्यांमध्ये दोन अर्धशतके झळकावणाऱ्या सूर्यकुमार यादवकडेही सर्वांचे लक्ष असेल. या आयपीएलमध्ये तीन अर्धशतकांसह ३४३ धावा करणारा तिलक वर्मा सर्वोत्कृष्ट फलंदाज असला तरी त्याची कामगिरी आपल्या संघाचे अपयश लपवण्यासाठी पुरेशी ठरली नाही.

ईशान किशनने चांगली फटकेबाजी केली, परंतु त्याच्याकडे सातत्य नाही व पॉवरप्लेमध्ये विकेट गमावणे ही मुंबई इंडियन्सच्या या हंगामातील सर्वात मोठी समस्या आहे. मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्या फलंदाजी किंवा गोलंदाजीत चमत्कारिक कामगिरी करू शकलेला नाही. परंतु विश्वचषक स्पर्धेसाठी उपकर्णधार म्हणून तो भारतीय संघात आहे, या वस्तुस्थितीचे भान ठेवून त्याला परिस्थिती बदलली पाहिजे.

◀(वृत्तसंस्था)

# भारतीय महिला संघाचा जपानकडून ०-३ ने पराभव

● उबेर चषक उपांत्यपूर्व फेरी ● अस्मिता चालिहाची कडवी झुंज

◆ **चेंगडू (चीन), २ मे**

अस्मिता चालिहा हिने शौर्य गाजवताना युवा व अननुभवी भारतीय महिला संघाला गुरुवारी येथे उबेर चषक बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत बलाढ्य जपानकडून ०-३ असा पराभव पत्करावा लागला.

पी. व्ही. सिंधू सारख्या अव्वल खेळाडूच्या अनुपस्थितही भारताने गट साखळी फेरीत कॅनडा व सिंगापूरविरुद्ध दोन उत्कृष्ट विजय मिळवून बाद फेरीसाठी पात्र ठरले होते, परंतु अंतिम साखळी सामन्यात त्यांना मजबूत चीन संघाकडून ०-५ असा पराभव पत्करावा लागला होता.

गुरूवारी भारताच्या चालिहा व ईशारानी बारुआने आपल्या एकेरी सामन्यात जोरदार संघर्ष केला.



अस्मिता चालिहा

जागतिक क्रमवारीत ५३ व्या क्रमांकावर असलेल्या चालिहाने पुन्हा एकदा दाखवून दिले की, अव्वल खेळाडूंना अडचणीत आणण्याची क्षमता आहे. ६७ मिनिटांच्या कडव्या संघर्षानंतरही अस्मिताला ११ व्या विश्वमानांमकित अया ओहोरीकडून १५-२१, २२१-२०, १५-२१ असा पराभव पत्करावा लागला. २० वर्षीय ईशाराणीला माजी प्रथम विश्वमानांकित व २०१७ सालची विश्वविजेती नोझोमी ओकुहाराकडून १५-२१, १२-२१ असा पराभव स्विकारावा लागला.

दरम्यान, राष्ट्रीय विजेती प्रिया कोन्जेंगबम व श्रुती मिश्रा यांना जागतिक क्रमवारीत चौथ्या क्रमांकावर असलेल्या नमी मत्सुयामा आणि चिहारू शिदा या जोडीकडून १५-२१, १२-२१ असा पराभव पत्करावा लागला.

भारताने १९५७, २०१४ आणि २०१६ मध्ये असे तीन वेळा उबेर चषकाची उपांत्य फेरी गाठली होती. गतविजेता भारतीय पुरुष संघ थॉमस चषकाच्या उपांत्यपूर्व फेरीत चीनशी झुंजणार आहे.

◀(वृत्तसंस्था)

### आंद्रे रसेलचा अल्बम ९ मे रोजी प्रदर्शित होणार

◆ **मुंबई, २ मे**



कोलकाता नाईट रायडर्सचा धाकड फलंदाज आंद्रे रसेल याने बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. आंद्रे रसेल 'लडकी तू कमाल' या गाण्यात झळकणार आहे. स्मृती मंधानाचा बॉयफ्रेंड पलाश मुच्छल याने 'लडकी तू कमाल' या गाण्यामध्ये आंद्रे रसेल याला संधी दिली आहे.

'बालिका वधू' फेम अविका गौर हिच्यासोबत या गाण्यामध्ये आंद्रे रसेल ठुमके लावणार आहे. ९ मे रोजी हे गाणे रिलिज होणार आहे. या गाण्याची सध्या समाजमाध्यमावर जोरदार चर्चा सुरू आहे.

◀(वृत्तसंस्था)

# रोमांचक सामन्यात हैदराबादचा राजस्थानवर एका धावेने विजय

### रेड्डी व ट्रॅव्हीस हेडन यांची अर्धशतके, भुवनेश्वर कुमारचे ३ बळी

**हैदराबाद, दि. २ मे-**

इंडियन प्रीमियर लीगच्या गुरुवारी झालेल्या रोमांचक सामन्यात सनरायझर्स हैदराबादने राजस्थान रॉयल्सचा एका धावेने पराभव केला.

प्रथम फलंदाजी करताना हैदराबादने २० षटकांत ३ गडी गमावून २०१ धावा केल्या. त्यांच्या नितीशकुमार रेड्डी (नाबाद ७६) व ट्रॅव्हीस हेडने(५८) शानदार अर्धशतके झळकाविली. हेनरीक क्लासेसनेही नाबाद ४२ धावांची खेळी केली. राजस्थानच्या आवेश खानने २ गडी बाद केले.

विजयी २०२ धावांचे लक्ष्य गाठणाऱ्या राजस्थानला २० षटकांत ७ गडी बाद २०० धावाच करता आल्या. राजस्थानकडून रियान परागने ७७ आणि यशस्वी जैस्वालने ६७ धावा केल्या. हैदराबादच्या भुवनेश्वर कुमारने शेवटच्या षटकात रोवमन पॉवेल आणि रविचंद्रन अश्विनविरुद्ध १३ धावांचा बचाव केला. भुवनेश्वरने ३ बळीही टिपले. पॅट कमिन्स आणि थांगारासू नटराजन यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.





### सिद्धेश्वर स्कूलच्या ६ खेळाडूंची राज्य डॉजबॉल स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. २ मे-**

श्री सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम स्कूलच्या ६ विद्यार्थ्यांची वरिष्ठ गट राज्य डॉजबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

ही स्पर्धा २ मे ते ५ मे दरम्यान आष्टी बीड येथे सुरू झाली आहे. या खेळाडूंना क्रीडाशिक्षक पवन भोसले यांनी मार्गदर्शन केले. त्यांचे श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण संकुलाचे चेअरमन धर्मराज काडादी, श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण समितीचे सदस्य डॉ. राजशेखर येळीकर, भीमाशंकर पटणे, गुरुराज माळगे, मल्लिकार्जुन कळके व समन्वयक संतोष पाटील, मुख्याध्यापक योगेश राऊत, पर्यवेक्षक शिवराज बिराजदार आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

**निवडलेले खेळाडू** : ऋतुराज अनंत जाधव, अवधूत मानव कांबळे, रितेश तुळशीदास पवार, साकल्य दिगंबर चव्हाण, अमृता दत्तात्रय शृंगारपुरे, रितिका तुळशीदास पवार

# लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्थेस सर्वसाधारण विजेतेपद

## लोकमंगल डेव्हलपमेंट फाउंडेशन कर्मचारी क्रीडा स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे -**

लोकमंगल डेव्हलपमेंट फाउंडेशनच्या वतीने लोकमंगल समूहातील कर्मचाऱ्यांच्या क्रीडा स्पर्धेत लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्थेने सांघिक व वैयक्तिक क्रीडा प्रकारात सर्वाधिक पुरस्कार मिळवून लोकमंगल चषक पटकाविला. तसेच लोकमंगल समूहातील २६ कर्मचाऱ्यांना २०२४चा उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार प्रदान करण्यात आला.



लोकमंगल समूह क्रीडा म होत्सवाचे २०२४चे चार दिवस आयोजन केले होते. यात क्रिकेट, खो-खो, हॉलीबॉल, कबड्डी, रस्सीखेच, गोळा फेक, भाला फ ेक, धावणे, संगीत खुर्ची, रांगोळी, चित्रकला आदींचा समावेश होता.

बक्षीस वितरणाचा कार्यक्रम लोकमंगल सम ूहाच्या वर्धापन दिनी करण्यात आला. पुरस्कार वितरणाच्या आ. सुभाष देशमुख, रोहन देशमुख, गजानन भाकरे, संस्थेच्या अध्यक्षा अलका देवडकर आदी उपस्थित होते.

### जिल्हा १९ वर्षांखालील मुलींची क्रिकेट चाचणी रविवारी

**सोलापूर, दि. २ मे -**

सोलापूर जिल्हयाचे १९ वर्षांखालील मुलींचे क्रिकेट संघ निवडण्यासाठी रविवारी ५ मे राजी दुपारी २ ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत इंदिरा गांधी पार्क स्टेडियवर निवड चाचणी होईल. यातून निमंत्रित आंतर जिल्हा स्पर्धेसाठी जिल्हा संघ निवडण्यात येतील. १ सप्टेंबर २००५ रोजी व नंतर जन्मलेले खेळाडू यासाठी पात्र आहेत. ही निवड चाचणी चेअरमन किरण मणियार, स्नेहल जाधव, सारिका कुरुलकर व मानसी जाधव करणार आहेत, असे जिल्हा क्रिकेट संघटनेचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेंम्बर्सु यांनी कळविले आहे.



### चेतक रोलर स्केटींग क्लबचा महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**सोलापूर, दिनांक २ मे-**

चेतक रोलर स्केटींग क्लबच्या ८०व्या स्केटिंग प्रशिक्षण शिबिरातील खेळाडूंनी दिव्यकांत सकाळी ८ वा. चेतक स्केटींग बलबच्या मुलांनी हातात तिरंगा घेऊन महाराष्ट्र दिन अमर रहे, अपना महाराष्ट्र अमर रहे, अगा जयघोष करित श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळया भोवती प्रदक्षिणा घातल्या. प्रारंभी बलबच्या मुलांच्या आईनी शिवाजी महाराजांचे आंगन, फुलांनी गुंदर गजबिले व गणेश खेडकर यांनी श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केले. यावेळी धुवेश गांधी, सुभाष झीरपे, नारायण छाबीया व मुलांच्या पालकांनी या कार्यक्रम ासाठी मेहनत घेतली.

### स्वामी विवेकानंदच्या उटगीकरची जिल्हा क्रिकेट संघात निवड

**सोलापूर, दि. २ मे -**



येथील स्वामी विवेकानंद प्रशाला क्रिकेट अकादमीच्या आनंद उटगीकर याची सोलापूर जिल्हा २३ वर्षांखालील क्रिकेट संघात निवड झाली. त्यास प्रशिक्षक मनोज रायचूरकर व क्रीडाशिक्षक श्रीकृष्ण कोळी यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचे शाहू शिक्षण संस्थेचे संस्थापक लक्ष्मण ढोबळे, अभिजित ढोबळे, मुख्याध्यापक अंबादास पांढरे यांनी अभिनंदन केले.

### जिल्हा वरिष्ठ सॉफ्ट टेनिस संघाची निवड चाचणी आज

**सोलापूर, दि. २ मे-**

सांगली येथे ०९ मे ते १२ मे दरम्यान सिनिअर राज्य सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी सोलापूर जिल्हयाचे पुरुष व महिला संघ निवडण्यासाठी सोलापूर जिल्हा सॉफ्ट टेनिस असोसिएशन सोलापूर यांच्या वतीने शुक्रवारी दिनांक ३ मे रोजी सकाळी १० वाजता ह.दे. प्रशालेच्या हरीभाई लॉन टेनिस कोर्टवर होणार आहे. या स्पर्धेसाठी खेळाडूंची आधार कार्ड व चार फोटो असणे आवश्यक आहे .येताना वयाचा पुरावा व आवश्यक साहित्य सोबत आणावे. खेळाडूंनी अक्षय गवळी (मो. ८६००६९९६५३) अथवा जिशान शेख (मो. ९०११६२७८६६) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन सोलापूर जिल्हा सॉफ्टटेनिस संघटनेचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, सचिव प्रा.संतोष गवळी व सहसचिव शिवाजी वसपटे यांनी केले आहे.



# सविताच्या जागी सलीमा टेटे कर्णधार

### भारतीय महिला हॉकी संघात बदल

◆ **नवी दिल्ली, २ मे**

मधल्या फळीतील हॉकीपटू सलीमा टेटे हिची गुरुवारी अनुभवी गोलरक्षक सविता पुनियाच्या जागी या महिन्याच्या अखेर सुरू होणाऱ्या एफआयएच प्रो-लीगच्या बेल्जियम आणि इंग्लंड चरणांच्या सामन्यांसाठी २४ सशक्त भारतीय महिला हॉकी संघाची कर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या दौऱ्यासाठी नवनीत कौर हिची उपकर्णधारपदी निवड करण्यात आली आहे.

मला संघाच्या कर्णधारपदी नियुक्ती करण्यात आल्याचा अतिशय आनंद आहे. ही एक मोठी जबाबदारी आहे व मी या नवीन भूमिकेसाठी उत्सुक आहे. आमच्याकडे एक मजबूत संघ आहे आणि त्यात अनुभवी व युवा खेळाडूंचे मिश्रण आहे, असे सलीमा टेटे हिने म्हणाली.

एफआयएच हॉकी प्रो-लीग २०२३-२०२४ च्या आगामी बेल्जियम व इंग्लंडच्या चरणांमध्ये आम्ही आमचे मजबूत पाऊल पुढे ठेवण्याचा विचार करत आहोत. आम्ही अशा क्षेत्रांवर काम केले आहे, जिथे आम्हाला सुधारणे आवश्यक आहे, असे ती म्हणाली.



अयशस्वी ऑलिम्पिक पात्रता मोहिमेदरम्यान आणि त्यानंतर घरच्या मैदानावर प्रो-लीग सामन्यांमध्ये सविताने भारताचे नेतृत्व केले होते. तीन बदल वगळता या वर्षी फेब्रुवारीमध्ये प्रो-लीगच्या भुवनेश्वर व राऊरकेला चरणांत भाग घेणारा संघ एकच होता.

बेल्जियममधील सामने २२ मे रोजी सुरू होतील आणि २६ मे रोजी संपतील, तर इंग्लंडचा लेग १ जूनला सुरू होईल आणि ९ जून रोजी संपेल. अर्जेंटिनाविरुद्ध २२ मे पासून सुरू होणाऱ्या पहिल्या टप्प्यात भारत अर्जेंटिना आणि बेल्जियम विरुद्ध दोन वेळा खेळेल. लंडन चरणादरम्यान, भारतीय संघ ग्रेट ब्रिटन व जर्मनीशी भिडणार आहे. भारत सध्या एफआयएच प्रो-लीगच्या गुणतालिकेत आठ गुणांसह सहाव्या स्थानावर आहे.

**भारतीय महिला हॉकी संघ** : गोलरक्षक- सविता, बिचू देवी खरीबम. बचावपटू : निक्की प्रधान, उदिता, ईशिका चौधरी, मोनिका, ज्योती छत्री, महिमा चौधरी. मधल्या फळीतील खेळाडू : सलीमा टेटे (कर्णधार), वैष्णवी विठ्ठल फाळके, नवनीत कौर (उपकर्णधार), नेहा, ज्योती, बलजीत कौर, मनीषा चौहान, लालरेमसियामी, आक्रम फळीतील खेळाडू- मुमताज खान, संगिता कुमारी, दीपिका, शर्मिला देवी, प्रीती दुबे, वंदना कटारिया, सुनीलिता टोप्पो, दीपिका सोरेंग.

◀(वृत्तसंस्था)

# द पॅन्थर व द हल्क संघाची विजयी सलामी

### किरण स्पोर्टस् खो-खो प्रीमीयर लीग : अनुलक्ष उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिरास सुरवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ मे -**

द पॅन्थर व द हल्क संघाने किरण स्पोर्टस् खो-खो प्रीमीयर लीग स्पर्धेची विजयी सलामी दिली. ही स्पर्धा सकाळ व सायंकाळ सत्रात प्रकाश झोतात साखळी पद्धतीने चार संघात आयोजित केली आहे.

शाहू शिक्षण संस्था पंढरपूर संचलित स्वामी विवेकानंद प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय आणि वसुंधरा कला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शाहू महाराज क्रीडा संकुलात अनुलक्ष उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिर व शिबिराअंतर्गत किरण स्पोर्टस् खो-खो प्रीमीयर लिग स्पर्धेस सुरवात झाली. याचे उद्घाटन सोलापूर ॲम्युचर खो खो असोसिएशनचे सचिव अजितकुमार संगवे यांच्या हस्ते झाले. यावेळी स्वामी विवेकानंद प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे, सोलापूर कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष मरगू जाधव, माऊली महाविद्यालय वडाळाचे फिजिकल डायरेक्टर डॉ. वाघचवरे, वसुंधरा कला महाविद्यालयाचे फिजिकल डायरेक्टर डॉ. प्रा. अशोक पाटील, सोनी महाविद्यालयाचे फिजिकल डायरेक्टर प्रा.सुवर्णा कांबळे, प्रशालेचे विज्ञान विभाग प्रमुख प्रा. लाल अहमद नदाफ, सहशिक्षक यशोदिप आठवले, शहर वाहतुक शाखेचे अर्जुन पवार आदी उपस्थित होते. क्रीडा शिक्षक श्रीकृष्ण कोळी यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समाधान पांढरे, सदानंद गुजले, सोमनाथ निंबाळे, सतीश लिंबोळे व सिध्दाराम बिराजदार यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### पवार महायुतीत असते तर घड्याळ गेले नसते : रामदास आठवले

**कुर्डूवाडी, दि. २ मे -**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार अजित पवार यांच्याप्रमाणे भाजपा प्रणित महायुतीत आले असते तर त्यांचे घड्याळ चिन्ह गेले नसते, असे केंद्रिय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी पत्रकार परिषदेत सांगीतले. या पत्रकार परिषदेत बापूसाहेब जगताप,अमर माने आदी उपस्थीत होते. भाजपाचे विद्यमान खा.रणजितसिंह नाईक- निंबाळकर यांच्या प्रचार सभेसाठी कुर्डूवाडी येथे आले असता पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते. आर.पी.आय. (आठवले गट) साठी संपुर्ण भारतात किंवा महाराष्ट्रात एकही जागा दिली नाही यावर बोलताना राज्यमंत्री आठवले म्हणाले, आम्ही सोलापूर आणि शिर्डी या दोन लोकसभा मतदार संघाची मागणी केली होती. मात्र महायुतीने आमचा विचार केला नाही. मात्र यासाठी आपणास पुढेही राज्यसभेचे कायम सिट मिळणार आहे. आज लोकसभेला जरी माझ्या पक्षासाठी जागा दिली नसली तरी विधानसभा निवडणूकीसाठी मात्र आठ ते दहा जागा देणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेद्र फडवणीस यांनी विश्वास दिला आहे. संपुर्ण भारतासह नरेंद्र मोदी विरूध्द राहूल गांधी अशीच निवडणूक होत असून शरद पवाराविरूध्दचा प्रश्नच येत नाही.





### गौडगाव पंचाचार्य प्रशालेत मतदार जनजागृती

**सोलापूर, दि. २ मे -**

लोकशाहीत निवडणुकीचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे सरकार बनवण्याच्या प्रक्रियेत सर्वांनी सहभागी व्हावे संपूर्ण देशात लोकसभा निवडणूक लगबग सुरू झाली आहे या पार्श्वभूमीवर अक्कलकोट तालुक्यातील गौडगाव येथील श्री जगद्गुरु पंचाचार्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत मतदार जनजागृती करण्यात आले. प्रारंभी आम्ही भारताचे नागरिक लोकशाहीवर निष्ठा ठेवून आपल्या देशाच्या लोकशाही परंपराचे जतन करू आणि मुक्त नि:पक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म,अंश,जात,समाज व भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू अशी परमेश्वर व्हसुरे यांनी सामूहिकरीत्या विद्यार्थी व मतदारासाठी प्रतिज्ञा घेण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक कल्याणी देशट्टी, लाडाप्पा शिंदे, महेश स्वामी, शिवपुत्र चोळे,शरणय्या हिरेमठ,गंगाधर नागशेट्टी,पी.एस व्हसुरे पोपट सोनकांबळे, वीरेश धानशेट्टी, श्रीशैल सवळतोट,तुकाराम जाधव,मृत्युंजय सालीमठ, सोनाली साठे उपस्थित होते.

# देशाचा जीडीपी ८ टक्क्यांपर्यंत राहील

## आरबीआयचे संचालक सतीश मराठे यांनी चर्चासत्रामध्ये व्यक्त केला अंदाज

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर,दि. २ मे -**

यावेळी आर.बी.आय.चे संचालक मराठे यांनी डिसेंबर अखेर असणारी देशाच्या बँकिंग क्षेत्राची आकडेवारी व मार्च अखेर प्राप्त अंदाजित आकडेवारीच्या आधारे सद्यस्थितीचा आढावा घेतला. यामध्ये देशाचा नेट एनपीए (NP) हा १ व ग्रॉस एनपीए हा २.७५ टक्यापर्यंत खाली आल्याचे गौरवोद्गार काढले. देशाचा जीडीपी (GDP) हा ८ टक्क्यांपर्यंत राहील, असा अंदाज रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे संचालक सतीश मराठे यांनी व्यक्त केला.

सोलापूर जिल्हा नागरी बँक असोसिएशन्स व दि. पंढरपूर अर्बन बँक यांच्या संयुक्त विद्यम ाने नुकत्याच पार पडलेल्या अर्थिकवर्ष अखेर देशाची आर्थिक स्थिती व त्यामध्ये असणारी बँकिंग क्षेत्राची भूमिका या विषयावरील चर्चासत्रात ते बोलत होते.



यावेळी पंढरपूर तालुक्याचे नेते उमेश परिचारक, निर्शिंगंधा बँकेचे चेअरमन कल्याणराव काळे, असोसिएशन्सचे अध्यक्ष लुनावत, पंढरपूर बँकेचे चेअरमन सतिश मुळे, संचालक रजनीश कवठेकर, हरीश ताठे, प्रभुलिंग भिंगे, गणेश शिंगण, अमित मांगले याचबरोबर पंढरपूर अर्बन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश विरधे, पंढरपूर मर्चंट बँकेचे मुख्याधिकारी अतुल म्हमाणे, वाईकर व पंढरपुरातील विविध बँकांचे मान्यवर अधिकारी व संचालक उपस्थित होते.


शेतीविषयक देशाचा विकासदर हा ५ टक्के राहील असे सांगून या बाबतचे म ार्गदशन व ग्रामीण भागाची स्थिती त्यांनी सांगितली. वि.का.सेवा सोसायट्यांच्या माध्यम ातून आतापेक्षा तिप्पट आर्थिक उलाढाल ही नवीन सहकार मंत्रालयास अपेक्षित आहे व त्यासाठी सहकार मंत्रालय काम करीत आहे असेही त्यांनी सांगितले. जनधन खात्यांमुळे सरकारला डिबीटी (DBT) अर्थात डायरेक्त बेनिफिशरी ट्रान्सफर सिस्टीमच्या माध्यमातून विविध योजनांचा लाभ सर्व घटकापर्यंत देणे शक्य होवून अशा विविध अंगाने आर्थिक परिस्थितीचा आढावा घेऊन सकारात्मक वातावरणात या चर्चासत्राचा समारोप झाला.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी परमात्मा पांडुरंगाच्या प्रतिमेचे पूजन व सहकाराचे प्रणेते लक्ष्मणराव इनामदार आणि सहकारातील डॉक्टर श्रध्येय सुधाकरपंत परिचारक यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. यानंतर सहकार गीत गायन करण्यात आले. या प्रसंगी सतीश मराठे आणि प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले अनालायझरचे संपादक सुशील कुलकर्णी व उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पंढरपूर बँकेचे सीईओ उमेश विरधे यांनी केले.

# मायबोली मंडळाच्या अध्यक्षपदी कुलकर्णी; सचिवपदी डॉ. मोहिरे

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२ मे-**

मायबोली सांस्कृतिक मंडळाच्या अध्यक्षपदी मुकुंदराज कुलकर्णी; सचिवपदी डॉ. प्रशांत म ोहिरे यांची निवड करण्यात आली. पत्रकार परिषदेमध्ये मायबोलीचे संचालक जितेंद्र माढेकर यांनी मंडळाच्या नवीन पदाधिकाऱ्यांची घोषणा केली. पदाधिकारी पुढीलप्रमाणे- उपाध्यक्ष- जवाहर माढेकर, सहसचिव- निलेश माढेकर, कोषाध्यक्ष- व्यंकटेश कुलकर्णी, सहकोषाध्यक्ष- राजेंद्र श्रीश्रीमाळ. सन २००० साली कोजागिरी पौर्णिमेच्या मुहूर्तावर स्व. विजयकुमार माढेकर यांच्या पुढाकाराने प्रसिद्ध साहित्यिक द.मा.मिरासदार यांच्या उपस्थितीत मंडळाची स्थापना झाली. कार्यक्रम ाचा प्रारंभ प्रसिद्ध हास्य कवी अशोक नायगावकर यांच्या मि स्किलीआणि कविता या बहुचर्चित




बहारदार कार्यक्रमाने होणार आहे. हा कार्यक्रम दि. १२ मे रविवार रोजी सायंकाळी यशवंतराव चव्हाण सभागृहात होईल. कार्यक्रम फक्त सभासदांसाठीच आहे. सभासद वर्गणी वार्षिक एक हजार रुपये प्रति व्यक्ती आहे. सभासद नोंदणीची सोय कार्यक्रम स्थळी करण्यात आली आहे. ज्या रसिकांना या सांस्कृतिक दिंडीत सहभागी होण्याची इच्छा आहे त्यांनी सदस्य होण्यासाठी मायबोलीच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे. यावेळी व्यासपीठावर माजी अध्यक्ष अरुण शहा आणि संचालक सुनील आबा पाटील उपस्थित होते.

# वैराग बाजारातील ट्रान्सफॉर्मरमध्ये बिघाड; विद्युत तारा तुटल्या

**तभा वृत्तसेवा**
**वैराग, दि.२ मे**

एकीकडे सूर्य आग ओखू लागला असून तापमानाचा पारा ४४ अंश सेल्सिअसच्या पुढे आहे. तर दुसरीकडे विद्युत केंद्रात वारंवार बिघड होत असल्याच्या कारणाने ऐन उन्हाळ्यात दिवस रात्र उकाड्याने हैराण असणाऱ्या वैरागकरांना वारंवार खंडित होणाऱ्या विजेचा नाहक त्रास सोसावं लागत आहे. त्यात कहर म्हणजे बुधवारच्या भरलेल्या आठवडी बाजारात सायंकाळी हिंगणी रोड वरील विद्युत तारांचे स्पार्किंग होऊन, नागरिकांच्या अंगावर तारा तुटुन पडल्याने बाजारात हाहाकार उडाला होता.

हिंगणी रोडवरील उघड्या विद्युत डेपोजवळ वैरागच्या आठवडे बाजाराची गर्दी असते. वारंवार तक्रारी अर्ज देऊनही या परिसरातील बाजारकऱ्यांच अतिक्रमण कायम असल्याने या परिसरात वाहतुकीची कोंडीही होत असल्याचे दिसून येते. बुधवारी सायंकाळच्या सुम ारास या ठिकाणच्या असणाऱ्या विद्युत डेपोचा मोठा आवाज होऊन,डेपोला लागून असणाऱ्या खांबांवरील विद्युत तारांची स्पार्कींग होऊन बाजारात आलेल्या लोकांच्या अंगावरती ठिंणग्या पडल्या. डेपोचा झालेला स्फोट आणि अंगावरती पडलेल्या ठिणग्या यामुळे बाजारातील नागरिकांचा एकदमच गोंधळ उडाला होता. काहीजण एकमेकांच्या अंगावर पडले. दैव बलवत्तर म्हणून डेपोचा स्फोट झाल्यावर विद्युत प्रवाह खंडित झाल्यामुळे जीवितहानी टळली. अन्यथा विचारही न केलेला बरा अशी स्थिती निर्माण झाली होती. तरी या परिसरातील आठवडे बाजार कायमस्वरूपी बंद करून पर्यायी व्यवस्था करण्याची



मागणी नागरिकांतून होत आहे. तर दुसरीकडे वैराग शहराची लोकसंख्या ३० हजाराच्या पुढे असून दिवसा व रात्री वारंवार होणाऱ्या खंडित विद्युत पुरवठ्याम ुळे वृद्ध व लहांन मुलांना उकाड्याचा त्रास सहन करावा लागत आहे . या ठिकाणी असणारी उपकरणे वेळोवेळी दुरुस्त न केल्यामुळे या केंद्रांमध्ये वारंवार बिघाड होत असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे. थोडासा वारा, पाऊस सुरू झाला की वीज गायब होते. त्यामुळे वीज मंडळाच्या कारभाराला नागरिक वैतागले आहेत.

# महादेव कोगनुरे यांचा राष्ट्रीय काँग्रेस पक्षात प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि. २ मे -**

सोलापूर जिल्ह्यात गेल्या अनेक दिवसांपासून महादेव कोगनुरे यांच्या राजकीय भुमिकेकडे सर्वांच्या नजरा लागून राहिल्या होत्या. अखेर एम के फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष तथा सागर सिमेंट चे मुख्य व्यवस्थापक महादेव कोगनुरे हे राष्ट्रीय काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केल्याने भाजप व महायुतीला तगडा झटका बसला आहे.

प्रदेशाध्यक्ष नाना पटोले,म ाजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुम ार शिंदे,काँग्रेस चे लोकसभेचे उमेदवार आमदार प्रणिती शिंदे तसेच महाविकास आघाडीतील प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केल्याने भाजप व म हायुतीला तगडा झटका बसला आहे. लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातील मतदान ७ मे रोजी होणार असल्याने आता राजकीय नेत्यांच्या गाठीभेटीला वेग आला आहे.अलिकडे अनेक राजकीय नेत्यांची महादेव कोगनुरे यांच्याबरोबर गाठीभेटी वाढल्या होत्या.एम के फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष महादेव कोगनुरे आता भाजपात प्रवेश करणार की काँग्रेस मध्ये जाणार याची उत्सुकता एम के फाउंडेशन च्या कार्यकर्त्यात होती.अखेर आज महादेव कोगनुरे यांनी आपली राजकीय भुमिका जाहीर केल्याने सर्वांना अश्चर्याचा धक्का बसला आहे.कारण महादेव कोगनुरे म ागच्या १० वर्षापासून सामाजिक कार्य पार पाडताना दिसून आले आहेत. यावरुनच महादेव कोगनुरे हे नक्कीच भाजपात प्रवेश करुन आपल्या राजकीय इनिंगला सुरुवात करतील अशी भावना कोगनुरे यांच्या कार्यकर्त्यातुन व्यक्त केली जात होती.आता महादेव कोगनुरे यांनी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश करुन महायुतीला झटका दिला आहे.महादेव कोगनुरे यांच्या या राजकीय भुमिकेमुळे कार्यकर्त्यांना मात्र अश्चर्याचा धक्का बसला आहे.गेल्या अनेक दिवसांपासून कार्यकर्त्यांची ताणलेली उत्सुकता मात्र आता कमी झाल्याचे दिसून येत आहे. कोगनुरे यांच्या प्रवेशाने प्रणितीचा भार हलका झाला'' अशा भावना श्री सुशीलकुमार शिंदे यांनी व्यक्त केले. कोगनूरे यांच्या अपेक्षा निश्चितच पुर्ण होतील असे प्रतिपादन प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांनी केले



> दक्षिण सोलापूर तालुका हीच माझी कर्मभूमी आहे या कर्मभूमीतच काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून आता माझ्या सामाजिक व राजकीय इनिंगला सुरुवात करीत आहे. गरीब, गरजू, निराधार व जळीतग्रस्तांना आधार देण्याचे काम यापुढे ही अखंडपणे सुरु राहिल.यासाठी आपले बहुमूल्य आशिर्वाद मात्र सदैव माझ्या पाठिश असेल अशी मी आशा व्यक्त करतो.
>
> **- महादेव कोगनुरे**

# सोलापुरात उन्हाचा कडाका कायम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

यंदाच्या एप्रिल महिन्यात आलेल्या उष्णतेच्या लाटांमुळे लोक चांगलेच भाजून निघाले. त्यात आता मे महिन्यामध्येही उष्णतेच्या लाटांचा तडाखा कायम राहणार असून, देशाच्या विविध भागात मे मध्ये सरासरीपेक्षा अधिक तापमान राहील, असा इशारा भारतीय हवामान खात्याने दिला आहे. यामुळे सोलापूर जिल्ह्यातही आजही उन्हाचा तडाका कायमच होता. मध्यंतरी तर ४४ अंशाच्या पुढे गेलेल्या सोलापुरात आजही ४२.८ अंश इतके तापमान होते. यामुळे दिवसभर सोलापूरच्या नागरिकांच्या अंगाची लाही-लाही होत होती.

एप्रिल मध्ये मुंबई, ठाणे, सोलापूर, रायगडसह देशाच्या विविध भागात उष्णतेच्या लाटा आल्या व सर्वसाधारण तापमान ४० ते ४३ अंशाच्या आसपास नोंदवले गेले. यानंतर सोलापुरात तर ४४ अंशाच्या पुढे तापम ान गेले होते. यामुळे चाकरमाने आणि शेतकरी बांधवांना उष्ण वातावरणाचा प्रचंड त्रास झाला. शाळांना सुटी मिळाल्याने चिमुकले या उष्णतेपासून बचावले आहेत. मात्र इंजिनिअरिंग व इतर काही कोर्से ससाठी बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना या उष्ण वातावरणाशी सामना करावा लागत आहे. आता भारतीय हवामान खात्याने मे म हिन्याचा हवामानाचा अंदाज व्यक्त केला आहे. पूर्व-उत्तर-पश्चिम व मध्य भारताचा काही भाग वगळता संपूर्ण देशात सरासरीपेक्षा अधिक तापम ान राहणार आहे. दक्षिण राजस्थान, पश्चिम मध्य प्रदेश, विदर्भ, मराठवाड़ा, गुजरातमध्ये पाच ते आठ अतिरिक्त दिवस उष्णतेच्या लाटा येण्याचा अंदाज आहे. तसेच कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भाच्या जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. यामुळे आगामी काही दिवसात सोलापूर शहरातही उष्णतेची लाट येवून पुन्हा ४४ अंशाच्या वर तापमानाचा पारा जाण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.



## निधन वृत्त...

### यल्लप्पा करली



**सोलापूर, दि. २ मे-**

भवानी पेठ, घोंगडे वस्ती येथील भवानी पेठ घोंगडे वस्ती परिसरातील जेमिनी सांस्कृतिक व क्रीडा बहुउद्देशीय संस्थेचे माजी अध्यक्ष यल्लप्पा फकीराप्पा करली (वय ३५) यांचे गुरुवारी पहाटे आकस्मित निधन झाले आहे.

### छाया कुंभार



**अकलूज, दि.२ मे-**

येथील शिवभक्त छाया पोपटराव कुंभार (वय ६३) यांचे अल्पशा आजाराने आज गुरुवार दिनांक २ मे रोजी दुखद निधन झाले त्यांच्यामागे तीन मुले, एक विवाहित मुलगी, जावई सुना ,नातवंडे असा परिवार आहे. कुंभार समाजाचे अध्यक्ष अमित सुरेश कुंभार यांच्या त्या चुलती होत.

### केशरबाई जायभाय



**पंढरपूर, दि.२ मे-**

अकलुज/शंकरनगर सुनयनानगर येथील केशरबाई पंढरीनाथ जायभाय यांचे (वय ७०) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा,पाच मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. अकलूज येथील सहकार महर्षि कारखान्याचे निवृत्त गुणवंत कर्मचारी पंढरीनाथ जायभाय यांच्या पत्नी व माळखांबी (ता. माळशिरस) येथील प्राथमिक शिक्षक विष्णू जायभाय यांच्या मातोश्री होत्या.

### सुनंदाताई महिंद्रकर



**विजयपूर, दि. २ मे-**

भारतीय जनता पार्टी विजयपूर जिल्ह्यातील ज्येष्ठ नेत्या, विजयपूर नगरसभेच्या माजी सदस्य, भावसार क्षत्रिय समाज महिला मंडळाच्या माजी राष्ट्रीय अध्यक्षा, सामाजिक कार्यकर्त्या सुनंदाताई महिंद्रकर (वय ८९) यांचे मंगळवार ३० एप्रिल रोजी सकाळी ६ वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. सायंकाळी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### आण्णेशा माणिकशेट्टी



**सोलापूर, दि. २ मे-**

जी. बी. तथा आण्णेशा माणिकशेट्टी (वय ९२) सेवानिवृत सर्कल इन्स्पेक्टर रेव्हेनू खाते यांचे बुधवारी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी सकाळी किणी (ता.अक्कलकोट) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे दोन मुले दोन मुली सुना जावई व नातवंडे आहेत. सोलापूर ग्राहक भांडारचे सरव्यवस्थापक कैलास माणिकशेट्टी यांचे ते वडील आहेत.

### आण्णा करपे



**पंढरपूर, दि.२ मे-**

सुस्ते येथील आण्णा धोंडी करपे (वय ७७) यांचे गुरुवारी १ मे २०२४ रोजी दुपारी दोन वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. विवेक वर्धिनी विद्यालय पंढरपूर येथील सहशिक्षक बाळासाहेब करपे यांचे ते वडील होत.


**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : House of People (Loksabha Election) -2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending criminal cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 42-Solapur (SC) Parliamentary Constituency | Ram Vitthal Satpute | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) & of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | | | 1) Joint Civil Judge & J.M.F.C. Pune, SCC 24046/2017<br>2) 18 J.M.F.C. Pune, RCC 3496/2018<br>3) 18 J.M.F.C. Pune, SCC 420188/2013<br>4) 6-9 Jt. C.J.J.D & J.M.F.C. Solapur, SCC 6277/2023 | 1) IPC 147, 143, 323, 353, 504, 34, BPA 37(3) R W 135<br>2) IPC 143, 147, 149, 323, 336, 341, BPA 135<br>3) IPC 143, 147, 149, 323, 504<br>4) IPC 336, 188, 269, 270, MPA 135 DMA 51(B) | NIL | NIL | NIL |

Name of constituency : **42 - Solapur (SC) Parliamentary Constituency**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule**
**President, Bharatiya Janata Party, Maharashtra**

## संक्षिप्त वृत्त



**सोलापूर : महाराष्ट्र दिनानिमित्त सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयामध्ये पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपायुक्त विजय कबाडे, अजित बोऱ्हाडे, डॉ. दिपाली काळे आदी.**

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची सोलापूर आकाशवाणी केंद्रावर शनिवारी मुलाखत

**सोलापूर, दि. ०२ :**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ अनुषंगाने जिल्ह्यातील ४२- सोलापूर व ४३- माढा या लोकसभा मतदारसंघात मतदान जागृती आणि मतदान केंद्रावर देण्यात येणाऱ्या सुविधा या विषयावर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची सोलापूर आकाशवाणी केंद्रावर मुलाखत २ मे रोजी प्रसारित झाली. ही मुलाखत पुन: प्रसारण शनिवार दि. ०४ मे २०२४ रोजी ८.४० वाजता होणार आहे. तसेच न्यूज ऑन एआयआर या मोबाईल ॲपवरुन प्रसारित होईल आहे. आकाशवाणीचे अभिराम सराफ यांनी ही मुलाखत घेतली आहे. या मुलाखतीचे सादर करते डॉ. सोमेश पाटील हे आहेत. मतदान जनजागृतीच्या अनुषंगाने आकाशवाणीवर प्रसारित होणारी ही मुलाखत जास्तीत जास्त नागरिकांनी ऐकावी व दिनांक ७ मे २०२४ रोजी मतदान केंद्रावर जाऊन मतदान करावे असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.






### नागेश करजगी ऑर्किड महाविद्यालय हॅकॅथॉन स्पर्धेत तृतीय

**सोलापूर, दि. २ मे-**

येथील नागेश करजगी ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयातील तृतीय वर्ष आर्टीफिशिअल इंटेलिजन्स आणि डेटा सायन्समधील विनय हिप्परगे, श्रीराज वल्लमदेशी, साईराम गुडेली आणि राहुल चव्हाण यांच्या संघाने तेलंगणातील हैद्राबाद सीबीआईटी येथे झालेल्या हॅकॅथॉन या प्रोजेक्ट स्पर्धेमध्ये उत्कुष्ट कामगिरी केल्याने तृतीय क्रमांक पटकावत सीबीआईटी कॉलेज आणि व यांच्याकडून रुपये ५० हजार रोख बक्षीस मिळविले. या स्पर्धेसाठी १५० संघानी संपूर्ण भारतातून विविध अभियांत्रिकी महाविद्यालयातील संघ आले होते. त्यातून शेवटच्या ५१ संघांनी अंतिम फेरीत एकमेकांना अतिशय पूरक असा लढा दिला. पण ऑर्किडचे विद्यार्थी येथे वरचढ ठरले व यश संपादन केले. या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांच्यासह प्राचार्य डॉ. बी. के. सोनगे, आधिष्ठाता प्रशासन ए. एस. काशीद आणि आर्टीफिसिअल इंटेलिजन्स आणि डेटा सायन्स विभाग प्रमुख डॉ. एम. बी. पाटील, संगणक विभाग प्रमुख डॉ. व्ही. व्ही. बाग यांनी अभिनंदन केले. हा प्रोजेक्ट यशस्वी करण्यासाठी विद्यार्थ्यांना डॉ. एम. बी. पाटील यांनी मेहनत घेतली.




### राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने ध्वजारोहण

**सोलापूर, दि.२ मे-**

महाराष्ट्र दिनाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांच्या हस्ते पार्क चौक येथील जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांच्या संपर्क कार्यालया बाहेर ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रध्वजाला उपस्थित पदाधिकारी यांनी सलामी दिली. ध्वजगीत महाराष्ट्रगीत राष्ट्रगीत नंतर कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष संतोष पवार व कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांनी महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या निमित्ताने पक्षातील प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते यांच्यासह कामगारांना सोलापूर शहरवासियांना शुभेच्छा दिल्या. यावेळी यावेळी ज्येष्ठ नेते आनंद चंदनशिवे, हेमंत चौधरी, सेवादलचे सिकंदर गोलंदाज, सेवादल शहराध्यक्ष प्रकाश जाधव, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, बसवराज बगले, आनंद मुस्तरे, अमोल कोठीवाले, अमीर शेख, राजू बेळेनवरू, पवन पाटील, अनिल बनसोडे, युवराज माने, रुपेश भोसले, बसवराज कोळी, तनवीर गुलजार, सोमनाथ शिंदे, शामराव गांगर्डे, इरफान शेख, महिला कार्याध्यक्ष चित्रा कदम, महिला प्रदेश सरचिटणीस लता ढेरे, सुरेखा घाडगे, प्रिया पवार, कांचन पवार आदी उपस्थित होते.

# काँग्रेसकडूनच 'मिनी संविधान' करण्याचा प्रयत्न

## भाजपच्या अमर साबळे यांचा आरोप, नरेंद्र मोदींनी हत्तीच्या अंबारीत काढली होती संविधानाची मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे -**

लोकसभा निवडणुकीत काँग्रेसकडे व त्यांच्या मित्रपक्षांकडे लोकांसमोर जाण्यासाठी कोणतेही मुद्दे नसल्याने केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले संविधान बदलले जाणार असल्याचा कांगावा ही मंडळी करीत आहे. मात्र, नरेंद्र मोदी हे गुजरातचे मुख्यमंत्री असताना हत्तीच्या अंबारीत संविधानाची मिरवणूक त्यांनी काढली होती. आता तर ते केंद्रात असताना संविधान कसे बदलतील? असा सवाल राज्यसभेचे माजी खासदार अमर साबळे यांनी गुरुवारी (दि. २) पत्रकार परिषदेत केला.

भारतीय जनता पार्टीचे सरकार संविधान बदलणार असल्याचा विनाकारण गैरसमज सध्या काँग्रेस व त्यांच्या मित्र पक्षांकडून पसरवला जात आहे. त्याविषयी साबळे यांनी पक्षाचे स्पष्टीकरण दिले. भाजपचा नारा हा सबका साथ, सबका विकास असून, असे असताना भाजप हे मुस्लिम विरोधी कसे म्हणायचे, त्यामुळे भाजप हा कधीही मुस्लिम समाजाच्या विरोधात नसल्याचे ते म्हणाले. दरम्यान, इंदिरा गांधी यांच्या कार्यकाळात आणि काँग्रेसच्या सरकारकडून मात्र ४० वर्षात अनेक घटना दुरुस्त्या करून मिनी संविधान करण्याचा प्रयत्न झाला होता, असा आरोप साबळे यांनी केला. ते पुढे म्हणाले की, सध्याच्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस व त्यांचे मित्रपक्ष बिनबुडाचे आरोप करीत आहेत. २०१४ पासून देशात मोदी सरकार आले. यावेळी पंतप्रधान पदाची शपथ घेतल्यानंतर त्यांनी संसदेच्या पायरीवर प्रथमत: माथा टेकला आणि संविधान प्रतीवरही ते नतमस्तक झाले होते. डॉ. बाबासाहेबांनी संविधान लिखान झाल्यानंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी ते समर्पित केले होते. त्यामुळे मोदी सरकारने या दिवशी संविधान दिन पाळावा असे निर्देशही काढले. संविधानाचा ढाचा कोणासही बदलता येत नाही असे आदेश सुप्रिम कोर्टाचे आहेत; तर मग भाजपाला संविधान कसे बदलता येते? असा सवालही साबळे यांनी उपस्थित केला.



### जो हिंदू हितकी बात करेगा, वो देशपर राज करेगा

आपल्या भारत देशाच्या फाळणीनंतर एक हिंदुस्थान आणि दुसरा पाकिस्तान झाला. हिंदुस्थानमध्ये मोठ्या प्रमाणात हिंदू समाज होता आणि आजही आहे. तर पाकिस्तानमध्ये मोठ्या प्रमाणात मुस्लिम समाज होता. यामुळे आपल्या देशात जो हिंदू हितकी बात करेगा, वो देशपर राज करेगा असा खुलासाही माजी खासदार अमर साबळे यांनी केला. भाजपाचेही धोरण हिंदुत्वाचेच आहे. येथील मुस्लिम व इतर समाजाला भाजप कधीही टार्गेट करीत नाही. आमचे धोरण सबका साथ सबका विकास हेच राहणार आहे. गेल्या १० वर्षांत सर्वांनीच याचा अनुभवही घेतल्याचे त्यांनी नमूद केले.

### डॉ. बाबासाहेब पुन्हा जन्माला आले तरी संविधान बदलणार नाही

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानाचे महत्व गीता, कुराण, बायबलप्रमाणेच असून, खुद्द डॉ. बाबासाहेब आंबेडकर जरी पुन्हा जन्माला आले तरी त्यांनी लिहिलेले हे संविधान बदलता येणार नाही. काँग्रेस व मित्र पक्षाची सध्याची स्थिती भयानक विदारक असून, यामुळेच ते संविधान बदलाचा गैरसमज पसरवित आरोप साबळे यांनी केला.

|| तृतीय पुण्यस्मरण ||



कै. शंकर मल्लिकार्जुन हुलीकर (मुंबई)
(मृत्यू दि. ०२/०५/२०२१)
यांना तृतीय पुण्यस्मरणानिमित्त आमची भावपूर्ण श्रध्दांजली!
तुमचं असणं सर्व काही होतं,
आयुष्यातील ते सुंदर पर्व होतं..
आज सर्व काही असल्याची
जाणीव आहे...पण
तुमचं नाव, हीच मोठी
उणीव आहे.
समस्त हुलीकर परिवार व आप्तेष्ट मंडळी

# डॉक्टराला जातीवाचक शिवीगाळ; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ मे-**

डॉक्टराला जातीवाचक शिवीगाळ करणाऱ्याविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत डॉ. किशार नामदेव वाघमारे (रा. श्रेया कॉम्प्लेक्स, आदित्य नगर, आरटीओ ऑफीस रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विक्रम अरूण नंदूरकर (रा. रेल्वे लाईन, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

३१ मे २०२३ ते २९ एप्रिल २०२४ या कालावधीत डॉ. किशोर वाघमारे यांनी विक्रम नंदूरकर यांच्या रामलाल चौकातील गाळ्यात डेंटल क्लिनीक सुरु केले होते. त्या गाळ्याचे ९ हजार रुपये भाडे व १ लाख २५ हजार रुपये डिपॉझिट डॉ. वाघमारे यांनी नंदूरकर यांना दिलेले होते. सन २०२३ मध्ये भाडे वाढवून मागितल्याने, ते परवडत नसल्याने डॉ. वाघमारे यांनी नंदूरकर यांना गाळा रिकामा करून ताब्यात दिला व दि. १ जून २०२३ पासून आदित्य नगर येथे ओम डेंटल क्लिनीक सुरु केले. डॉ. वाघमारे यांनी नंदूरकर यांस डिपॉझीटपोटी दिलेली रक्कम वारंवार मागितली असता नंदूरकर याने ती देण्यास टाळाटाळ केली. रामलाल चौकातील गाळ्यात नविन मेडीकल सुरु झाल्यानंतर डॉ. वाघमारे यांनी डिपॉझिटची रक्कम मागितल्यानंतर नंदूरकर याने डॉ. वाघमारे यांना शिवीगाळ करून हाकलून दिले. तसेच २९ एप्रिल रोजी डॉ वाघमारे हे त्यांचे मित्र प्रविण काळे यांच्यासमवेत क्लिनीकमध्ये बसले असताना नंदूरकर याने येऊन तुला तुझे डिपॉझिट परत देणार नाही, तुला काय करायचे आहे ते कर जा, तु सोलापूरमध्ये कसा राहतो ते बघतो असे म्हणून जातीवाचक शिवीगाळ करून निघून गेला. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस आयुक्त अजय परमार पुढील तपास करीत आहेत.




# डिवायडरमधील लाईटच्या पोलला धडक; सांगलीच्या तरुणावर गुन्हा

**सोलापूर** - चारचाकी वाहन निष्काळजीपणे चालवून डिवायडरमधील लाईटच्या पोलला धडक देऊन ५५ हजार रुपयांचे नुकसान करणाऱ्या सांगलीच्या तरूणाविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शिवाजी रामचंद्र मोरे (वय ५७, रा. स्वराज्य विहार, बलदवा हॉस्पीटलमागे, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अजित लोभाजी चोपडे (वय २२, रा. संजय नगर, सांगली) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २८ एप्रिल रोजी दुपारी शहरातील सात रस्ता ते रेल्वे स्टेशन मार्गावरील चंदुकाका सराफ या दुकानासमोर अजित चोपडे याने त्याच्या ताब्यातील एमएच १० इएफ ७२२५ क्रमांकाची पिकअप जीप भरधाव चालवून डिवायडरमधील लाईटच्या पोलला जोरदार धडक दिली. यामध्ये महापालिकेच्या पोलचे ५४ हजार ३५० रुपयांचे नुकसान झाल्याची नोंद सदर बझार पोलिसांत करण्यात आली आहे. हवालदार वाडीकर पुढील तपास करीत आहेत.



# आयुक्तालयातील १५ जणांना महासंचालकांचे सन्मानचिन्ह प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ मे**

सोलापूर शहर पोलिस दलातील १५ अधिकारी-कर्मचाऱ्यांना पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्या हस्ते पोलिस महासंचालकांचे सन्मानचिन्ह महाराष्ट्र दिनी प्रदान करण्यात आले. यावेळी पोलिस उपायुक्त विजय कबाडे, अजित बोऱ्हाडे, डॉ. दिपाली काळे आदी उपस्थित होते.

१ मे महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला राज्यातील पोलिस दलात उत्तम काम गिरी व उल्लेखनिय सेवा केल्याबद्दल हे सन्मानचिन्ह जाहीर केले होते.

**सन्मानचिन्ह मिळालेले यांप्रमाणे :** स.पो.आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक शिवाजी राऊत, पोलिस उपनिरीक्षक प्रकाश किणगी, अल्फाज शेख, स.पोलिस उपनिरीक्षक भैय्यासाहेब थोरात, रामचंद्र मदभावी, लक्ष्मण थोरात, पोलिस हवालदार प्रशांत खडबडे, आसिफ तारानाईक, युसूफ काझी, देवपुत्र मरेड्डी, आप्पासाहेब कोळी, महिला पोलिस हवालदार रेश्मा माने, अर्चना गवळी, पोलिस शिपाई हेमंत वाघमारे.

# वीरशैव व्हिजनची उद्यापासून बसव व्याख्यानमाला


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त वीरशैव व्हिजनच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे दि.४ ते ६ मे २०२४ दरम्यान रोज सायंकाळी ६ वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे बसव व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले यांनी पत्रकार परिषदेत दिली.




तीन दिवसीय बसव व्याख्यानमालेतील पहिले पुष्प शनिवार दि. ४ रोजी प्रा. राजा माळगे (सांगली) हे महात्मा बसवेश्वर : काल, आज आणि उद्या या विषयावर गुंफणार आहेत. पहिल्या पुष्पाचे उद्घाटन सोलापूर महानगरपालिकेचे अतिरीक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या हस्ते, निवृत्त सहाय्यक पोलिस आयुक्त दिपक आर्वे यांच्या अध्यक्षतेखाली तर शांती एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सिध्देश्वर पाटील, आडत व्यापारी सिद्रामप्पा हुलसुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.





दुसरे पुष्प बुधवार दि. १९ रोजी केंद्रिय आयुष मंत्रालयाचे सदस्य डॉ. शिवरत्न शेटे (एम. डी. आयुर्वेद) हे चला संस्कार जपू या ! या विषयावर गुंफणार आहेत. दुसऱ्या पुष्पाचे उद्घाटन हृदयरोग तज्ञ डॉ. शैलेश पाटील यांच्या हस्ते, डॉ. प्रकाश घटोळे यांच्या अध्यक्षतेखाली तर डॉ. सिध्देश्वर वाले, उद्योगपती राजशेखर मिनजगी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.




सोमवार दि. ६ रोजी स्वानंद (मोहोळ) प्रस्तुत संगीत रजनी या मराठी व हिंदी गाण्यांच्या सुरेल मैफीलीने या व्याख्यानमालेचा समारोप होणार आहे. त्याचे उद्घाटन उद्योगपती दत्ता सुरवसे यांच्या हस्ते आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र. कुलगुरु अध्यक्षतेखाली होणार आहे तर ॲड. लायन्स क्लबचे माजी अध्यक्ष ॲड. अमित आळंगे, सोलापूर जिल्हा मोबाईल असोसिएशनचे उपाध्यक्ष विजय नवले यांच्या उपस्थितीत होणार आहे. या व्याख्यानमालेस उपस्थित राहणाऱ्या श्रोत्यांमधून दररोज ५ श्रोत्यांना सोडतीद्वारे आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार आहे. तरी सोलापूर वासियांनी बसव व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा असे आवाहन वीरशैव व्हिजन उत्सव समितीचे अध्यक्ष शिवानंद सावळगी यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस नागेश बडदाळ, आनंद दुलंगे, विजयकुमार बिराजदार, सोमेश्वर याबाजी, राजेश नीला, सोमनाथ चौधरी आदी उपस्थित होते.

# संशयकल्लोळ!

## सरकारनामा : विजयकुमार पिसे











**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे,**

दरवर्षी एक पीएम, अर्थात प्रत्येकाला पीएम पदाचे चॉकलेट. सोलापूरच्या सभेत नरेंद्र मोदी यांनी पाच पीएमचा गौप्यस्फोट केला, ज्यामुळे उध्दोजीराव भलतेच संतापले होते. रात्री झालेल्या सभेत ठाकरे म्हणाले, हे तुम्हाला कुणी सांगितलं हा फार्म्युला. एकेकाला संधी देणार म्हणून! अशाच चॉकलेटमुळे दक्षिण सोलापूरमध्ये संशयकल्लोळ वाढला आहे. लोकसभेला ताई, आणि विधानसभेला तुम्ही. तुम्ही म्हणजे अनेक दादा मंडळी. साहेबांनी सांगितलंय, नव्हं शब्द दिलायं. यंदा आमदार तुम्हीच. यावर एक फ्री, म्हणजे मार्केट कमिटीची सत्ता. मग असं असेल तर एकापेक्षा अधिक जणांना संधी हम खास मिळणार.

दिलीप माने यांची ३१ मार्चला घरवापसी झाली. त्यांची घरवापसी म्हणजे ताईंना खासदार करण्याचा पक्का वादा. पण निष्ठावंत सुरेश हसापुरे यांची अडचण वाढली. आमदारकीच्या दाव्यावरूनच हसापुरे आणि माने यांच्यात वितुष्ट आले. पुढे बाजार समितीत मानेंची पक्की मांड बसली. त्यामुळे दोस्त दोस्त ना रहा, हा सूर अजूनही आळवला जात आहे. हेच दु:ख राजशेखर शिवदारे यांचेही. दोघांत तिसरा. म्हणजे बाबा मिस्त्री यांना विसरा. काँग्रेस नेतेमंडळींनी एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून ताईना खासदार करण्याचा निर्धार केला आहे. पण या चार नेत्यांपैकी किती जणांना सत्तेचं चॉकलेट शिंदे साहेब देणार आहेत, याचा उलगडा आता नाही होणार. त्यासाठी प्रतीक्षा तर करावीच लागेल. आणि चॉकलेट मिळाले नाही तर पुढे काय? विधानसभा डोळ्यासमोर ठेवून दिलीप माने यांनी राजशेखर शिवदारे यांच्या वाढदिवसाचा मुहूर्त साधून (तेव्हा) ७ एप्रिल रोजी डाव साधला होता. शिवदारे सोलापूर बाजार समितीत सभापती पदावरून पदच्युत झाले. शिवदारे प्रणितीताईच्या निवडणूक प्रचारात अधूनमधून डोकावतात. त्यांना म्हणे सभापतीपदाची गॅरंटी हवी आहे. ती शिंदे साहेबांनी दिली असावी. पण या दरम्यान शिवदारे यांना अशीच गॅरंटी देवेंद्र भाऊ यांच्याकडून हवी होती, अशी चर्चा आहे. पण हे त्रांगडे निस्तरणे कितपत शक्य आहे, याची खात्री देणे तूर्तास तरी दृष्टीपथात नाही, असा निरोप गेल्यामुळे शिवदारे यांचा नाईलाज झाला. आणि आता झोकून ताईचा प्रचार करतील, असे त्यांच्या समर्थकांना वाटते.

माने यांची घरवापसी हसापुरे यांना कितपत सोयीची असेल. साहेबांचे निष्ठावान अशी त्यांची ओळख. तरीही विधानसभेचे तिकीट शिंदे साहेब देणार का? हा कळीचा प्रश्न आहे. विधानसभा नसेल तर मग मार्केट कमिटीवर दावा राहील का? ही शक्यता अधिक असल्यामुळे हसापुरे अधिक जोर लावून ताईचा प्रचार करीत आहेत. तसे झाले तर विधानसभेला माने, मार्केट कमिटीत हसापुरे असा न्यायगत तोडगा उभयपक्षी निश्चित मान्य होऊ शकेल. माने, हसापुरे आणि शिवदारे यांना सत्तेचा वाटा मिळणार असेल तर गत विधानसभा निवडणुकीत चिवट झुंज दिलेले बाबा मिस्त्री यांच्या ताटात काय? जेमतेम मतांच्या फरकाने बाबा मिस्त्री भाजपाचे सुभाष देशमुखांकडून पराजित झाले. म्हणजे पुढील निवडणुकीत बाबा मिस्त्री जायंट किलर ठरतील. पण ताईसाठी बळी दिला तर? जसे २००३ मध्ये आनंदराव देवकते यांचा बळी दिला गेला होता.

या संशयकल्लोळात कडवे शिवसैनिक अमर पाटील यांना कुठे न्याय देणार? काल सोलापुरात शहर मध्य मतदार संघात झालेल्या प्रचार सभेत जमवलेल्या गर्दीत अमर पाटलांचा मोठा वाटा होता. दक्षिण सोलापूर तालुक्यातून मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते. त्यामुळे उध्दव ठाकरेंचा विश्वास वाढेल. अमर पाटलांनाही विधानसभा लढवायची आहे. ही जागा काँग्रेसला गेली तर, शिवसेनेच्या अस्तित्वाचे काय? लोकसभा निवडणुकीत सर्वाधिक जागा उध्दवसेना लढवते, विधानसभेलाही हेच गणित अपेक्षित आहे. अन्यथा दक्षिण सोलापूर तालुक्यात ठाकरेंची मशाल विझवणार का? अमर पाटील आणि त्यांची शिवसेना विधानसभेच्या बाबतीत खूप दूर की बात अशीच आहे. त्यामुळे सत्तेचे चॉकलेट सगळ्यांना देताना कुणीतरी वंचित राहणारच. पुढे संशयकल्लोळ वाढला तर!

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● निवासी संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Resident Editor (The Editors are responsible as per PRB Act). Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue.

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


# इतिहास संशोधन मंडळाच्या महिला प्रतिनिधीपदी डॉ.अमिता जावळे

## अध्यक्षपदी प्रा. डॉ. संजय गायकवाड, सचिवपदी डॉ. विकास शिंदे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २ मे-**

इतिहास संशोधन मंडळाच्या वतीने सतरावे अधिवेशन येथील ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयात पार पडले.



या अधिवेशनात आमसभेच्या नवीन कार्यकारणीची तीन वर्षासाठी बिनविरोध निवड झाली. या नवीन कार्यकारिणीचे अभिनंदन माजी अध्यक्ष प्राचार्य सोपान जावळे, प्रा डॉ चंद्रकांत चव्हाण, प्रा. डॉ. अरूण सोनकांबळे, प्रा.डॉ. राजेंद्र गायकवाड यांनी केले.

**नवीन कार्यकारणी :** अध्यक्ष : प्रा. डॉ.संजय गायकवाड (मा.ह.म हाडिक कला व वाणिज्य महाविद्यालय मोडनिंब), उपाध्यक्ष : प्रा. डॉ. शिवाजी वाघमोडे (भारत महाविद्यालय जेऊर), सचिव : डॉ. विकास शिंदे (माऊली महाविद्यालय वडाळा), सहसचिव : डॉ. दिगंबर वाघमारे (विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय टेंभुर्णी), खजिनदार : डॉ.किशोर थोरे सी.बी.खेडगीज, अक्कलकोट). सदस्य : डॉ.प्रा. तुकाराम शिंदे (ए.आर. बुर्ला), श्री मनोज कसबे (संतोष भीमराव पाटील महाविद्यालय मंद्रूप), डॉ. आशिष रजपूत (श्रीमान भाऊसाहेब झाडबुके, बार्शी), डॉ. उमेश साळुंखे (कर्मवीर भाऊराव पाटील पंढरपूर), डॉ. सज्जन पवार (शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालय अकलूज), महिला प्रतिनिधी : डॉ.अमिता जावळे.



## क्राईम वृत्त...

### जुना विडी घरकुल परिसरातील गडगी नगरात ७१ हजारांची घरफोडी

**सोलापूर, दि. २ मे-**

शहरातील जुना विडी घरकुल परिसरातील गडगी नगरातील श्रीनिवास लक्ष्मण उकरंडे (वय ४९) यांचे बंद घर फोडून चोरट्याने ७१ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेला. उकरंडे हे २८ एप्रिल रोजी दुपारी घराला कुलूप लावून बाहेर गेले होते. त्यावेळी चोरट्याने उकरंडे यांच्या बंद घराचे कुलूप तोडून कपाटातील ५ ग्रॅमचे सोन्याची कर्णफुले, ५ ग्रॅमची सोन्याची बुगडी, १० ग्रॅमचे चांदीचे निरंजन व रोख रक्कम असा ७१ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार डोके पुढील तपास करीत आहेत.

### शिवशक्ती चौकातून ४५ हजारांची दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. २ मे-**

एमआयडीसी परिसरातील शिवशक्ती चौकातून चोरट्याने ४५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत अर्जुन बाबूराव कोकणे (वय ४१, रा. कलावती नगर, सुनिल नगर, एमआयडीसी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २५ एप्रिल रोजी कोकणे यांनी त्यांची एमएच १३ ईएच ९९०१ क्रमांकाची दुचाकी ही शिवशक्ती चौकात पार्क केली होती. त्यावेळी ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार उबाळे पुढील तपास करीत आहेत.

### विनाकारण तरूणास मारहाण करणाऱ्या तिघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २ मे-**

विनाकारण तरूणास मारहाण करणाऱ्या तिघांवर सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबबात सचिन विवेक इगलोर (वय २३, रा. मोदी, हुडको, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विशाल चिलवादी, सुदर्शन कांबळे, अरूण पेद्दी यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २९ एप्रिल रोजी मोदी स्मशानभूमी १ गेटजवळ सचिन इगलोर व त्याचा मित्र कुनशीकर, बोलेदल्लू हे शौचास जात होते. त्यावेळी विनाकारण विशाल चिलवादी व इतरांनी बांबूने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जखमी केले व मोबाईलची तोडफोड केली. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला पोलिस नाईक वाघमोडे पुढील तपास करीत आहेत.

### दुचाकीच्या धडकेने तीन पादचारी जखमी

**सोलापूर, दि. २ मे-**

भरधाव दुचाकीच्या धडकेने तीन पादचारी जखमी झाले. ही घटना २४ एप्रिल रोजी रात्री साडेदहाच्या सुमारा हैद्राबाद रोडवरील नवाज हॉटेलसमोर घडली.याबाबत श्रीशैल नितीन हरसुरे (वय २२, रा. सरवदे नगर, मुळेगाव रोड, विडी घरकुल, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन केरना देवप्पा लोखंडे याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २४ एप्रिल रोजी दहिटणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुकीत श्रीशैल हरसुरे, फुलचंद जाधव व गणेश हरसुरे हे तिघे गेले होते. मिरवणुक संपल्यानंतर दहिटणे येथून सरवदे नगरकडे चालत येत असताना नवाज हॉटेलसमोर केरनाथ लोखंडे यांनी त्यांच्या ताब्यातील एमएच १३ ई एच ८५१५ क्रमांकाच्या दुचाकीने जोरदार धडक दिली. यामध्ये तिघेही जखमी झाल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे.

### तपोरत्नं योगीराजेंद्र स्वामी नगरात ४६ हजारांची घरफोडी

**सोलापूर, दि. २ मे-**

आकाशवाणी रोडवरील तपोरत्नं योगीराजेंद्र स्वामी नगरातील बंद घर फोडून चोरट्याने ४६ हजारांचे सोन्या-चांदीचे दागिने लंपास केले. अजय मोहन बसुदे (वय ४३) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. बसुदे हे २७ एप्रिल रोजी घराला कुलूप लावून परगावी गेले होते २९ एप्रिल रोजी ते परत घरी आले. त्यावेळी त्यांना घरात चोरी झाल्याचे दिसून आले. चोरट्याने बसुदे यांच्या घराचा मुख्य दरवाजाचा कडी कोयंडा उचकटून घरातील पहिल्या मजल्यावरील बेडरूममधील लोखंडी कपाटाचे लॉकर तोडून त्यातील लोखंडी संदुक व ४६ हजार रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले. हवालदार भांगे पुढील तपास करीत आहेत.

## संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात

# बलिदान दिलेल्या हुतात्म्यांचे योगदान महत्वाचे



### ध्वजारोहणप्रसंगी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

महाराष्ट्राच्या ६५व्या स्थापना दिन तसेच कामगार दिन या मंगलदिनी मराठी भाषिकांचे राज्य स्थापन करण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात बलिदान दिलेल्या १०५ हुतात्मांना श्रध्दांजली अर्पण करून महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी त्यांचे योगदान व बलिदान महत्वाचे आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

महाराष्ट्राच्या ६५व्या स्थापना दिनानिमित्त तसेच कामगार दिनानिमित्त जिल्ह्यातील सर्व नागरिकांना पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. जिल्ह्यात विविध धर्माचे, पंथाचे, वंशाचे, जातीचे तसेच विविध प्रदेशाचे लोक बंधुभावाने, सलोख्याने एकतेच्या भावनेने नांदत असल्याचे सांगून सर्वजण मिळून राष्ट्रीय ऐक्य अधिक मजबूत करुया, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, अतिरिक्त पोलिस अधीक्षक प्रीतम यावलकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, प्रांताधिकारी विठ्ठल उदमले, जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने आदी उपस्थित होते. १ मे १९६० हा महाराष्ट्र राज्य स्थापनेचा दिन. याच दिवशी महाराष्ट्राचा मंगलकलश मिळाला आणि नव्या महाराष्ट्र राज्याची मुहुर्तमेढ रोवली गेली. प्रारंभी पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते पोलीस परेड मैदानावर मुख्य ध्वजारोहण झाले. यावेळी राष्ट्रगीत व राज्य गीत गायन झाले. त्यानंतर परेड निरीक्षण पालकमंत्री पाटील यांनी करून परेड संचलन झाले.

# मंद्रूपच्या पल्लवी पंडित बागुल यांना आदर्श तलाठी पुरस्कार



**सोलापूर :** महाराष्ट्र शासनाकडून सन १९९६-९७ या वर्षापासून महाराष्ट्र दिनाच्या दिवशी प्रत्येक जिल्ह्यातील एका तलाठ्याला आदर्श तलाठी पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. सन २०२३-२४ वर्षासाठी सोलापूर जिल्ह्यातून श्रीमती पल्लवी पंडित बागुल, तलाठी, अप्पर तहसील कार्यालय मंद्रूप,उपविभागीय कार्यालय सोलापूर क्रमांक दोन यांना हा पुरस्कार जाहीर झालेला आहे. प्रमाणपत्र व ५ हजार रुपये धनादेश देऊन हा पुरस्कार देण्यात येतो. या पुरस्काराचे वितरण जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते तलाठी श्रीमती पल्लवी पंडित बागुल यांना देण्यात आला.

तत्पूर्वी महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६५ व्या दिनानिमित्त नवीन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते सकाळी ७ वाजून १० मिनिटांनी ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, उपजिल्हाधिकारी विठ्ठल उदमले, उपजिल्हाधिकारी संतोष देशमुख,जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांच्यासह महसूल विभागाचे सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## महापालिका वर्धापन दिनानिमित्त इंद्रभुवन परिसरात वृक्षारोपण



**सोलापूर :** महाराष्ट्र राज्याच्या स्थापना दिन व सोलापूर महानगरपालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त इंद्रभुवन येथे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. याप्रसंगी उपायुक्त मच्छिंद्र घोलप, उपायुक्त आशिष लोकरे, उपायुक्त तैमूर मुलाणी,सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, सहाय्यक आयुक्त ज्योती भगत-पाटील, सहाय्यक आयुक्त पंडित, मुख्य लेखापरीक्षक रूपाली कोळी,नगर अभियंता सारिका अकुलवार, नगर सचिव प्रवीण दंतकाळे,अग्निशमन प्रमुख केदार आवटे, महिला व बालकल्याण अधिकारी विठ्ठल कस्तुरे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी महापालिकेच्या परिसरामध्ये मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपणाचा कार्यक्रम झाला.

## मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीत ध्वजारोहण

**सोलापूर :** महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६५व्या दिनानिमित्त अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर यांच्या हस्ते मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या छतावर ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, तहसीलदार सरस्वती पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने, सहकार विभागाचे जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

# कुमारस्वामी नगरात दोन ठिकाणी घरफोडी; 3 लाखांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ मे -**

सोलापूर शहरातील शेळगी परिसरातील कुमारस्वामी नगरात चोरट्यांनी दोन घरांमध्ये चोरी करून सुमार ३ लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला.

युन्नूस सिध्दीक बागवान (वय ३८, रा. घर नं. २८१, कुमारस्वामी नगर, मित्र नगर, शेळगी येथे अब्दुल बादशाह फुलारी यांच्या घरात भाड्याने, सोलापूर) हे ३० एप्रिल रोजी रात्री घरात उकडत असल्याने घरास बाहेरून लॉक करून पत्नी व मुलांसह घराच्या स्लॅबवरून झोपले होते. ही संधी साधून चोरट्याने बागवान यांच्या घराचे मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश करून हॉलमधील कपाटातील लॉकरमधून १ लाख ७७ हजार ९०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. चोरट्याने बागवान यांच्या घरातून २० ग्रॅम सोन्याचे नेकलेस, ८ ग्रॅम ५०० मिलीचे एक जोड कानातील रिंग, ४ ग्रॅम ४०० मिलीचे एक जोड कानातील रिंग, १३५ ग्रॅम ३०० मिलीचे एक जोड चांदीचे पैंजण, १४ ग्रॅम ९०० मिलीचे चांदीचे ब्रेसलेट असा ऐवज चोरून नेला आहे.



तर दुसऱ्या घटनेत जैनाद्दीन हजरतअली पटेल (वय ३६, रा. घर नं. ११६, कुमारस्वामी नगर, शेळगी, सोलापूर) हे २४ एप्रिल रोजी घराला कुलूप लावून कुटुंबासह परगावी गेले होते. ही संधी साधून चोरट्याने पटेल यांच्या बंद घराचे कुलूप तोडून बेडरूममधील कपाटाचे लॉकर उचकटून १ लाख २० हजार ५०० रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेला. यामध्ये १ लाख ५ हजार रुपयांचे २० ग्रॅम १५० मिली वजनाचे सोन्याचे नेकलेस व एक मोबाईलचा समावेश आहे. या दोन्ही घटनांची नोंद जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात करण्यात आली असून सहायक पोलिस निरीक्षक पडसळकर करीत आहेत.

## घरफोडीचे दोन्ही गुन्हे दोन तासात शहर गुन्हे शाखेकडून उघडकीस

जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात दाखल झालेले घरफोडीचे दोन्ही गुन्हे शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी दोन तासात उघडकीस आणले. शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी चोरीचे दागिने व मोबाईल विकण्यासाठी आल्याानंतर विडी घरकुलमधील भारत नगर येथे एका अल्पवयीन मुलास ताब्यात घेतले. त्या मुलाकडे चौकशी केल्यानंतर त्याने कुमारस्वामी नगरात दोन ठिकाणी घरफोडी केल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी त्याच्याकडून दोन गुन्ह्यातील १०० टक्के मुद्देमाल जप्त केला आहे. ही कामगिरी पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक संजय क्षिरसागर, कर्मचारी अनिल जाधव, महेश शिंदे, राजू मुदगल, कुमार शेळगे, अजय गुंड, सिध्दाराम देशमुख, सुमित्रा बारबोले, अर्चना स्वामी यांनी केली.

# लोकशाहीच्या चार स्तंभात न्यायपालिकेचे स्थान अनन्यसाधारण

### मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांचे प्रतिपादन

### न्यायालयाच्या परिसरात ८ मजली इमारतीसाठी १०८ कोटींचा निधी

### तीन वर्षात काम पूर्ण होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

लोकशाहीच्या चार स्तंभात न्यायपालिकेचे स्थान अनन्यसाधारण आहे. सर्वसामान्य नागरिकांमध्ये न्यायव्यवस्थेचे महत्त्व व विश्वासाहर्ता टिकून राहण्यासाठी सर्व न्यायाधीशांनी प्रयत्न करावेत. यासाठी न्यायलयांना बार कौन्सिल असोसिएशनच्या सदस्यांनीही सहकार्य करावे, असे आवाहन मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांनी केले.

येथील जिल्हा व सत्र न्यायालयाच्या परिसरात शासनाच्या विधी व न्याय विभागाने अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय इमारतीच्या भूमिपूजन व कोनशिला समारंभ प्रसंगी ते बोलत होते. यावेळी उच्च न्यायालयाचे



न्यायमूर्ती सर्वश्री नितीन जामदार, पृथ्वीराज चव्हाण, निजामुद्दीन जमादार, विनय जोशी, फिरदोस पूनीवाला, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मोहमद सलमान आझमी, उच्च न्यायालयाचे महाप्रबंधक आर. एन. जोशी, जिल्हा न्यायाधीश १ रेखा पांढरे, महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे सदस्य मिलिंद थोबडे, वकील संघाचे अध्यक्ष ॲड. सुरेश गायकवाड आदी विधीज्ञ उपस्थित होते.

न्यायमूर्ती उपाध्याय पुढे म्हणाले की सर्वसामान्य नागरिकांचा आजही न्याय संस्थेवर विश्वास आहे. हा विश्वास टिकून राहण्यासाठी न्यायाधीशांनी न्यायदानाचे काम अत्यंत अचूकपणे व वेळेत करावे. यासाठी सर्व वकिलांचे सहकार्य ही महत्त्वाचे आहे. सोलापूर शहराला एक ऐतिहासिक परंपरा असून स्वातंत्र्य लढ्यातील सोलापूरची भूमिका महत्त्वाची होतो. त्याचप्रमाणे न्यायव्यवस्थेमध्ये ही सोलापूरकर महत्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. पुढील काळात सोलापूरच्या मुलींचाही न्यायव्यवस्थेत मोठा सहभाग राहील यासाठी प्रयत्न करावेत. सोलापूरच्या जिल्हा व सत्र न्यायालयाच्या पूर्वीच्या इमारतीमध्ये विविध न्यायालयीन कामकाज व कोर्ट चालवणे यावर मर्यादा येत होती. त्या पार्श्वभूमीवर अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाच्या इमारतीची आवश्यकता जाणवत होती. राज्याच्या विधी व न्याय विभागाने यासाठी निधी मंजूर करून या इमारतीचे विविध सोयी सुविधा उपलब्ध करून न्यायालयीन कामकाज गतिमान करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी या इमारतीचे काम विहीत कालावधीच्या आत पूर्ण करावे.

मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांना महाराष्ट्र व गोवा बार असोसिएशनचे सदस्य मिलिंद थोबाडे व जिल्हा वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. सुरेश गायकवाड यांनी सन्मानपत्र देऊन गौरव केला. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मोहम्मद सलमान यांनी प्रास्ताविक केले. जिल्हा न्यायाधीश रेखा पांढरे यांनी आभार मानले.

### डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांचे साहित्य वाचण्याचे आवाहन

मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांनी सोलापूर जिल्ह्याच्या ऐतिहासिक परंपरेचे महत्त्व अधोरेखित करून डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांनी चीनमध्ये समर्पित भावनेने केलेल्या रुग्ण सेवेचा गौरव केला. तसेच जिल्ह्यातील सर्व न्यायाधीश व वकील मंडळींनी डॉ. द्वारकानाथ कोटणीस की अमर कहानिया वाचण्याचे तसेच डॉ. कोटणीस यांच्यावरील चित्रपट पाहण्याची सूचना केली.

### नवीन इमारत आवश्यकता व प्रशासकीय मान्यता

सोलापूर जिल्ह्याच्या अतिरिक्त जिल्हा न्यायालयाची इमारत बांधण्याचा प्रस्ताव उच्च न्यायालय मुंबई यांच्याकडून विधी व न्याय विभागास पाठविण्यात आला होता. या प्रस्तावास विधी व न्याय विभागाकडून प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. जिल्हा व सत्र न्यायालयाच्या आवारामध्ये असलेले जिल्हा व सत्र न्यायालय, दिवाणी व फौजदारी न्यायालय इमारत तसेच तदर्थ जिल्हा व सत्र न्यायालय इमारती या दिवसेंदिवस न्यायालयीन तसेच कार्यालयीन कामकाजाकरिता अपुऱ्या पडत आहेत. त्यासाठी या अतिरिक्त जिल्हा न्यायालयाच्या नवीन इमारतीची आवश्यकता होती. या नवीन ८ मजली इमारतीमध्ये न्यायालयीन आवारातील जिल्हा व सत्र न्यायालयाची इमारत, बार असोशिएशन, दिवाणी फौजदारी इमारत यांना जोडणारा स्काय वॉक तसेच बेसमेंन्ट वाहनतळ, सुसज्ज वाहनतळ यामध्ये अंतरर्भूत आहे. या इमारतीचे बांधकाम दोन वर्षात पूर्ण होणार आहे. या इमारतीच्या बांधकामासाठी विधी व न्याय विभागाकडून १०७ कोटी ९५ लाखाच्या निधीस प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

# ३,६१७ मतदान केंद्रावर स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ

**जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची बोरामणी येथील मतदान केंद्र परिसरात स्वतः झाडू हाती घेऊन स्वच्छता**

**ग्रामीण भागातील २ हजार ३६१, शहरी भागातील १ हजार २५६ मतदान केंद्रावर ही स्वच्छता मोहीम राबवली जाणार**




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघासाठी दिनांक ७ मे रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ या कालावधीत मतदान होणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करण्यासाठी प्रशासनाच्या वतीने प्रयत्न केले जात आहे.

त्याच अनुषंगाने जिल्ह्यातील ३ हजार ६१७ मतदान केंद्रावर स्वच्छता मोहीम राबवून त्या ठिकाणी आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. ग्रामीण भागातील २ हजार ३६१ मतदान केंद्रापैकी दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी येथील मतदान केंद्रावर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मतदान केंद्राच्या परिसरात स्वतः झाडू हाती घेऊन केंद्र परिसरात स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ केला. नगरपालिका स्तरावरील ४८४ मतदान केंद्रावर ही आजपासून स्वच्छता मोहीम सुरू झाली असून महापालिका स्तरावरील ७७२ केंद्रावर स्वच्छता मोहीम लवकरच सुरू होत आहे. यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, दक्षिण सोलापूर तालुक्याचे गटविकास अधिकारी वाघ यांच्यासह बोरामणी येथील ग्राम स्तरीय कर्मचारी उपस्थित होते. मागील लोकसभा निवडणुकीत सोलापूर जिल्ह्यात सरासरी मतदान जवळपास ६१ टक्के इतके झालेले आहे ते यावर्षी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक मध्ये किमान ७० टक्के पेक्षा अधिक मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने प्रयत्न करण्यात येत आहेत. त्याच अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रावर मतदारांसाठी अनेक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

यामध्ये जिल्ह्यातील वाढते तापमान पाहता सावलीसाठी प्रत्येक मतदान केंद्रावर मंडप उभारण्यात येणार आहे, त्यामुळे मतदारांना उन्हाचा त्रास होणार नाही. तसेच मतदान केंद्रावर पिण्याच्या पाण्याबरोबरच ओआरएस चे पाणीही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मतदान केंद्र परिसराची स्वच्छता मोहीम सुरू करण्यात आलेली असून प्रत्येक मतदान केंद्र व परिसर अत्यंत स्वच्छ ठेवण्यात येणार आहे. ही मोहीम ६ मेपर्यंत राबविण्यात येत आहे. मतदान केंद्र व परिसरात स्वच्छता राहिल्याने मतदारांना मतदान करण्यासाठी उत्साह राहील. मतदान केंद्रावर मोठ्या रांगा लागल्यास मतदारांना बसता यावे यासाठी तेथे बेंचेस व खुर्चीची व्यवस्था करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशीर्वादाने दिली.

प्रत्येक मतदान केंद्रावर जेष्ठ मतदारांच्या व दिव्यांग मतदारांच्या मदतीसाठी व्हील चेअर ची सुविधा देण्यात आली असून त्यांच्या मदतीसाठी स्वयंसेवक ही नियुक्त करण्यात आले आहे. त्याप्रमाणे मतदान केंद्रावर रॅम्पचीही व्यवस्था करण्यात आलेली आहे. मतदारांसाठी मतदान केंद्राच्या ठिकाणी मतदार मदत कक्ष उघडण्यात येणार आहे, त्या ठिकाणी बी. एल.ओ. ची नियुक्ती केलेली आहे. मतदारांच्या आरोग्यासाठी प्रत्येक मतदार केंद्रावर स्वच्छतागृह स्वच्छ करण्यात आलेले आहेत. मतदारांना हिरकणी कक्षाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी पाच व पाच पेक्षा जास्त मतदान केंद्र आहेत अशा ठिकाणी प्रत्येक मतदान केंद्राला कलर कोडींगचा वापर केलेला असून मतदारांना त्यांचे मतदान केंद्र शोधणे अत्यंत सुलभ करण्यात आलेले आहे, असे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

## संक्षिप्त वृत्त



### जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेत महाराष्ट्र दिन साजरा

**सोलापूर, दि.२ मे-**

जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था क्रमांक एकच्या वतीने महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी डॉ. नवनाथ नरळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी चेअरमन विवेक लिंगराज, तज्ञ संचालक डॉ.एस.पी.माने, संचालक अनिल जगताप, मृणालीनी शिंदे, मल्लिकार्जुन स्वामी, प्रदीप सकट, कृष्णा लोंढे, अश्विनी चटमुटगे, महादेवी देवकते, रेणुका प्रथमशेट्टी, दरेकर, सचिव दत्तात्रय देशपांडे, सुभाष काळे, विनोद कदम आदी उपस्थित होते.



### ॲड.एम.ए.शेख यांचा सत्कार

**सोलापूर, दि.२ मे-**

येथील प्रख्यात एडवोकेट एम.ए. शेख यांच्या वाढदिवसानिमित्त माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी शिंदे यांनी ॲड.शेख यांना निरोगी आणि दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी ज्येष्ठ नेते सुधीर खरटमल, माजी महापौर यू. एन. बेरिया, माजी महापौर आरिफ शेख, ॲड.आर.एन.शेख, आळंगे, भारत कट्टे, वसीम शेख आदी वकील मंडळी सह मान्यवर उपस्थित होते.



### महापालिकेच्या आरोग्य शिबिरात ३५० कर्मचाऱ्यांची तपासणी

**सोलापूर, दि.२ मे-**

महाराष्ट्र स्थापना दिन, कामगार दिन आणि सोलापूर महानगरपालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त मनपा अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी कौन्सिल हॉल येथे आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महापालिकेच्या ३५० कर्मचाऱ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला. शिबिराचे उद्घाटन महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी उपायुक्त मच्छिंद्र घोलप, उपायुक्त आशिष लोकरे, उपायुक्त तैमूर मुलाणी, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, सहाय्यक आयुक्त ज्योती भगत-पाटील, सहाय्यक आयुक्त पंडित, मुख्य लेखापरीक्षक रूपाली कोळी,नगर अभियंता सारिका अकुलवार,आरोग्य अधिकारी मंजरी कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात कान, नाक घसा तपासणी, नेत्र तपासणी, जनरल तपासणी तसेच आवश्यक त्या रक्त चाचणी करण्यात आली.




### कामगार सेनेतर्फे कामगार व महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**सोलापूर दि. २ मे-**

जागतिक कामगार दिन व महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष प्रणित, महाराष्ट्र कामगार सेनेच्या वतीने, विविध कार्यक्रमाद्वारे महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला. कामगार सेना कार्यालय, पद्मशाली चौक येथे विडी कामगार, शोभाताई पोला यांच्या हस्ते भगवा झेंडा फडकवून हा दिन साजरा करण्यात आला. तत्पूर्वी छत्रपती शिवाजी महाराज यांची पूजा शिवसेना संघटक अमित भोसले, यांच्या हस्ते करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कामगार सेनेचे प्रदेशाध्यक्ष, विष्णू कारमपुरी हे होते. यावेळी उपस्थित सर्व कामगार बंधू भगिनी, कामगार एकजुटीचा विजय असो, कामगार दिनाचा विजय असो, महाराष्ट्र दिनाचा विजय असो, छत्रपती शिवाजी महाराज की जय, छत्रपती संभाजी महाराज की जय, अशा घोषणा दिल्या., त्यानंतर लहान मुलांना आणि कामगार बंधू-भगिनींना लाडू वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात विठ्ठल कुराडकर, रेखा आडकी, रमेश चिलबेरी, हिरामणी मामड्याल, विक्रम कारमपुरी, अक्षय नंदाल, प्रसाद जगताप, संतोष गद्दी, अक्षय चिरलेली, प्रेम आडकी, अनिता मामड्याल, लावण्या पोला, अनिकेत वडला कोंडा, शरणप्पा जगले, यांच्यासह कामगार पदाधिकारी व कामगार उपस्थित होते.

## व्यंगचित्रकार दिनानिमित्त उन्मेष शहाणे यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

कार्टून्स कट्टा महाराष्ट्र व्यंगचित्रकार ग्रुप पुणे, मार्फत सोलापूरचे व्यंगचित्रकार उन्मेष शहाणे यांचा मनसे नेते अमित ठाकरे यांच्या हस्ते सत्कार होणार आहे.



विविध वृत्तपत्रे, मासिके तसेच अन्य सोशल मीडियावर आपली व्यंगचित्रे प्रसिद्ध करणाऱ्या काही निवडक दहा चित्रकारांचा शनिवारी ४ मे रोजी सायंकाळी ५ वाजता हा सोहळा होणार आहे. यात श्री. शहाणे यांचा समावेश आहे. या कार्यक्रमास प्रसिद्ध शिल्पकार प्रमोद कांबळे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. ४ ते ६ मे रोजी सकाळी ११ ते ८ दरम्यान या तीन दिवसीय कार्यक्रमात कार्यशाळा, आणि देशमुख यांच्या व्यंगचित्रांचे प्रदर्शनाचा लाभ कला रसिकांना मिळणार आहे. याप्रसंगी छोट्यासाठी चित्र कसे रेखाटावे याचे प्रात्यक्षिक, कला साहित्यासह सर्व सहभागी विद्यार्थ्यांना अगदी मोफत असणार आहे. सोबत सर्वांना प्रशस्तीपत्र देवून सन्मानित करण्यात येणार आहे. या तीन दिवसीय संपूर्ण कला सोहळ्याचा आणि सुमारे ३०० चित्र प्रदर्शनाचा आस्वाद सर्व कलाकारांनी तसेच कला रसिकांनी घ्यावा असे आवाहन आयोजक देशमुख यांनी केले आहे.

## इंग्रजी पाटी विरोधात मनसेचे गांधीगिरी पद्धतीचे आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

महाराष्ट्र दिनानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने आज सोलापुरात इंग्रजी पाटी विरोधात गांधीगिरी पद्धतीने आंदोलन करण्यात आले.या आंदोलनानंतर देखील मराठी पाट्या न बनवल्यास खळ-खट्याक आंदोलनाचा इशारा मनसेने दिला आहे.

मागील तीन महिन्यापूर्वी मनसेच्या वतीने खळ-खट्याक आंदोलन करत मराठीत पाट्या बनवा असे व्यापाऱ्यांना आवाहन करण्यात आले होते. तरीही सोलापुरातील काही व्यापाऱ्यांनी अद्याप मराठीत पाट्या न बनवल्याने आज गांधीगिरी पद्धतीने आंदोलन करण्यात आले. आजच्या आंदोलनानंतर देखील व्यापाऱ्यांनी मराठीत पाट्या न बनवल्यास निवडणुकीनंतर खळ-खट्याक आंदोलन करण्याचा इशारा मनसेच्या वतीने देण्यात आलाय. व्यापाऱ्यांनी देखील या आंदोलनाला प्रतिसाद देत लवकरच पाट्या बनवण्याचे आश्वासन दिले आहे.यावेळी जिल्हाअध्यक्ष विनायक महिंद्रकर, लोकसभा अध्यक्ष प्रशांत इंगळे,विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष अभिषेक रंपुरे,शहराध्यक्ष बाळासाहेब सरवदे,राहुल अक्कलवाडे,वैभव रंपुरे,यश महिंद्रकर, हनमंतु घंटे व महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.




## 'एक स्टेशन एक उत्पादन'मुळे स्थानिक उत्पादनाला मिळाली चालना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**



विभागनिहाय असणाऱ्या रेल्वे स्थानकांवर त्या त्या ठिकाणी प्रसिद्ध असणाऱ्या वस्तूंची विक्री व्हावी आणि त्यातून स्थानिक उत्पादनाला चालना मिळावी यासाठी रेल्वे प्रशासनाने एक स्टेशन एक उत्पादन ही योजना राबविली आहे. त्यापैकी मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील सोलापूर, कलबुर्गी, लातूर, कुर्डुवाडी आणि पंढरपूर या रेल्वे स्थानकांवर लोकल ठिकाणी प्रसिद्ध असणाऱ्या वस्तू ''वोकल फॉर लोकल'' च्या दृष्टीकोनातून विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहेत. या योजनेमुळे देशातील विविध ठिकाणी प्रवास करणाऱ्या रेल्वे प्रवाश्यांना देशात असणाऱ्या विविध संस्कृतीचा समृद्ध वारसा अनुभवण्यास मिळत आहे. शिवाय समाजातील उपेक्षित घटकांसाठी अतिरिक्त उत्पन्नाच्या संधी यामुळे निर्माण झाल्या आहेत.

या योजनेच्या उत्पादनांचे वेगवेगळ्या श्रेणी मध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे. सदरील ठिकाणाची खाद्य संस्कृती, वेशभूषा, राहणीमान, कापड संस्कृती, हस्तकला/ कलाकृती, स्थानिक कृषी उत्पादने, प्रक्रिया केलेले/अर्ध-प्रक्रिया केलेले पदार्थ यांचा समावेश करण्यात आला आहे. सोलापूर रेल्वे स्थानकावर सोलापुरी चादर, टॉवेल आणि स्थानिक हस्तकला उत्पादने आदींचे स्टॉल 'एक स्टेशन एक उत्पादन' योजने अंतर्गत लागले आहे. त्यामुळे सोलापुरी चादरला देशात ओळख मिळाली. बाहेरील प्रवाशी मोठ्या प्रमाणात रेल्वे स्थानकातून चादर, टॉवेल आणि स्थानिक हस्तकला उत्पादने खरेदी करतात. तरी रेल्वे प्रवाशांनी आणि नागरिकांनी रेल्वे स्थानकावरील 'एक स्टेशन एक उत्पादन' या स्टॉलला भेट देऊन सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सोलापूर विभागाचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील यांनी केले आहे

### सोलापूर विभागातील विविध स्थानक आणि तेथील उत्पादने

सोलापूर रेल्वे स्थानक- सोलापुरी चादर, टॉवेल आणि स्थानिक हस्तकला उत्पादने इत्यादी. कलबुर्गी रेल्वे स्थानक - लोणचे, ज्वारी भाकरी, शेंगा चटणी आणि सर्व प्रकारचे फराळ आणि स्थानिक हस्तकला उत्पादने इत्यादी. कुर्डुवाडी रेल्वे स्थानक -विविध प्रकारचे पापड, लोणची, सोलापुरी चादर, शेंगा चटणी आणि स्थानिक हस्तकला उत्पादने इ. पंढरपूर रेल्वे स्थानक- विठ्ठल मूर्ती, कुंकू, अगरबत्ती आणि इतर पूजा साहित्या. लातूर रेल्वे स्थानक - पापड, शेंगा चटणी आणि स्थानिक हस्तकला उत्पादने इत्यादी.

### असा करा अर्ज

अर्जदाराला आपला अर्ज संबंधित स्टेशन मास्टर यांच्याकडे आपला दाखल करता येईल. नवीन अर्जदाराला दर १५ दिवसांनी एक स्टॉल दिला जाईल. त्यासाठी अर्जदाराला फक्त १००० रुपये शुल्क भरावे लागेल. अर्जदाराला हवी असणारी अधिकची माहिती हि संबंधित स्टेशन मास्टर कडे मिळेल.



## जैन गुरुकुल प्रशालेत महाराष्ट्र व कामगार दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात ६५ वा महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक राजकुमार काळे व ज्येष्ठ शिक्षक पांडुरंग आलाट यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्रसन्न काटकर यांनी ध्वजारोहण विनंती केली, उपमुख्याध्यापक शैलेश पांगळ यांनी प्रतिज्ञा वाचन केले तर पर्यवेक्षक प्रवीण कस्तुरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. विकास शिळ्ळे यांनी मतदार प्रतिज्ञेचे वाचन केले. यानंतर गुरुकुल स्वरमंच विद्यार्थ्यांनी संगीत विभागप्रमुख दीपक कलढोणे रचित महाराष्ट्र गौरव गीत सादर केले.

याप्रसंगी प्रशालेतील सर्व विभागात सर्वात कमी रजा उपभोगलेल्या कर्मचाऱ्यांचा गौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यामध्ये बालक मंदिरातून सौ. निर्मला तांदळे, प्रागमिक विभागातून वैभव परिचारक, प्रशालेतून तनय गांधी व व्होकेशनल विभागातून अभिनंदन दोशी यांना सन्मानीत केले. अध्यक्षीय मनोगतातून मुख्याध्यापक राजकुमार काळे यांनी महाराष्ट्र व कामगार दिनाच्या शुभेच्छा व्यक्त करत देशाची लोकशाही अधिक बलवान बनविण्यासाठी आपल्या पालकांकडे मतदान करण्याचा हट्ट धरावा असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद खोबरे वैभव परिचारक यांनी केले तर प्रीती काळे गोरे यांनी उपस्थित सर्वांना धन्यवाद दिले.

## ५५ कि.मी. मध्ये ५८ हजार झाडांची लागवड

**तभा वृत्तसेवा । सहयोग प्र.जावळे**
**कन्नड, दि. २ मे -**




सोलापूर - धुळे महामार्गावर करोडी ते तेलवाडी या मार्गावर भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणा अंतर्गत दिलीप बिल्डकॉन लिमिटेड या खाजगी कंत्राटदाराने किती वृक्षारोपण केले आहे व ते वृक्ष कोणत्या प्रजातीचे आहेत ते बघणार आहोत,

करोडी ते तेलवाडी या महामार्गाचे काम सन २०१७ -१८ या कालावधीत सुरू झाले तर सदर महामार्ग रहदारीसाठी तात्पुरत्या स्वरूपात सन २०२१ मध्ये मंजुरी घेऊन सुरू करण्यात आला. पण याच महामार्गावर भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने दिलीप बिल्डकॉन लिमिटेड या खाजगी कंत्राटदाराला वृक्षारोपण करण्याचे काम दिले,या खाजगी कंत्राटदाराने सन २०२१ साली तेलवाडी ते करोडी दरम्यान ५५ किलोमिटर अंतरात ५८,१४३ झाडांची लागवड केली त्यात रस्ताच्या मध्यभागी २२५१४ शोभिवंत झाडांची लागवड केली तर रस्ताच्याकडेला ३५६२९ वृक्षलागवड करण्यात आली, अशी माहिती भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने दिली.यामध्ये त्यांनी सांगितले की निम,पिंपळ, गुलमोहर, करंज,कांचन, या प्रजातींचे झाडाची लागवड रस्त्याच्या कडेला केली आहे, तर रस्त्याच्या मध्यभागी टीकोमा,बोगनवेल,शंकासुर,कनेर,या शोभिवंत प्रजातींच्या वनस्पतीची लागवड केलेली आहे. त्यातच सदर महामार्गालगत छत्रपती संभाजीनगर ते चाळीसगाव असा रेल्वे मार्ग करावा अशी मागणी स्थानिक नेते व नागरिकांकडून जोर धरू लागली होती.त्यामुळे रस्त्याच्या कडेला करण्यात येणाऱ्या लागवडीला उशीर झाला. प्रत्यक्षात वृक्षारोपण केलेली झाडे महामार्गाच्या दुतर्फा दिसून येत नाहीत,तीन पेक्षा जास्त वर्षांचा कालावधी उलटुन गेला तरी झाडांचे कोणत्याच प्रकारचे संगोपन हे निययमितपणे झालेले दिसत नाही,त्यामुळेच झाडांची वाढ होऊ शकली नाही असे दिसून येते,नागरिकांना व निसर्गप्रेमींना जे स्वप्नं दाखवण्यात आले ते स्वप्नं प्रत्यक्षात दिसून येत नाही त्यामुळे निसर्गप्रेमींमध्ये नाराजीचा सूर मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे, केवळ कागदोपत्रीच झाडांची देखरेख सुरू आहे का असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.प्रत्यक्षात झाडांची झालेली हेळसांड व कागदावरील देखरेखी मुळे ओसाड बनलेल्या या महामार्गाची सविस्तर माहिती पुढील लेखात.



**क्रमशः**

> झाडांची नैसर्गिक प्रक्रिया आहे,झाडे जोपासने हे आमचे महत्वाचे उद्दिष्ट आहे आणि त्याच अनुषंगाने आम्ही काम करून घेत आहोत,काही झाडे दगावली असेल तर त्या ठिकाणी पुन्हा नव्याने वृक्ष लागवड आम्ही करून घेत आहोत, कन्नड तालुक्यातील सर्वच झाडांना जोपासने ही आणि या झाडांचे संगोपन चांगल्या प्रकारे व्हावे यासाठी आमची टीम कार्यरत आहे
>
> **- रवींद्र इंगोले,** प्रकल्प संचालक
> भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभाग

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी- ७६०

**तेथ अर्जुन म्हणे देवा । हाचि अभिप्रावो आघवा ।**
**मी पुसेन आतां सांगावा । कृपानिधी ।।**

अर्जुन आणि श्रीकृष्णाचे नाते हे केवळ गुरु-शिष्याचे नाते नाही तर ते एक उत्कृष्ट वक्ता आणि उत्कृष्ट श्रोता यांचेपण नाते आहे. अर्जुनाचे बोलणे पूर्ण होईपर्यन्त भगवंत बोलत नाहीत व भगवतांचे बोलने पूर्ण होईपर्यन्त अर्जुन बोलत नाही. दोघेही एकमेकांचे बोलणे शांतपणाने लक्ष देऊन ऐकत असतात. बराच वेळ भगवंतांचे बोलणे झाले आहे. अर्जुनाने युध्द करावे म्हणून श्रीकृष्णानी आत्मज्ञान, निष्काम कर्मयोग सांगीतला. हे सर्व सांगणे होईपर्यन्त अर्जुन फक्त हो म्हणून ऐकत होता. श्रीकृष्णांचे बोलणे संपल्यानंतर त्या बोलण्याच्या अनुषंगाने ज्या काही शंका किंवा जे



काही मनात प्रश्न आले, ते अर्जुन शांत चित्ताने आता विचारीत आहे. तो म्हणतो, आत्मज्ञान प्राप्त होऊन माझी बुध्दी स्थिर होईल. तसेच इंद्रियांच्या संगतीमुळे जी बुध्दी भोग विषयाकडे विस्तारीत होत जाते ती पुन्हा निष्काम कर्माने आत्म स्वरुपी स्थीर होते असे आपले म्हणणे आहे. आपले हे म्हणणे मला योग्य रितीने समजण्यासाठी मी तुम्हाला, काही शंका, प्रश्न विचारणार आहे. तेथ अर्जुन म्हणे देवा । हाचि अभिप्रावो आघवा ।मी पुसेन आतां सांगावा । कृपानिधी ।। असे म्हणाला. हे कृपानिधे मला सविस्तर समजावून सांगून माझ्या शंका, प्रश्नाचे निरसन करावे.

दैनंदिन जीवनात आपणाला कोणी काही सांगते तेव्हा बऱ्याचवेळा आपण त्यांचे सांगणे पुर्णत: मन:पूर्वक ऐकत नाही. काही भाग ऐकतो व काही सोडून देतो. ब-याचवेळा आपली मुलं सुध्दा आपले बोलणे लक्षपुर्वक ऐकत नाहीत. त्यामुळे आपणाला अपेक्षित असे त्यांच्याकडून घडत नाही. बोलण्यापेक्षा ऐकण्याची क्रीया अवघड आहे. ही अवघड क्रीया फक्त एकाग्रतेमुळेच पूर्ण होऊ शकते. एकाग्रता निर्माण होण्यासाठी केवळ धावत्या मनाला ओढून आणावे लागत नाही, तर बोलणाऱ्यावर आपला तेवढा विश्वासही असावा लागतो. जर बोलणाऱ्यावर आपला पूर्ण विश्वास असेल तर आपले मन आपोआप त्याच्याजवळ एकरुप होते. आपण आपल्या मुलामध्ये आपल्याबद्यलचा विश्वास निर्माण केला पाहिजे. गुरुजनांनी सुध्दा विद्यार्थ्यांमध्ये तेवढा विश्वास निर्माण करायला हवा. मनाची एकरुपता माणसाला यशाच्या शिखरावर नेऊन पोहचवते. त्यामुळे आपल्या पाल्यांमध्ये, विद्यार्थ्यांमध्ये ही एकरुपता निर्माण व्हावी यासाठी त्यांच्यात आपण आपल्याबद्यलच्या विश्वासाचे वातावरण निर्माण करायलाच हवे. मुलं जेव्हा त्यांच्या मनात येईल ते प्रश्न, शंका विचारतात तेव्हा त्यांना काहीही प्रश्न, शंका विचारतोस का? म्हणून नाराज करु नये. त्यांच्या प्रश्नांची, शंकाची उत्तरे समाधानकारकपणे दयावीत. त्यांचे विचार कोंडले जाणार नाहीत याची काळजी घ्यावी. अर्जुनाला जे काही विचारावे वाटले ते, तो हक्काने विचारीत आहे. देवा आत्मज्ञान म्हणजे नेमके काय ? स्थिरबुध्दी होण्याची अवस्था कशीप्राप्त होते ? स्थिरबुध्दी व आत्मज्ञान असणाऱ्या व्यक्तीला कोणत्या लक्षणामुळे ओळखता येईल? असा सत्पुरुष कोणत्या अवस्थेत असतो? त्याचे रुप कसे असते? अशा अनेक शंका अर्जुन श्रीकृष्णांना हक्काने विचारत आहे. असा हक्क आपण आपल्या मुलांना, विद्यार्थ्यांना देऊ या. मुलांच्या विदयार्थ्यांच्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी आपला अभ्यास चांगला असला पाहीजे याची जाण असु द्यावी.

**जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | दिनविशेष - चौंडेश्वरीदेवी यात्रा, नागठाणे सातारा |
| दि. ३ मे २०२४ | ....राहू काल.... |
| विक्रम संवत् २०८०, | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| शके - १९४६ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| संवत्सर - क्रोधी नाम | मंगळवार : दु. ३ ते ४.३० |
| मास - चैत्र | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| कृ. दशमी (२३.२४) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| ऋतु - वसंत | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| नक्षत्र- शततारका (२४.०५) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| योग - ब्रह्मा (१४.१८) | |
| करण - वणिज (१२.४१) | |

### राशीभविष्य

**मेष :** देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. अनावश्यक चिंतापासून दूर रहा. धंदा मध्यम राहील. कौटुंबिक परिवारात सुख - शांती मिळेल.

**वृषभ :** अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल.

**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता.

**कर्क :** अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.

**सिंह :** व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता. पत्नीसोबत मतभेद होईल.

**कन्या :** कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील. विद्यार्थ्यांना लाभदायक राहील.

**तूळ :** आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल. शक्यतो जिवनातील निर्णय योग्य व विचार करून घ्या. आनंदी रहा.

**वृश्चिक :** अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**धनु :** योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत.

**मकर :** फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ :** मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्कांने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा. जीवनात आनंदी रहाल. महिलांना सौख्याच्या घटना घडतील.




पंढरपूर : तहसील कार्यालयात महाराष्ट्र दिनानिमित्त प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



वळसंग : श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा करण्यात आला.



अक्कलकोट : महाराष्ट्र दिनानिमित्त कल्याणशेट्टी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मतदान करण्याची शपथ घेतली. यावेळी मल्लिनाथ कल्याणशेट्टी, मलकप्पा भरमशेट्टी, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे.



पंढरपूर: विठ्ठल रुक्मिणी भक्तनिवासात हभप ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले.



बार्शी : महाराष्ट्र दिनानिमित्त तहसील कार्यालयात आमदार राजाभाऊ राऊत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



तीर्थ : श्री रामलिंगेश्वर प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात महाराष्ट्र व कामगार दिन साजरा झाला.

# महाराष्ट्र दिनानिमित्त जिल्ह्यात ठिकठिकाणी ध्वजारोहण

## विविध महाविद्यालयात अभिनव उपक्रम; कामगार दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ मे-**

**महाराष्ट्र राज्याच्या ६४व्या वर्धापन दिनानिमित्त सोलापूर जिल्ह्यात विविध शाळा, महाविद्यालये, संस्था, संघटनांतर्फे १ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाराष्ट्र दिनानिमित्त ठिकठिकाणी ध्वजारोहण करुन अभिनव उपक्रम राबविण्यात आले.**

### तहसील कार्यालय, पंढरपूर

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६४ व्या वर्धापन दिनानिमित्त तहसिल कार्यालय, पंढरपूर येथे प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तहसिल कार्यालय येथे आयोजित करण्यात आलेल्या या ध्वजारोहण सोहळयास तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, नायब तहसिलदार मनोज श्रोत्री, पंडीत कोळी, वैभव बुचके, गटशिक्षण अधिकारी मारुती लिगाडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले उपस्थित होते. यावेळी राष्ट्रगीत व राज्य गीत गायन झाले. तसेच पोलीस पथकाच्या वतीने मानवंदना देण्यात आली.

### तहसील कार्यालय, बार्शी

महाराष्ट्र दिनानिमित्त तहसील कार्यालय बार्शी येथे झेंडावंदन कार्यक्रम आमदार राजाभाऊ राऊत यांच्या हस्ते झाला. आमदार राजाभाऊ राऊत यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात ज्या लोकांनी बलिदान केले त्यांचे बलिदान न विसरता येण्यासारखे आहे. या संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात कोट्यावधी कामगारांनी सहभाग घेतला. ज्यांच्या कष्टामुळे महाराष्ट्र प्रगतीपथावर आहे त्या सर्व कामगारांना शुभेच्छा. यावेळी तहसीलदार एफ.आर. शेख, अप्पर तहसीलदार वृषाली केसकर, नायब तहसीलदार बदे, निवडणूक नायब तहसीलदार संजीवन मुंढे, अव्वल कारकून आर.एन.घोळवे, आर.एस.धनवडे, एन.डी. लांडगे, पुरवठा निरीक्षक सतीश जोशी तसेच प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

### श्री रामलिंगेश्वर प्रशाला, तीर्थ दक्षिण सोलापूर

श्रीक्षेत्र तीर्थ (ता.द.सोलापूर) येथील श्री रामलिंगेश्वर प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रा. भीमाशंकर बिराजदार यांच्या हस्ते महाराष्ट्राचे प्रथम मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्यानंतर ध्वजवंदन करण्यात आले. सूत्रसंचालन व आभार महेश पट्टणशेट्टी यांनी मानले. कार्यक्रमास मुख्याध्यापक सुधीर सोनकवडे, नागराज पाटील, सचिन गुजा,अमर पाटील,शिल्पा महिंद्रकर, उपस्थित होते.

### वखारिया विद्यालय, बार्शी

येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित वखारिया विद्यालयात १ मे रोजी सकाळी साडेसात वाजता विद्यालयाचे मुख्याध्यापक दयानंद रेवडकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिम ेचे पूजन करण्यात आले. सूत्रसंचालन सहशिक्षक एन.एन.महाले यांनी केले. कार्यक्रमासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक एस. के. शिंदे, लंकेश्वर आर.आर.,एस. ए. सोनके, राऊत डी.डी., वैद्य ए.आर., शिंदे व्ही.व्ही., मकरंद जगदाळे, श्रीमती तवले, श्रीमती डोईफोडे, सेवक वाघ, सुरवसे आणि डी.बी.धनके उपस्थित होते. याप्रसंगी इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी शिष्यवृती परीक्षेत पात्र विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख तवले, सहाय्यक राऊत यांनी केले.

### कल्याणशेट्टी महाविद्यालय, अक्कलकोट

जात धर्म पंथ या पलीकडे जाऊन नको जात पात हवा आहे विकास आयटी हब झालाच पाहिजे अशी घोषणा देत कल्याणशेट्टी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मतदान करण्याची शपथ घेतली. म हर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसवा कल्याणशेट्टी महाविद्यालया तील विद्यार्थ्यांनी आम्ही मतदान करणार नको जात पात हवा आहे विकास म्हणत विद्यार्थ्यांनी मतदानाची शपथ घेतली संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी विद्यार्थ्यांना मतदान करण्यासाठी शपथ दिली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, प्रा. राजशेखर पवार डॉ. शितल भस्मे प्रा विद्या वाले, प्रा. विपुल जाधव प्रा शितल फुटाणे प्रा गुरुशांत हपाळे डॉ बाळासाहेब पाटील उपस्थित होते संस्थेचे अध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, विज्ञान विभागप्रमुख पूनम कोकळगी, रुपाली शहा, मल्लिकार्जुन मसुती यांनी कौतुक केले.

### श्री शंकरलिंग प्रशाला, वळसंग

वळसंग (ता. द. सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक वीरेश थळंगे होते. इयत्ता नववी कन्नड माध्यम वर्गात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेली कुमारी उषा हिरेमठ हिच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले तर इयत्ता नववी सेमी इंग्रजी वर्गात व तिन्ही तुकड्यांमधून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेली रश्मी यागंटे हिच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे पर्यवेक्षक शिवानंद घोडके, सूरेश पारशेट्टी, संजयकुमार धनशेट्टी, विजयलक्ष्मी थळंगे, शैला निंबाळ, सिध्दाराम भैरामडगी, बाळकृष्ण गुंड,निलकंठ कवटगी, श्रीमंत भोसले प्रा.संतोष शिंदे उपस्थित होते. याप्रसंगी इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झाल्याबद्दल आनंद किणगी,यश पवार, सिद्धार्थ चनशेट्टी, देविका ढब्बे या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प व लेखन साहित्य देऊन सत्कार करण्यात आले.यावेळी सिद्धारूढ हिरेमठ, बसवराज दुधगी, वीरेश थळंगे, गंगाधर बिराजदार, संतोष कस्तुरे, मल्लिनाथ गौडगाव,विजय प्याटी,अजय म ाणकोजी, गंगा बागलकोटी, स्नेहा हळगोदे, रुपाली कलशेट्टी, प्राध्यापिका स्वाती गाडे,लिपिका राजश्री दुधगी, लिपिक गौरीशंकर चनशेट्टी, कर्मचारी कट्टेप्पा कोळी, विनोद दुधगी आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार यांनी केले.

### विठ्ठल रुक्मिणी भक्तनिवास, पंढरपूर

श्री संत तुकाराम भवन येथे मंदिर समि तीच्या सदस्या श्रीमती शकुंतला नडगिरे व श्री विठ्ठल रुक्मिणी भक्तनिवास येथे सदस्य हभप ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या ध्वजारोहण सोहळ्यास मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके तसेच मंदीर समितीचे विभाग प्रमुख व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी श्री संत तुकाराम भवन येथील अन्नछत्रामधील भोजन प्रसादामध्ये गोड पदार्थाचा समावेश करण्यात आला होता. या भोजन प्रसादाचा सुमारे एक हजार ते बाराशे भाविकांनी लाभ घेतला. त्याचबरोबर दुपारी पोशाखा वेळी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेस परंपरेनुसार दागिने परिधान करण्यात आले होते.

## माळशिरस शहर व परिसरात महाराष्ट्र दिन साजरा



**सदाशिवनगर :** माळशिरस शहर व परिसरात १ मे हा महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. येथील तहसील कार्यालयात तहसीलदार सुरेश शेजूळ यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले यावेळी.नायब तहसिलदार, अधिकारी, कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचारी व नागरीक उपस्थित होते. पंचायत समिती कार्यालयात गटविकास अधिकारी विनायक गुळवे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.यावेळी विविध विभागाचे प्रमुख अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तालुका कृषी कार्यालयात तालुका कृषी अधिकारी आबासाहेब रूपनवर यांच्याहस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. नगरपंचायत कार्यालयात माऊली सावंत यांचे हस्ते ध्वजवंदन करण्यात आले यावेळी नगरसेवक, अधिकारी कर्मचारी व नागरिक उपस्थित होते. माळशिरस प्रशालेमध्ये मुख्याध्यापक शरद सावंत यांचे हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. रणजितसिंह मोहिते पाटील विद्यालय व विजयसिंह मोहिते ज्यू.कॉलेज जाधववाडी येथे मुख्याध्यापक नानासाहेब घार्गे यांचे हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी, शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. रत्नत्रय इंग्लिश मेडियम स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मांडवे येथे डॉ हर्षवर्धन गांधी यांचे हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी अध्यक्ष संचालक, मुख्याध्यापक दैवत वाघमोडे यांचे सह शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. गोपाळराव देव व ज.च.आगाशे कनिष्ट महाविद्यालयात मुख्याध्यापक एस आर कांबळे यांचे हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.यावेळी शिक्षक शिक्षकेतर,कर्मचारी,विध्यार्थी उपस्थित होते. कन्या प्रशालेत मुख्याध्यापक दत्तात्रय वाघमोडे यांचे हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. श्रीनाथ विद्यालयात सह सचिव आण्णासाहेब देशमुख यांचे हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.यावेळी मुख्याध्यापक योगेश गुजरे उपस्थित होते. समीर गांधी कला महाविद्यालय व विष्णूपंत कुलकर्णी इंग्लिश स्कूलमध्ये प्राचार्य देविदास गेजगे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले विद्यालयात कुमार जमदाडे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## नातेपुते सोसायटी शिक्षक, सेवक पतसंस्थेच्या सचिवपदी वाळके



**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि.२ मे-**

नातेपुते एज्युकेशन सोसायटी शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्था, मर्या. नातेपुतेच्या. सचिवपदी अभिजीत वाळके यांची बिनविरोध निवड करण्यात आली पतसंस्थेचे मार्गदर्शक बाबाराजे देशमूख याच्या सूचनेनूसार ही निवड करण्यात आली असून यावेळी चेअरमन अनिल सावंत,व्हा.चेअरमन निकम,तसेच संचालक उपस्थित होते. अभिजित वाळके यांच्या निवडीबद्दल बाबाराजे देशमूख, नातेपुते एज्यूकेशन सोसायटीचे चेअरमन धैर्यशील देशमूख, व्हा. चेअरमन संतोष काळे, सेक्रेटरी महेश शेटे यांनी अभिनंदन केले. अभिजीत वाळके म्हणाले सचिव म्हणून दिलेली जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडण्याची तसेच संस्थेची प्रगती होण्यासाठी जे जे करता येईल ते ते करण्याचा प्रयत्न करीन, अशी ग्वाही वाळके यांनी दिली.



## संक्षिप्त वृत्त...



### चोखोबा संस्थेतर्फे पाण्याच्या टँकरची सोय

**भोसे, दि.२ मे-**

भोसे तालुका मंगळवेढा येथील ग्रामदैवत भैरवनाथ यात्रेस आज पासून सुरुवात झाली असून, या यात्रेस मोठ्या प्रमाणात भाविक वर्ग येत असून, त्यांच्या पिण्याचे पाण्याची सोय व्हावी म्हणून चोखोबा संस्थेच्या वतीने पिण्याच्या पाण्याची टँकरची सोय केल्याने भाविकातून समाधान व्यक्त होत आहे. भोसे येथे यात्रेत पिण्याच्या पाण्याचा टँकर सुरू करून पाण्याची अडचण दूर केल्याने भैरवनाथ यात्रा कमिटीच्या वतीने संस्थेचे आभार मानले. यावेळी तालुका काँग्रेसचे अध्यक्ष प्रशांत साळे, अ‍ॅड.रवीकिरण कोळेकर, ब्रह्मदेव काकडे, युवक नेते अविनाश गायकवाड, संजय काकडे, तालुका काँग्रेस उपाध्यक्ष अण्णासाहेब खडतरे, सुग्रीव गायकवाड, सुधाकर पवार, दामाजी ची माजी संचालक धनाजी काकडे, पैलवान बन्सीलाल खडतरे, महादेव खडतरे, नितीन थोरबोले उपस्थित होते.

> भोसे येथील वाड्या वस्तीवर तीव्र पाणीटंचाई जाणवत असून उद्यापासून चोखोबा संस्थेच्या वतीने वाड्या वस्तीवर ही पाण्याचा टँकर सुरू करण्यात येईल.
> **- प्रशांत साळे, तालुका काँग्रेस अध्यक्ष**



### माळशिरस तालुक्यात मतदान जागृती कार्यक्रम

**अकलूज, दि.२ मे-**

माळशिरस विधानसभा मतदारसंघातील शिंदेवाडी, बोरगाव, भांब, सुळेवाडी, मेडद, संग्रामनगर, वाफेगाव लवंग ग्रामपंचायतींमार्फत मतदान जागृतीसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. ७ मे रोजी होणाऱ्या मतदानासाठी प्रशासनाने मतदान जनजागृती करण्यासाठी नवनवीन संकल्पना राबविल्या आहेत. यासाठी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विजया पांगारकर, तहसीलदार सुरेश शेजुळ, गटविकास अधिकारी विनायक गुळवे, स्वीप नोडल अधिकारी दयानंद गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सेल्फी पॉईंट मतदानाची शपथ, रांगोळी स्पर्धा, रॅली, बॅनर यासारख्या विविध उपक्रमातून नागरिकांना मतदान करणेसाठी प्रेरित करण्याचे काम चालू आहे. यामध्ये संग्रामनगर व लवंग ग्रामपंचायतीने सेल्फी पॉईंट. रांगोळी स्पर्धा, बॅनर, मतदानाची शपथ रॅली आदी विविध उपक्रम राबविले तर वाफेगाव ग्रामपंचायतने रॅली काढून मतदान करणेची शपथ घेतली. भांब ग्रामपंचायतने सेल्फी पॉईंट आणि बॅनर च्या माध्यमातून जनजागृती केली. मेडद ग्रामपंचायत ने रॅली व बॅनरच्या माध्यमातून तर शिंदेवाडी ग्रामपंचायतने रॅली व महिलांच्या माध्यमातून मतदान जनजागृती केली. तसेच बोरगाव, सुळेवाडी ग्रामपंचायतीने सेल्फी पॉईंट, रांगोळीच्या माध्यमातून मतदान करण्याचे आवाहन केले, अशी माहिती नोडल अधिकारी किरण मोरे यांनी दिली.



### राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये नांदोरे येथील एस.पी.स्कूलचे यश

**करकंब, दि.२ मे-**

राज्यस्तरीय एटीएस प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये नांदोरे (ता.पंढरपूर) येथील एस.पी.पब्लिक स्कूलच्या तब्बल ४३ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळवून दैदिप्यमान यश संपादन केले. यामध्ये आर्यन मुळे राज्यात प्रथम, वेदांत वलगे चौथा, करण भिंगारे सातवा, क्षिती जोशी जिल्ह्यात तिसरी, दानवी नरसाळे जिल्ह्यात तिसरी, अनिरुद्ध गायकवाड जिल्ह्यात पाचवा, श्रेया जिरेकर हिने जिल्ह्यात पाचवा क्रमांक मिळवून यश संपादन केले. याशिवाय अभिनव तळेकर, शैलेश साळुंखे, स्मृती वलगे, स्वरा पालेकर, श्लोक जवळेकर, वैभवी गुंड,आदर्श केचे, स्वरा झुरुळे, गौरी मोहरे, आर्यन उलभगत, श्राव्य सातुरे, आश्वेद पाटील, रुद्र भोसले, श्रेयश मुळे, धनुष मोरे, तनिषा उलभगत, ज्ञानेश्वरी बोबडे, स्नेहल बेलदर, आदित्य शिंदे, अंजूम शेख, ऋतुजा सातुरे, ओमराज कदम, सानवी मुळे, आरोही गायकवाड, विद्या कदम, संस्कार पाटील, यशराज व्यवहारे, वेदिका उलभगत, पूजा सुतार, पायल सुरवसे, कल्याणी उलभगत, वेदिका शेवटकर, आर्यन वाघ, अहिल्या तळेकर, स्वराली जवळेकर, समृद्धी काटकर या विद्यार्थ्यांनी केंद्र यादीमध्ये स्थान मिळवून यश संपादन केले. गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे मार्गदर्शक डॉ.नंदकुमार होनराव, संस्थापक अध्यक्ष डॉ. संतोष वलगे, सचिव अश्वराज वाघ, सहसचिव बाळासाहेब चव्हाण, खजिनदार विक्रम भिंगारे, प्रकल्प संचालिका वासंती वलगे, मुख्याध्यापिका स्वाती चव्हाण, उपमुख्याध्यापक सुरज अलगुडे यांनी केले.

## देशाच्या विकासासाठी पुन्हा मोदीच पंतप्रधान होणे गरजेचे : आठवले

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २ मे-**

विद्यमान असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील पायाभूत असणाऱ्या रस्ते, वीज, पाणी, उद्योग या सुविधांच्या माध्यमातून देशाचा विकास केला. खऱ्या अर्थाने ते विकास पुरुष असून दशहतवाद, शेजारील राष्ट्रांचा होणारा उपद्रवास लगाम घालून त्यांना जरब बसविली म्हणून ते लोहपुरुष आहे. देशाच्या विकासासाठी पुन्हा नरेंद्र मोदी हेच पंतप्रधान होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन आरपीआयचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी केले.

श्रीपूर येथे माढा लोकसभेचे भाजपा व महायुतीचे उमेदवार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रचार सभेत बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले, विरोधक जर भाजपा बहुमताने सत्तेत आल्यावर संविधान बदलेल



असे बिनबुडाचे अरोप करून जनतेत अफवा पसरवत आहेत. उलट मुंबईमध्ये महामानव डॉ. आंबेडकर याला साडेतीनशे फूट उंचीचा पुतळा उभारण्यात येत आहे. महाराष्ट्राच्या राजकारणा विषयी बोलतना ते म्हणाले शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फुटण्यास ते स्वतः जबाबदार आहेत तर तसेच उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास नसल्याने त्यांचे चाळीस आमदार फुटुन महायुतीत सामील झाले. माढा मतदार संघात रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी रेल्वे, पाणी, रस्ते यावर अनेक उपक्रम राबविले असल्याचे सांगून विकास कामांत त्यांचा देशात आठवा क्रमांक लागतो.

या प्रसंगी आमदार बबनराव शिंदे यांनी जयसिंह मोहीते-पाटलांचे नाव न घेता अकलूजचा एक वयोवृद्ध नेता माढा, बारामती, सातारा , सोलापूर , या चार लोकसभेच्या जागा पाडणार म्हणून सांगत आहे. मात्र अकलूज ग्रामपंचायत निवडणुकीत त्यांच्या मुलाचा दारुण पराभव झाला आहे त्याची अनामत रक्कम जप्त झाली आहे हे विसरता कामा नये अशी टीका केली. यावेळी भाजपचे प्रांतीक सदस्य राजकुमार पाटील, आरपीआयचे ज्येष्ठ नेते सुनील सर्वगोड यांनीही विचार व्यक्त केले. याप्रसंगी आरपीआय आठवले गट श्रीपूर शहर शाखा यांच्यावतीने रामदास आठवले व आ. प्रसाद लाड यांचा सत्कार तुकाराम बाबर पत्रकार बी.टी.शिवशरण, गणेश सावंत, विश्वजीत भालशंकर, बापूसाहेब पोळके, संजय खरे, रमेश भोसले, शामराव भोसले, अतिश आठवले, सुधीर भोसले, गुडु भालशंकर, किशोर आठवले यांच्यावतीने करण्यात आला.



## महायुतीच्या उमेदवार अर्चना पाटील यांना मुस्लिम समाजाचा जाहीर पाठिंबा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२ मे-**

बार्शी शहरातील मुस्लिम समाजाचावतीने धाराशिव (उस्मानाबाद) लोकसभा निवडणुकीत महायुतीचा उमेदवार अर्चना राणाजगजीतसिंह पाटील यांना आमदार राजेंद्र राऊत यांच्या उपस्थितीत जाहीर पाठिंबा दिला.

मुस्लिम समाजाच्यावतीने राजेंद्र राऊत यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. धाराशिव (उस्मनाबाद) लोकसभा मतदारसंघातील महायुतीचा उमेदवार अर्चना राणाजगजीतसिंह पाटील यांना बार्शी शहरातील सर्व मुस्लिम समाजाने जाहीर पाठिंबा दिला.

या लोकसभा निवडणुकीत कोणत्याही परिस्थितीत अर्चना पाटील यांना खासदार करण्याचा दृढनिश्चय मुस्लिम समाजाच्यावतीने करण्यात आला.

## काळभैरवनाथाच्या मिरवणुकीने भांबुर्डी यात्रेची सांगता

**काळभैरवानाथाच चांगभलच्या गजरात गुलालाची उधळण**

**तभा वृत्तसेवा,**
**सदशिवनगर, दि.२ मे-**

काळभैरवनाथी रथातून मिरवणूक ...गुलाल खोबऱ्याची मुक्त उधळण .... बँड, डॉल्बी यांसह पारंपारीक वाद्यचा अवीष्कार पावलो पावली होणारी फटाक्यांची आतषबाजी ... वादयाच्या तालावर थिरकणारी तरूणाई ... गजी नृत्यात दंग झालेली गजी मंडळ ... खमंग खाऊने फुललेल्या बाजारपेठा ..यातच काळभैरवानाथाच चांगभल. घोड्यावरच्या देवाच चांगभलच्या जयघोषात भांबुर्डी (ता.माळशिरस) येथील काळभरवनाथ यात्रेची सांगता झाली.



यात्रेच्या तिसऱ्या दिवशी सकाळी नाथाचे मुखवटे रथात बसवण्यात आले पुढे काळभैरव व जोगेश्वरी मातेची घोडयावर बसलेला मुर्ती ठेवण्यात आल्या होत्या सकाळी ७ पूर्वी रथाचे मार्गक्रमण सुरु झाले पुढे बँड पथक, पारंपारीक सूर, सनई व डॉल्बीच्या वादयाच्या गजरात मिरवणुकीला सुरवात झाली. रथ मारूतीमंदीरासमोर येताच दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. या ठिकाणी दर्शनासाठी रथ तासभर थांबतो व भावीकांची गर्दी कमी होताच पुढे मंदिराकडे जाऊन मूर्ती मंदिरात बसवण्यात आल्या. अनेक वर्षाची परंपरा असलेली भांबुर्डी काळभैरवनाथाची यात्रा तीन दिवस सुरू आसते. पहिल्या दिवशी अभिषेक नैवेद्य गजी ढोल नृत्याने देवाची भाकणूक व सायंकाळी जोगेश्वरी व काळभैरवनाथाचा विवाह सोहळा पार पडतो. दुसऱ्या दिवशी विविध स्पर्धा नैवेद्य या मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात तर तिसऱ्या दिवशी देवाची रथातून मिरवणूक काढूण गुलालाची उधळण करीत यात्रेची सांगता केली जाते.

## तडवळे येथे आज श्री भगवती देवीच्या आराधखान्याचे आयोजन

**'आई राजा उदो उदो'च्या गजरात होणार छबिना, पदूका मिरवणूक**

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.२ मे-**

बार्शी तालुक्यातील तडवळेचे जागृत ग्रामदैवत व नवसाला पावणारी आई म्हणून श्री भगवती देवीचा उल्लेख केला जातो. शुक्रवारी देवीच्या आराधखान्याचे आयोजन करण्यात आले असून रात्री नऊ वाजता श्री भगवती देवीची भव्य अशी छबिना व पादूका मिरवणूक गावातून निघणार आहे. यावेळी छबिन्यापुढे आराध्यांची गाणी, बँडबाजा, संपूर्ण गावात नयनरम्य विद्युत रोषणाई, आकर्षक दारूकाम बघायला मिळणार आहे. श्री भगवतीदेवीचा छबिना मिरवणूकीत बावीस गावातील आराधी मंडळ सहभागी होणार असून त्यांच्यामध्ये आराधी गाण्यांची स्पर्धा लावली जाते.



पूजारी आनंद गुरव, कमलाकर क्षीरसागर, तुकाराम गुरव श्री भगवती देवीची विविध पूजाअर्चा करतात. सुमारे साडेतीनशे वर्षापूर्वी तडवळे गावाच्या पश्चिमेला असलेल्या भोगावती नदीमध्ये दररोज स्नान करण्यास जाणाऱ्या महंत बल्लाळ यांच्या हातात देवीची मूर्ती आली. शुक्रवारी रात्री देवीचा छबीना निघतो. विधीवत पूजा करून गावातील मुख्य मार्गावरून छबिना मिरवणूक निघते. यावेळी मंदिरात बावीस गावातील आराधी मंडळांची गाण्याची स्पर्धा रंगते यातून विजेता व उपविजेता ठरवून त्यांचा गौरव केला जातो. या निमित्ताने शनिवारी गावातील यशवंतराव चव्हाण प्रशालेच्या प्रांगणात करमणूकीचा कार्यक्रमही ठेवण्यात आला आहे. आराधखाना यशस्वी करण्यासाठी श्री भगवतीदेवी आराधी मंडळ, श्री भगवतीदेवी ट्रष्टचे पदाधिकारी, विविध मंडळाचे अध्यक्ष तसेच कार्यकर्ते व ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.

## 'गुरुकुल'चे अकरा विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि.२ मे-**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील श्री श्री गुरुकुल या शाळेतील ११ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र झाले आहेत. मागील ११ वर्षाची यशाची परंपरा कायम राखली आहे.

इयत्ता पाचवीमधून शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थी अनुष्का घोडके, रुद्र राठोड, सोहम कलशेट्टी, भक्ती हत्ते, अथर्व राठोड, अमोल हक्के, ओमकार गायकवाड, अथर्व शिंदे, समृद्धी हांडगे, शर्वरी कोरे, श्रेया कापसे या यशस्वी विद्यार्थ्यांना विभाग प्रमुख भाग्यश्री गोरे, शिवराज भुजबळ, रामेश्वर सावंत, अनुजा कुलकर्णी, ज्ञानेश्वर बंडगर, पुष्पा लामतुरे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

यश संपादन केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षक यांचे डॉ.जितेंद्र कानडे, डॉ. नागनाथ कुंभार, डॉ. रुपाली कानडे, मुख्याध्यापक लक्ष्मण नरे, मुख्याध्यापक शिवराज भुजबळ यांनी अभिनंदन केले आहे.

## ज्ञानदान हेच सर्वश्रेष्ठ पवित्र दान : शिंदे

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२ मे-**

शिक्षणा शिवाय मानवाचे आयुष्य निरर्थक असते.मनापासुन शिक्षकच शिकत असतो आणि शिक्षणही देत असतो.आयुष्यात ज्ञानदान हेच सर्वश्रेष्ठ पवित्र दान असल्याचे मत मुख्याध्यापक बी.टी.शिंदे यांनी व्यक्त केले.

शिक्षण प्रसारक अकलुज संचलीत विझोरी येथील विजयसिंह मोहिते-पाटील विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.टी.शिंदे सेवानिवृत्त झाले. त्यावेळी विद्यालय व नागरीकांच्या वतीने आयोजीत केलेल्या सहकुटुंब सत्काराला उत्तर देताना ते मार्गदर्शन करीत होते. यावेळी व्यासपिठावर नानासाहेब काळे, सुरज ताम्हाणे, सोलापूर जिल्हा मध्य. बँकेचे व्यवस्थापक अप्पासाहेब गायकवाड, हणुमंत पवार, दोशी



कुटुंबीय, दिपकराव गायकवाड उपस्थित होते. १ मे महाराष्ट्र दिन, विद्यालयाचा वार्षिक निकाल आणि मुख्याध्यापक बी.टी.शिंदे यांचा सेवापूर्ती दिन अशा दुधशर्करा योगामुळे ते भारावून गेले होते. पुढे बोलताना बी.टी. शिंदे स.म.शंकरराव यांनी शिक्षणाचे विणलेले जाळे ग्रामिण भागातील मुलांसाठी अमृतासमान आहे. जयसिंह मोहिते-पाटील,संस्थेचे विद्यमान अध्यक्ष संग्रामसिंह जयसिंह मोहिते-पाटील, स्वरुपाराणी मोहिते-पाटील यांच्या पाठबळामुळे मुलांना शिक्षण देण्यास यशस्वी ठरल्याचे सांगितले. यावेळी वैष्णवी नामदास,कविता कोकरे, सहशिक्षिका जाधव, चव्हाण,ऊज्वला देवकर या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. समारंभ प्रसंगी विद्यालायात ९२.१६ टक्के गुण मिळवून इ.९वी मध्ये प्रथम आलेल्या आंबिका चौगुले या विद्यार्थीनीचा सन्मान करण्यात आला.

## एलसीबीचे पोलीस असल्याचे सांगत चोरट्याने लांबवल्या चार सोन्याच्या अंगठ्या

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ मे-**

दि.१ मे रोजी सकाळी जगन्नाथ राजाराम झोडगे (वय ५० वर्षे) रा. अरणगाव ते त्यांची पत्नीसह त्यांच्या मोटार सायकलवर मौजे तुर्कपिंपरी (ता. बार्शी) येथे लग्नासाठी निघाले होते. त्यावेळी बार्शी शहरातून कुर्डूवाडी रोडने श्रीप्रसाद हॉटेलसमोर त्यांच्या गाडीचे पाठिमागून एका बुलेट मोटारसायकलवर दोन अनोळखी इसम आले. त्यांनी त्यांना गाडी थांबवण्यास सांगितली असता झोडगे यांनी गाडी थांबवली. त्या अनोळखी दोन्ही इसमाने आम्ही एलसीबीचे पोलीस आहोत. पुढे चेकींग चालू आहे, तुमच्या अंगावरील सोने काढून ठेवा असे सांगितले. त्यावेळी त्याने त्याचे हातातील दोन अंगठ्या काढून त्या अनोळखी दोन इसमांचे हातात दिल्या.




त्याचवेळी त्यांनी झोडगे यांना एक कागद दिला. त्या कागदामध्ये झोडगेच्या बोटामध्ये असलेल्या सोन्याच्या अंगठ्या काढून ठेवा, असे सांगितले. त्यांच्यावर विश्वास ठेवून झोडगेने हातातील चार सोन्याच्या अंगठ्या एका पुडीमध्ये बांधून अनोळखी इसमाचे हातात दिल्या, त्यानंतर अनोळखी इसमाने ती अंगठ्या असलेली पुडी फिर्यादीच्या हातात खिशात ठेवण्यासाठी दिली, परंतु त्या अंगठ्या असलेली पुडी खिशात ठेवत असताना त्या अनोळखी इसमाने त्याच्याकडे असलेली पांढऱ्या रंगाची पुडी खिशात घालून हातचालाखीने झोडगे यांचे अंगठ्या असलेली पुडी काढून घेतली व ते तिघेजन तेथून निघून गेले. त्यावेळी त्या इसमाने त्यांच्या खिशात घातलेली पुडी झोडगे यांनी उघडुन पाहिली असता त्यामध्ये त्यांच्या अंगठ्या दिसून आल्या नाहीत.

तिन्ही अनोळखी इसमांनी हातचलाखी करुन आम्ही एलसीबीचे पोलीस असल्याची बतावणी करुन फसवणूक केली. त्या तीन अनोळखी इसमांचे वर्णन खालील प्रमाणे. १) एक अनोळखी इसम (वय ४० वर्षे) त्याचे अंगावर एक बदामी कलरचा लाईनीगचा शर्ट व काळ्या रंगाची जीन्स पॅन्ट घातलेला. २) अनोळखी इसम (वय ३५ वर्षे) त्याचे अंगावर काळ्या रंगाचा शर्ट व काळ्या साधी जीन्स पॅन्ट घातलेली ३) अनोळखी इसम (वय ४० वर्षे) त्याचे अंगावर गुलाबी रंगाचा

## राम सातपुतेंना इतर तालुक्यांपेक्षा जादा मताधिक्य देणार : राजन पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२ मे-**

मोहोळ तालुक्यातील दुष्काळ हटवण्यासाठी महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांना इतर तालुक्यापेक्षा जादा मताधिक्य देणार असल्याचा निर्धार राजन पाटील यांनी व्यक्त केला

मोहोळ तालुक्यातील दुष्काळ हटवण्यासाठी सीना भीमा नदीवर बंधारे सीना भोगावती जोड कालवा कृष्णा भीमा स्थिरीकरण आणि अनगर व दहा गावे पाणीपुरवठा करण्यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यावर भाजपा सकारात्मक असल्याने आम्ही राष्ट्रवादी अजित पवार पक्षाच्यावतीने मोहोळ तालुक्यातील राष्ट्रवादीचे सर्व पदाधिकारी लोकप्रतिनिधी महिला पदाधिकारी व सर्व सेलचे पदा कार्यकर्ते यांची महत्त्वाची बैठक दि. ३० एप्रिल रोजी घेण्यात आली त्यावेळी ते बोलत होते.

मोहोळ तालुक्याचे माजी आमदार राजन पाटील(अनगरकर) यांनी वरील निर्धार व्यक्त केला. या बैठकीस विद्यमान आमदार यशवंत माने, युवा नेते अजिंक्यराणा पाटील, तालुकाध्यक्ष प्रकाश चवरे यांचे सह अनेक ज्येष्ठ नेते उपस्थित होते यावेळी बालाजी साठे मदन पाटील सोमनाथ धावणे आधीच अनेक जणांनी आपले मत व्यक्त करून मताधिक्याचा निर्धार व्यक्त केला. सूत्रसंचालन माऊली जाधव तर आभार तालुकाध्यक्ष प्रकाश चौरे यांनी मानले याप्रसंगी तालुक्यातील सरपंच उपसरपंच जिल्हा परिषद पंचायत समिती सदस्य सभापती व विविध संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

